जगांतील मुलें



बर्फमय ग्रीनलंड व तेथील खुजे एस्किमो [पृष्ठ ९८]

ना. म. पटवर्धन

जगांतील मुलें

ना. म. पटवर्धन,
एम्. ए., एल्. टी.
(मुख्याध्यापक, अध्यापिका शाला, हिंगणें.)

१९३२

किंमत १० आणे

प्रकाशकः—ना. म. पटवर्धन,
अनाथ बालिकाश्रम–हिंगणें, पुणें ४.

मुद्रकः—श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु आणि कंपनीज् प्रेस,
५१३ शनवार, पुणें २.

जिच्या अकालीं मृत्यूनें या कृतीला जन्म दिला

त्या

चिरंजीव इंदूस

—प्रेमपूर्वक समर्पण

बालवाचकांस

तुमच्याच वयाची असलेली, माझी मुलगी **इंदू** 'देवाघरीं' गेली, तेव्हां तिच्यासारख्याच तुम्हां चार चौघांना कांहीं गोष्टी सांगून स्वतःचें मन हलकें करावें असें वाटलें. तुम्ही माझी **'आमची दिवाळी'** व '**जगांतील मौजा**' हीं पुस्तकें वाचलीं असतीलच. त्यांत मी पृथ्वीवर कोठें काय काय होतें, व जगांत काय काय मौजा भरल्या आहेत, हें थोडक्यांत सांगितलें आहे. इंदूनेंहि हीं पुस्तकें वाचलीं होतीं, व तीं तिला आवडलींहि होतीं. परंतु तिचें या असल्या गोष्टींनीं समाधान न होतां, ती आपल्यासारख्याच जगांतील इतर मुलांमुलींसंबंधींची माहितीच मला नेहमीं विचारीत असे; आणि तुम्हालाहि पहिल्यानेंच हिंदुस्थानांतील लेणीं, साहराचें वाळवंट, ईजिप्तचीं थडगीं, चीनची भिंत, ग्रीनलंडमधील घरें यांसारख्या निर्जीव गोष्टींची माहिती, किंवा फार झालें, तर आपल्याच महाराष्ट्रांतील 'विनू सोनू' सारख्या मुलांची माहिती होऊन तुमचें फारसें समाधान झालें नसेल, असें आतां मला वाटतें. आणि उघडच आहे; आगगाडींतून जात असतांना तुम्ही डब्यांतील इतर मुलांकडे जितक्या आस्थेनें पाहतां, त्यांचे कपडे, त्यांचें बोलणें, त्यांचें बरोबरचें फराळाचें, त्यांच्या खेळण्याच्या वस्तु, या गोष्टींकडे जितकें तुमचें लक्ष असतें, तितकें कांहीं बाहेर दिसणाऱ्या डोंगर, टेंकडया, नद्या, रानें वगैरे देखाव्यांकडे नसतें. इतर देशांतील मुलांमुलींच्या गोष्टी ऐकण्याची इंदूची इच्छा जरी मला पुरवितां आली नाहीं, तरी, तुमची तरी ती पुरवावी असें वाटून, मी पुढील वीस एक गोष्टी सांगत आहें. माझी सांगण्याची इच्छा भागली म्हणून मला फार आनंद होत. आहे; परंतु या सर्व गोष्टी वाचून, जगांतील इतर मुलांमुलींच्या चालीरीतींना पूर्वी जसें तुम्हाला उपहासानें हसावेंसें वाटे, किंवा कोणी ठेंगणी तर कोणीं काळीं, कोणी नकटीं तर कोणी बारीक डोळ्याचीं म्हणून तुम्हाला जशी त्या मुलांमुलींची चेष्टा करावीशी वाटे, तशी चेष्टा किंवा तसा उपहास आतां करूं नये असें वाटलें, व तुमच्या मनांत

त्यांचेविषयीं जास्त आपलेपणा उत्पन्न झाला तर मला किती तरी जास्तच आनंद होईल!

मुलांनो! माणसांमाणसांत जे निरनिराळे फेरबदल दिसतात, ते कांहीं कोणीं उगीचच्या उगीच केलेले नसतात. ते सर्व तीं जेथें राहतात व वावरतात तेथील हवापाण्यांमुळें, तीं जें खातात-पितात त्यामुळें, व तीं जे उद्योगधंदे करीत असतात त्यामुळें बरेचसे झालेले असतात. माणसांमाणसांत दिसणारे हे फरक भोंवतालच्या परिस्थितीमुळें झालेले असतात, येवढी खूणगांठ आपण मनाशीं बाळगिली म्हणजे, त्यांच्यांत आपणांला जें चमत्कारिक व हंसूं येण्यासारखें दिसतें तें दिसणार नाहीं.

मोठ्या माणसांची गोष्ट सोडली, तर तुम्हां मुलांमध्येंतर चमत्कारिक व हांसण्यासारखें असें कांहींच नसतें. कांहीं मुलांत एक गुण जास्त दिसेल तर दुसऱ्या कांहींत दुसरा गुण दिसून येईल; पण सामान्यतः असें म्हणतां येईल कीं, तुम्हीं मुलें सारखींच प्रेमळ, आनंदी, खेळकर, खोडकर, भांडखोर असतां; तुमचा ओढा जात्याच आपल्यासारख्या इतर मुलांकडे असल्यामुळें त्यांची ओळख करून घेण्याची तुमची फार इच्छा असते; वास्तविक तुम्हांला इतर देशांतील मुलांकडे खरोखरचेंच जातां आलें असतें तर तुम्हाला किती मजा वाटली असती, परंतु तसें घडत नाहीं, म्हणून तर त्यांच्या संबंधींच्या नुसत्या गोष्टी वाचूनच तुम्हाला आपलें समाधान करून घ्यावें लागतें; तें समाधान या गोष्टींनीं थोडें तरी होवो, येवढीच माझी इच्छा आहे.

अशा प्रकारच्या गोष्टींचीं पुस्तकें इंग्रजी भाषेंत पुष्कळच आहेत. उदाहरणार्थ मी ज्या गोष्टी पुढें दिल्या आहेत, त्या बहुतेक 'जॉर्ज न्यूनस, (George Newnes)नांवाच्या लंडन मधील एका प्रसिद्ध कंपनीनें प्रकाशित केलेल्या 'टीचर्स ट्रेझरी' (Teacher's Treasury) या पुस्तकांतून घेतल्या आहेत. मूळ पुस्तकांतील मजकूर व भाषा हीं तर इतकीं सोपीं व सुंदर आहेत कीं, तुमच्यापैकीं ज्यांना ज्यांना थोडेसें तरी इंग्रजी येत आहे, त्यांनीं त्यांनीं तें पुस्तक अवश्य वाचावें. माझ्या प्रमाणेंच तुम्हींहि त्या कंपनीचे व लेखकाचे अगदीं मनापासून आभार मानाल.

'रुथ् व हेन्री' (इंग्लंड), 'हान्स् व ग्रेत्शेन्' (जर्मनी) व 'विली' (युनायटेड स्टेट्स ऑफ् अमेरिका) अशा तीन गोष्टी मात्र मी दुसऱ्या व्यक्तींकडून मिळविल्या आहेत. त्यांचींहि नांवें सांगतों; म्हणजे तुम्हाला त्या त्या मुलांसंबंधीं व देशांसंबंधीं आणखी कांही माहिती हवीशी वाटल्यास त्या व्यक्तींनांच परस्पर विचारतां येईल. पहिली गोष्ट माझें कुटुंब सौ० गंगूबाई पटवर्धन (हेड मिस्ट्रेस ट्रेनिंग कॉलेज फॉर वूमेन-बडोदें) यांनींच स्वतः लिहिली आहे. दुसरी गोष्ट माझे मित्र डॉ० दिनकरराव कर्वे (प्रोफेसर, फर्ग्युसन कॉलेज् पुणें) व त्यांच्या पत्नी सौ० डॉ० इरावतीबाई कर्वे (रजिस्ट्रार भारतवर्षीय महिला विद्यापीठ पुणें,) या दोघांनीं इंग्रजींत लिहून दिली; व तिसऱ्या गोष्टीचा बहुतेक मजकूर माझे मित्र रा०रा० त्र्यंबकराव तळवलकर M. Sc. (Ceramic Engineer, Poona.) यांनीं लिहिला. ही सर्व मंडळी त्या त्या देशांत जाऊन व राहून आल्यामुळें त्यांच्या गोष्टींत व माहितींतही एक प्रकारचा विशेष प्रत्यक्षपणा आलेला आहे. या सर्वांनीं मला तुमच्याकरितां मदत केली याबद्दल आपण सर्वच त्यांचे आभारी असलें पाहिजे.

'टीचर्स ट्रेझरी' (Teacher's Treasury) या मूळ पुस्तकांतील भाषा व मजकूर हीं जशीं अगदीं तुमच्याजोगीं आहेत, तशींच त्यांतील चित्रेंहि फार सुंदर आहेत. मूळ चित्रांपैकीं ८ चित्रांचे फोटो मी या पुस्तकांत दिले आहेत; ते तुह्मांला फारच आवडतील. असे तंतोतंत फोटो कोणीहि लेखक दुसऱ्या लेखकाला त्यांचा उपयोग करण्याकरितां फुकट देत नाही; परंतु सदरहु कंपनीला मी तुमच्या वतीनें विनंति केली, व तिनें ती मोठ्या आनंदानें मान्य केली, याबद्दल आपण त्या कंपनीचेहि मनापासून आभार मानूं या. पुस्तक छापणारे राजश्री राजगुरु यांनीं पुस्तकाची छपाई किती सुबक केली आहे हें तुम्ही पहातच आहां. परंतु ते आपले जुनेच 'दोस्त' असल्यामुळें त्यांचे आभार आपण मानिले नाहीं, तरी ते कांहीं रागावणार नाहींत.

ना. म. पटवर्धन

अनुक्रमणिका

जगांतील मुलें

'रूथ्' व 'हेन्री'

(इंग्लंड)

आपल्या हिंदुस्थान देशाच्या पश्चिमेस फार दूर युरोप नांवाचें एक मोठें खंड आहे. त्या खंडाच्या एका कोंपऱ्यांत इंग्लंड म्हणून एक लहानसा देश असून त्यांतील पूर्व भागांत हेन्रीचें गांव आहे. गांवाला लागूनच हेन्रीच्या बापाची बरीचशी शेतजमीन असून शेताजवळच त्याचें घर आहे. तें खेडें व त्यांतील आपलें घर हेन्रीच्या बापाला फारच आवडतें. घर दगडाविटांचें बांधलेलें असून छपरावर फरशा घातलेल्या आहेत. छपरावर दोन मोठीं धुराडीं आहेत. हेन्रीच्या देशांत थंडी, बर्फ, पाऊस, वारा ह्यांचा फारच त्रास होतो; त्यामुळें हेन्रीच्या बापाला आपलें घर फारच मजबूत बांधावें लागलें. शिवाय हिंवाळ्यांत घरांत ऊब रहावी म्हणून खोल्यांतून एक एक चुलाण किंवा भट्टी बांधावी लागली. हीं त्याच्या घरावर दिसणारीं धुराडीं त्यांचींच आहेत. घरांत भरपूर उजेड यावा म्हणून घराच्या खोल्यांना मोठमोठ्या खिडक्या ठेवलेल्या असून त्यांना कांचेचीं तावदानें लावलेलीं आहेत. त्यांच्या आंतून रंगीबेरंगी पडदे सोडलेले आहेत. घरासभोंवतीं एक लहानशीच बाग असून त्यांत ऋतुमानाप्रमाणें ट्युलिप, क्रोकस, स्नो ड्रॉप, प्रिमरोझ, डॅफोडिल्स, ब्लूबेल्स, वगैरे फुलें येऊं लागलीं

कीं हेन्रीला फारच आनंद होतो. शिवाय घराच्या मागच्या बाजूला थोडीं फळझाडेंही आहेत. पीच, पेअर, ॲपल वगैरेंचा भर आला व फळें लटकूं लागलीं कीं त्यास अतिशयच मौज वाटते. ह्यामुळें हेन्रीला आपलें घर फार आवडतें. त्यांतल्यात्यांत त्याची स्वतःची खोली तर त्याला त्याहून आवडते.

त्याच्या स्वतःच्या खोलींतील तें लहानसें टेबल, ती लहानशीच खुर्ची, गोष्टींच्या व चित्रांच्या पुस्तकांचें तें छोटें शेल्फ, नेनसन्चा पुतळा, विमान, बोट, बंदूक, क्रिकेटचें सामान, हॉकी–स्टिक् हें सर्वच कांहीं त्याला आवडतें. मोठीं माणसें बोलत बसलीं कीं, तो आपल्या बालमित्रांना घेऊन आपल्या खोलींत चित्रें पाहात बसतो, किंवा घराबाहेर बागेंतल्या गवतावर खेळण्यास जातो. आतांच पहा तो आपल्या बागेंत लांकडी घोड्यावर बसून कसा आपल्या डॅडीची नक्कल करीत आहे तो ! त्याची ती जांभळी चड्डी, तिच्यांत खोंचलेला पिवळट शर्ट, त्यावर लोंबणारा जांभळा नेकटाय्, पायांतील निळसर मोजे, काळे बूट–सर्वच मोठें ऐटींत आहे. तो नाकाडोळ्यांनीं नीटस व गोरा असून व त्याचे गुलाबी गाल व हसरें तोंड यांमुळें तर तो गोड पोर फारच खुलून दिसतो.

हेन्रीच्या डॅडीममींना नेहमीं फार काम असतें. तीं दोघें सकाळीं ६-६॥ ला उठतात, व तोंड धुणें, कपडे घालणें वगैरे उरकून ब्रेकफस्टच्या तयारीस लागतात. डॅडीस शेतावर जावयाचें असल्यामुळें घोडे, गाडी वगैरे तयार करून तो घरांत येईपर्यंत ममीनें टेबलावर ब्रेकफस्टची तयारी केलेली असते.

हेन्रीला रूथ नांवाची एक थोरली बहीण आहे. ती आईबरोबर उठून तिच्या मदतीस लागते. आईला गाईच्या धारा काढणें, लोणी

काढणें, रात्रीचें दूध पोहोंचविणें वगैरे कामें करावीं लागत असल्यामुळें हेन्रीला उठवणें, त्याचें तोंड धुणें, त्याला कपडे वगैरे घालून तयार करणें इत्यादि कामें अलीकडे तिच्याकडेच आलीं होती. व रूथही तीं कामें मोठ्या आस्थेनें करी; पण हेन्रीला आतां ५ वें वर्ष संपून ६ वें लागलें आहे. गेल्या ईस्टरलाच त्याचा वाढदिवस होता. तेव्हांपासून ' माझे ' कपडे मी स्वत: घालणार, मी आतां मोठा झालों ' असें त्यांनें सर्वांस बजाविलें ! व खरोखरच तो रूथच्या मदतीनें स्वत:च सर्व उरकूं लागला. त्याचें हें स्वावलंबन पाहून डॅडीमम्मींना फारच आनंद झाला. ८ वाजतां घंटा वाजली कीं सर्वांनीं ब्रेकफस्ट रूममध्यें यावयाचें असा नियम आहे. सर्व जमल्यावर ५ मिनिटें डोळे मिटून सर्वांनीं प्रार्थना करावयाची, व मग ब्रेकफस्टला आरंभ करावयाचा. शेतावर काम असल्यामुळें हेन्रीचा बाप दुपारीं घरीं जेवावयास येत नाहीं. त्यामुळें ह्यावेळीं तो पोटभर खाऊन जातो. पॉरिज् व दूध, तळलेलीं किंवा उकळलेलीं अंडीं, टोस्ट लोणी, चहा व एखादें मुरंबें नाहींतर सफरचंद इतके पदार्थ साधारणत: ब्रेक्फस्ट्ला असतात. हेन्रीला पॉरिज फारच आवडतें. तें खाल्ल्यावर उकडलेलें अंडें व पाव लोणी खाऊन तो उठतो, व फळ खिशांत घालून खेळण्यास जातो. अजून त्याला दूधच आवडतें. चहाची चव समजली नाहीं म्हणून असेल कदाचित् !

ब्रेकफस्ट संपल्यावर टेबल आवरण्यास मदत करून रूथ शाळेंत जाते. हेन्रीच्या देशांत प्रत्येक मुलामुलीला लिहितां वाचतां यावें अशी आईबापांची व तेथील राजाचीही फार इच्छा आहे. त्यामुळें खेड्यांतूनही शाळा आहेत. ९ पासून १२ पर्यंत रूथची शाळा असते. शाळा जरा लांब असल्यामुळें रूथ सायकल-

वरून शाळेंत जाते. तिचा तो अस्मानी फ्रॉक, निळसर चड्डी, जांभळ्या पट्ट्यांचे मोजे, पॉलिश केलेले काळे बूट सर्व कसें टेसांत दिसतें ! तिचे केस पिंगट असून त्यांच्या दोन बाजून दोन वेण्या वळून त्या पाठीवर सोडलेल्या आहेत. तिचा हंसरा चेहरा, सरळ नाक, गुलाबी गाल, घारे डोळे, ह्या सर्वांमुळें ती फारच मोहक दिसते. अभ्यासांत व बेसबॉल, नेटबॉल वगैरे खेळांतही ती हुशार असल्यामुळें शाळेंतल्या सर्व शिक्षकांना व मुलींना ती फारच आवडते.

जशी शाळेंत, तशी घरींही ती आईबापांची लाडकी आहे. ती घरीं गेली कीं तिच्या प्रेमळ स्वभावामुळें तिच्या डॅडीममींनाचसा काय, पण घरांतील गाई, घोडे, कोंबड्या, बदकें यांनाही आनंद होतो. जनावरांना चारापाणी व दाणावैरण घालून, कोंबड्यांना क्रम्स्–ब्रेड बिस्किटांचे तुकडे, व भाजीपाल्याचीं देखें वगैरे टाकून त्यांची तहानभूक शांत करण्याचें काम रूथ स्वतः करते. फुरसतीच्या वेळीं परसांत जाऊन त्यांच्याशीं लडिवाळपणें खेळणें, त्यांना गोंजारणें, त्यांचे गोठे, पिंजरे साफ करणें, त्यांच्या प्रत्येक हालचाली मोठ्या लक्षपूर्वक पाहणें ही तिची रोजची करमणूक आहे. कोंबडीनें अंडीं किती घातलीं, तिला पिलें किती झालीं वगैरे सर्व गोष्टींचा हिशोब तिला तोंडपाठ असतो. वसंतऋतूच्या आरंभाला ममीबरोबर बागेंत काम करणेंही तिला आवडतें. निरनिराळीं फुलें येऊं लागलीं कीं तिला आनंदाच्या उकळ्या फुटतात! फुलांनीं बाग फुलली कीं हेन्रीला घेऊन बागेंत बसणें आणि त्याला ' पीटरपॅन ', ' सिंपलसायमन ' ' टॉम् टायगर ' ' जंबो' वगैरे गोष्टी सांगणें, लहान मुलांचीं गाणीं–नर्सरी ऱ्हाइम्स्-शिकविणें ह्याही गोष्टींत तिला मौज वाटते. ' जॅक अँड जिल् ' ' हिकरी

डिकरी डॉक्' सारखीं किती तरी बालगीतें हेन्रीला पाठ झालीं आहेत. तीं स्वतःशीं गुणगुणत व त्याप्रमाणें हातवारे करीत जेव्हां तो आपल्या खोलींत खेळत असतो, तेव्हां तो अगदीं रंगून जातो.

रविवार आला कीं हेन्रीला व रूथला फार आनंद होतो. कारण त्या दिवशीं डॅडीममी त्याच्याबरोबर खेळण्यास व फिरण्यास येतात. आठवड्यांत ६ दिवस काबाडकष्ट केल्यावर रविवारचा एक दिवस डॅडीला पूर्ण विश्रांति मिळते. त्या दिवशीं ब्रेकफस्ट झाल्यावर सर्वजण नवे कपडे करून चर्चमध्यें प्रार्थनेस जातात. त्या दिवशीं खेड्यांतील सर्व लहान मुलें तेथें येतात, व एका ठिकाणीं बसून गाणीं म्हणतात, गोष्टी ऐकतात किंवा खेळ खेळतात. डॅडीममी मोठ्या माणसांत बसून प्रार्थना करतात, तर रूथ व हेन्री आपल्या बरोबरीच्या मुलांबरोबर प्रार्थना करतात.

घरीं आल्यावर ममी स्वयंपाकास लागते. डॅडीममींना आज रिकामपण असल्यानें दुपारचें जेवणच मुख्य असतें. आज जेवण झाल्यावर मधल्या वेळच्या चहाचें सामान बरोबर घेऊन जवळच्या एका वुडमध्यें तीं फिरण्यास जाणार होतीं. बन्, केक, सँडविचेस वगैरे बांधण्यांत रूथनें ममीला मदत केली. हेन्रीची आपली नुसतीच धांदल उडाली होती. डिनर उरकून तीं बाहेर पडलीं. हे दिवस उन्हाळ्याचे होते. तेव्हां सगळीकडे फुलेंच फुलें व हिरवें गार गवत पसरलेलें होतें. खालीं हिरवें रान व वर निळें आकाश, त्यावर पडणारीं सूर्याचीं किरणें हा एकंदर देखावा पाहून हेन्रीला, फारच आनंद झाला होता. उड्या मारीत तो केव्हांच फाटकाशीं जाऊन पोहोंचला. ' वनांत शिरून एका झाडावर चढावयाचें व डॅडीममीला दाद लागूं द्यावयाची नाहीं, म्हणजे डॅडीममी आपणास शोधायला लागतील, मग आपण झाडांतून मजा पाहूं,'

असे हेन्रीचे व रूथचे बेत चालले होते. बागेंत रूथ-हेन्रीसारखीं किती तरी मुलें फिरण्यास आलीं होतीं. बरोबर आणलेल्या भुई-मुगाच्या शेंगा हेन्रीनें खारकुंड्यांना घातल्या. त्या आपल्या शेपटीवर बसून दोन हातांत शेंग पकडून कुडकुड खाऊं लागल्या कीं हेन्रीला मोठी मौज वाटे. मधून मधून सशांचा पाठलाग करण्यांतही तो गढून जाई. चेस्टनट, ओक वगैरेंचीं फळें जमा करणेंही चालू होतेंच. रूथ ब्लूबेलसूच्या किंवा फरगेटमिनॉट वगैरे फुलांचे गुच्छ करण्यांत गढून गेली होती. डॅडीममीकरतां तिनें आज फारच सुंदर बुके-गुच्छ तयार केले आहेत. हेन्रीकरतां एक 'बटन होल' ही तयार केलें आहे. संध्याकाळ झाल्यावर तीं घरीं परतलीं. हेन्रीची संध्याकाळ आपल्यासारखी सहा वाजतां होत नाहीं. त्याच्या देशांत उन्हाळ्यांत रात्रीं १० वाजेपर्यंत मावळत नाहीं. आहे कीं नाहीं मजा !

लवकरच उन्हाळा संपला, व हेन्रीच्या बापाचे घणाघाईचे दिवस आले. रूथ शाळेंत गेल्यावर घरांतील काम उरकून ममी लंच शिजवी, व हेन्रीला बरोबर घेऊन शेतावर जाई. शेतांत गव्हाचें पीक तयार होऊन कापणीला सुरवात झाली होती. मशीनचा 'खर खर' आवाज, सपासप कापून पडलेले गवताचे ढीग इत्यादि सर्वच गोष्टी हेन्रीला आश्चर्यकारक वाटतात. शेतावर कोट-टोपी घालून उभा केलेला माणूस पाहून तर त्याला अधिकच आश्चर्य वाटलें. तें काय आहे हें माहीत झाल्यापासून मात्र तो रोज त्यावर दगडाचे नेम मारतो व त्याची टोपी उडवण्याचा प्रयत्न करतो. त्याची अशी मजा चाललेली असते, पण काम करतां करतां डॅडीममींची कोण धांदल उडालेली असते ! कापलेले भारे झोडपून, दाणा गोळा करून पोत्यांत भरीपर्यंत त्यांच्या जिवांत जीव

नसतो. हेन्रीच्या देशांत पाऊस केव्हां पडेल त्याचा नियम नसतो. वर्षांत मधून मधून वाटेल तेव्हां पाऊस येतो. धान्य कापल्यावर पाऊस पडला तर हेन्रीच्या बापाचे वर्षाचे श्रम फुकट जावयाचे, व हेन्रीला व घरांतील इतर सर्वांना उपाशीं राहाण्याची पाळी यावयाची; पण आपल्या छोट्या हेन्रीला काय त्याचें? भारे भरून गाडी तयार झाली कीं गवताच्या उंच ढिगावर बसून ऐटींत स्वारी घरीं येते!

हेन्रीच्या खेड्यापासून ६—७ मैलांवर एक मोठें गांव आहे. तेथें आठवड्याचा बाजार भरतो. जनावरें, भाजी, फळें, लोणी वगैरे घेऊन हेन्रीचा बाप दर आठवड्यास तेथें जातो. आपल्या जिनसा विकून स्वतःस पाहिजे त्या दुसऱ्या वस्तू तो तेथून विकत आणतो. कापड, कांचेचीं भांडीं, परदेशी फळें, खेळ इत्यादि वस्तू खेड्यांत कोठल्या मिळणार?

गहूं घेऊन डॅडी उद्यां गांवाला जाणार अशी बातमी हेन्रीला लागली. त्यानें बरोबर येण्याचा फारच हट्ट घेतला तेव्हां सर्वांनींच जावें असें ठरलें. फराळाचें बांधून घेऊन व गरम ओव्हरकोट वगैरे घालून उजाडत सर्व घोड्याच्या गाडींतून निघालीं. आज जिकडे तिकडे धुकें पसरलें होतें. गाडी शेताच्या बाजूनें जात होती, पण कांहीं एक दिसत नव्हतें.

हेन्रीच्या देशांत उन्हाळ्याचे दिवस सप्टेंबर महिन्यापर्यंत टिकतात. आपल्याकडे ह्या दिवसांत उन्हाळा संपून पावसाचा सारखा वर्षाव सुरू असतो. हेन्रीकडे बाराही महिने थोडा थोडा पाऊस पडत असतो, त्यामुळें त्याच्याकडे पावसाळा असा निराळा नसतोच मुळीं! आपण गौरी गणपतीच्यावेळीं पावसांत भिजत असतों, तेव्हां तो धुक्यांत गडप होऊन जातो. तेव्हां ह्या काळाला तो 'ऑटम्'

म्हणत असला, तरी आपण ‘धुकाळा’ च म्हणूं या. हेन्रीला हा ‘धुकाळा’ मुळींच आवडत नाहीं. एकादे वेळीं धुकें इतकें दाट असतें कीं, माणसाला पायाजवळचेंहि दिसत नाहीं. लंडन नांवाच्या शहरांत हेन्रीचा राजा रहातो; तेथें ह्या दिवसांत गाड्यांवर गाड्या आपटून अपघात होतात; म्हणून पुष्कळ लोक जमिनीखालच्या टयूब गाडींतूनच प्रवास करतात, असें हेन्रीचा डॅडी म्हणतो. टयूब गाडी कशी करतात, ती जमिनींतून कशी जाते, वगैरे प्रश्न तो डॅडीला विचारतो. तेव्हां तो मोठा झाला कीं, त्याच्या काकाच्या गांवीं त्यास घेऊन जाण्याचें व सर्व यंत्रांचे कारखाने दाखविण्याचें कबूल करून डॅडी त्याची समजूत घालतो. मात्र ‘येत्या क्रिस्मस-मध्यें फादर क्रिस्मसला टयूब गाडी देण्यास सांगेन’ असें तो डॅडीकडून वचन घेतो.

धुकें लवकरच विरळ झालें, व कांहीं वेळानें आजूबाजूचीं शेतें चांगलीं दिसूं लागलीं. कांहीं शेतें पुनः नांगरण्यास सुरवात झाली होती. नांगरलेल्या भागावर पक्ष्यांच्या झुंडीच्या झुंडी उडतांना पाहून हेन्रीचें लक्ष तिकडे गेलें. इतके पक्षी कशाला आले म्हणून त्यानें प्रश्न विचारलाच. ते जमिनींतील किडे खाणारे पक्षी आहेत; शेत नांगरलें कीं किडे वर येतात, व पक्ष्यांना पटकन् सांपडतात असें डॅडीनें सांगितलें. वाटेंत सर्व रस्त्यावर पानेंच पानें झालीं होतीं. सर्व झाडांखालीं पानांचे ढीगच्याढीग गळून पडले होते, तरी अजून पानें पडत होतींच, ह्याचेंही हेन्रीला आश्चर्य वाटलें. पानें गळण्याचें काय कारण असावें बरें?

हेन्री आतां कंटाळला असें पाहतांच ममीनें त्याला आपल्या-जवळ घेतलें, व आतां क्रिस्मस येईल, तेव्हां तुला काय काय पाहिजे म्हणून प्रश्न विचारला. क्रिस्मसच्या वेळचें तें बर्फ, तो

ख्रिस्मस ट्री, कितीतरी गोष्टी त्याला आठवल्या. टबॉगन घ्यावें कीं स्केटिंग शूज घ्यावे? का टच्यूबच मागूं? नाहींतर आपली आगगाडी, नाहींतर मोटरच बरी ! अशा तऱ्हेनें काय मागावें ह्याचा निश्चय व्हावयाच्या आंतच बाजारगांव येऊन मार्केटशीं गाडी उभी राहिली.

मार्केटमधील ती माणसांची गर्दी, नाना प्रकारच्या वस्तू, अनोळखी चेहरे वगैरे पाहून हेन्री तर गडबडून गेला. शेवटीं तो रडकुंडीस आलेला पाहून रूथ त्याला घेऊन एका खेळाचे दुकानांत शिरली. तेथें त्याला एक माकड विकत घेऊन देऊन 'स्वीट-शॉप' मधून तिनें चाकोलेट व टॉफी विकत घेतली.

हेन्री व रूथ या दोघांनाही चाकोलेट फार आवडतें, पण डॅडी-ममीला दाखविल्याशिवाय खायचें नाहीं असा त्यांचा निश्चय होता. हेन्रीचा डॅडी दर रविवारीं त्या दोघांना थोडेसे पेन्स देतो. त्या पैशांतून त्यांनीं पाहिजे तें विकत घ्यावें. हिशोब लिहून ठेवला म्हणजे झालें. दोघांचा पैसा रूथजवळच असतो. 'मी मोठा झालों कीं तुझे माझे दोघांचे पैसे मीच ठेवीन' असें तो मधून मधून रूथला बजावीत असतो. वस्तू विकत घेऊन मोडींत जितके फार्दिंग येतील, तितके जमा करून वर्षानें गरीब मुलांच्यासाठीं खर्चावयाचे असा रूथचा क्रम होता. ती रविवारीं ज्या चर्चमध्यें जाते, तेथें गरीब मुलांसाठीं 'फार्दिंगफंड' काढलेला आहे. मुलामुलीं-मध्यें फार्दिंग जमविण्याची चढाओढ लागलेली असते, त्यांत रूथ नेहमीं पहिला नंबर पटकावते !

डॅडीममींचा सौदा संपल्यावर सर्वांनीं एका झाडाखालीं बसून लंच घेतलें. नंतर हेन्रीसाठीं एकदोन गरम सूट, लोकरीचे मोजे; सर्वांसाठीं गमबूट; रूथला रेशमी फ्रॉक, ब्लाऊझला कापड; डॅडीला

मफलर; ममीला स्टॉकिंग्स् वगैरे मुख्य वस्तूंचा खरेदी झाल्यावर सर्वांनीं एका उपहारगृहांत चहा घेतला. नंतर किरकोळ जिन्नस घेऊन तीं परत फिरलीं.

कांहीं दिवसांनीं बर्फ पडूं लागलें. हेन्रीला गरम कपडे व जाड ओव्हरकोट घातल्याशिवाय बाहेर पडतां येईना; पण तो बागेंत जाऊन बर्फांत खेळल्याशिवाय रहावयाचा नाहीं. स्नो--बॉल करून फेंकतांना त्याला फार मजा वाटावयाची. झाडावर बर्फ पडून तें अगदीं पांढरें सफेत होऊन जातें. त्यावर कुडकुडत येऊन बसणाऱ्या 'रॉबिन 'पक्ष्याची हेन्रीला फार कींव येते. लवकरच डिसेंबरची २३ तारीख येते, व क्रिस्मसचा सण येऊन लहान मोठ्यांना आनंदीआनंद होतो. रूथ क्रिस्मस–कार्डें पाठविण्यांत व हॉली वगैरेनें खोल्या शृंगारण्यांत गढून जाते, तर ममी क्रिस्मस-केक करण्यांत व मुलांच्या पार्टीची व्यवस्था करण्यांत गुंतलेली असते. ममी व रूथ ह्या दोघींना डॅडी थोडथोडी मदत करतो; व तो 'क्रिस्मस-ट्री ' आणून त्यावर रंगांचे विजेचे दिवे सोडून मेणबत्या बसवून लहान लहान खेळणीं अडकवून ठेवतो. पार्टीच्या वेळीं तीं मुलांना द्यावयाचीं आहेत. घराच्या तसबिरींची व चित्रांची नीट मांडणी करून सगळीकडे स्वच्छताही तोच करितो. हेन्री इकडून तिकडे जिनसा आणण्यांत व नानाप्रकारचे प्रश्न विचारण्यांत दंग होऊन गेलेला आहे. जिकडे तिकडे आनंदीआनंद दिसतो आहे.

रात्र पडते. हेन्रीला आंघोळ घालून रूथ नेहमींप्रमाणें त्यास निजण्यास नेते. तो डॅडीममीला 'गुड नाईट' करून डोळे मिटतो. फादर क्रिस्मस पायमोजांत काय काय ठेवील त्याची कल्पना करतां करतांच त्यास झोंप लागते. नंतर रूथनेंही काम उरकून आंघोळ केली. पलंगाला पायमोजा अडकवून ती अंथरुणांत घुसली.

फादर क्रिस्मस म्हणजे डॅडीममीच आहेत हें तिला कळूं लागलें होतें, तरीही आपणास काय काय मिळेल ह्याची माहिती नसल्यानें त्याबद्दल तर्क करीत तीहि निजून गेली. लवकरच डॅडीममींनीं मुलांच्या खोलींत जाऊन 'फादर क्रिस्मस' चें काम केलें, व तींहि झोंपलीं.

चोवीस डिसेंबरचा दिवस उजाडला. हेन्रीरूथनें डोळे उघडले तों त्यांचे मोजे गच्च भरलेले दिसले. फादर क्रिस्मसनें कितीतरी वस्तू त्यांना दिल्या होत्या. त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं!

'पिअर' व 'जोसेफिन'

(फ्रान्स)

हेन्री व रूथ् यांच्या इंग्लड देशाच्या दक्षिणेस एक देश आहे, त्याचें नांव फ्रान्स. या देशांतील एका गांवांत दोन मुलें राहतात. मुलाचें नांव ' पिअर ' व मुलीचें नांव ' जोसेफिन ' असून तीं बहीणभाऊ आहेत. त्यांच्या बापाची थोडीशी शेती असून तो ती घरींच आपल्या बायकामुलांच्या मदतीनें करतो. त्यांचें घर शेतांतच असून बाराहि महिने तीं तेथेंच राहतात. ही मंडळी जेथें राहतात तेथली हवा आपल्या देशांतील हवेइतकी कडकही नाहीं, किंवा इंग्लंडसारख्या उत्तरेकडील देशांतल्या हवेइतकी थंडही नाहीं. बाराही महिने थोडेंबहुत ऊन पडत असल्यामुळें तेथली हवा उबदार व आल्हादकारक असते; त्यामुळें पिअरच्या शेतांत व आसपासही नारिंगें, द्राक्षें, तुती, ऑलिव्ह वगैरे फळें फारच चांगलीं होतात. पिअरचा पोशाख पाहिलात का ? त्याचा तो निळसर पोकळ ब्लाऊज्, घोट्यापर्यंत पोंचलेली लांब विजार, निळसर रंगाचीच भिवयांपर्यंत आलेली सैलशी चपटी टोपी वगैरे सर्वच गोष्टी तुमच्याहून अगदीं निराळ्या आहेत. विशेषत: त्याचे ते लांकडी जोडे फारच चमत्कारिक आहेत, नाहीं ? ते 'बीच' म्हणून तिकडे झाड असतें, त्याच्या लांकडाचे पोखरून केलेले आहेत. ते चालतांना घसरूं नयेत म्हणून त्यांना खालून खिळे मारले आहेत. तुम्ही खडावा घालून चालतांना जसा ' खडाव खडाव ' आवाज होतो, तसाच पिअरच्या जोड्यांचाहि होतो. तुम्हांला जसें खडावांची संवय झाल्यावर झपाझप चालतां येतें तसेंच पिअरलाहि त्यांनीं चालतां येतें. दुसरी विशेष गोष्ट म्हणजे त्यानें पायमोजे घातले नाहींत.



आनंदी फ्रान्स व तेथील सालस मुलें

हवा थंड नसल्यावर उगीच पायमोजे कशाला? शिवाय त्याला सकाळपासून आपल्या बापाबरोबर शेतांत काम करावें लागतें. त्याची बहीण जोसेफिन जेव्हां त्याला शेतांत गवतबिवत काढूं लागते तेव्हां तीहि तसलेच जोडे घालते. मात्र तिचा इतर पोषाख बरीक अगदींच निराळा असतो. तिचा झगा चांगला उंच व सैल असून कमरेजवळ मात्र अगदी घट्ट आहे. जाकिटावरील नक्षी, डोक्याची गलोत्यासारखी वाटोळी, घट्ट, पांढरी टोपी, व घाण लागूं नये म्हणून पुढून बांधलेलें पांढरें फडकें हीं सर्व किती मजेदार दिसताहेत! जशी कांहीं हॉस्पिटल्मधील नर्सच्!

पिअरच्या फ्रान्स देशांतील शेत–जमीन तेथील लोकांचे मानानें अपुरी असल्यामुळें थोडक्याशा जमिनींतच पुष्कळसें पीक काढण्याकरितां पिअरच्या बापाला भारी मेहनत करावी लागते. तसेंच येवढीशी जमीनसुद्धां वाया जाऊं नये म्हणून त्यानें आपल्या शेताभोंवतीं कोठेंहि कुंपण घातलें नाहीं. आपला देश अतिशय मोठा असल्यामुळें आपली कितीजरी जमीन कुंपणा-वारी फुकट गेली तरी त्याचें आपणांस कांहींच वाटत नाहीं. शेताच्या कडेकडेनीं असलेलीं पॉप्लरचीं झाडें पाहिलींत ना? बोर, बाभळ, चिंच, आंबा वगैरे आपलेकडील झाडांहून तीं अगदींच निराळीं आहेत. तीं उंच असून त्यांच्यावर चवरीसारखा नुसताच एक पानांचा झुपका आहे. आपण फांद्या लांब लांब वाढूं देतों, पण ते त्या छाटून टाकतात. कां बरें? आपलेकडे उन्हाळा कडक असल्यामुळें झाडांची थंडगार सावली आपल्या गुरांढोरांना व वाट-सरूंना फारच हवीशी वाटते. परंतु तिकडे तशी स्थिति नसल्यामुळें व पुनः झाडाच्या सांवटींतील जमीन फुकट जाऊं नये म्हणूनही ते झाडें अशीं भुंडीं करीत असतील. शिवाय फांद्यांचा त्यांना सरपणा-

सारखाहि उपयोग होतो. इंग्लंडसारख्या देशांत जेथें कोळसा पुष्कळ सांपडतो तेथें झाडांझुडपांचा जाळण्याचे कामीं फारसा उपयोग करावा लागत नाहीं; परंतु पिअरच्या फ्रान्स देशाची स्थिति तशी नाहीं.

आपलेकडील शेतकऱ्यांचीं मुलें जशीं सकाळींच भाकर व कोरड्यास खाऊन शेतावर जातात, तसाच पिअरहि कॉफी व शेवखंडा-सारखा एक कणकीचा पदार्थ खाऊन शेतावर जातो. मात्र हें खाणें चांगलें पोटभरीचें असतें; कारण तो किंवा त्याचा बाप मधले वेळीं दुपारचे जेवणाकरतां घरीं येत नसून, एकदम संध्याकाळींच ते शेतावरून येतात, व स्वस्थपणें पोटभर जेवतात. आपलेकडील कांहीं लोक तरी मध्यंतरीं चहा घेतात. परंतु पेरी किंवा त्याचे देशांतील इतर लोक केव्हांच चहा घेत नाहींत; कारण त्यांच्याकडे तो होतच नाहीं. कॉफी मात्र खेड्यांपाड्यांतूनसुद्धां घेतात. मग शहरांतून तर विचारायलाच नको. तसेंच त्यांच्याकडे पावबिस्किटांऐवजीं वर सांगितल्याप्रमाणें शेवखंडांसारखीं वाटोळीं कडीं करतात. त्यांचा घेर बराच मोठा असून आपण जसें एकादें लोखंडी कडें बगलेंत घालून चालतों तसें तिकडील लोक हीं कणकेचीं कडीं, तीन तीन चार चार, खांकेंत अडकवून खुशाल इकडे तिकडे जातात! पिअर शेतकामांत जशी आपल्या बापाला मदत करतो तसाच तो बाजाराचे दिवशीं आपल्या आईबरोबर भाजी घेऊन बाजाराला जातो. जोसेफिन घरकामांत आईचे हाताशीं लागते, इतकेंच नव्हे तर घरांतील सर्व धुणेंहि तीच धुते. आपलेकडील शहरांतलेप्रमाणें त्यांचेकडे धुणें घरच्या-घरींच नळांवर किंवा विहिरींवर धूत नाहींत, तर तें नदीवर किंवा ओढ्यावर धुतात. मात्र फार वेळ चिखलांत किंवा पाण्यांत उभें राहावें लागूं नये म्हणून, त्या एका लांकडी पेटींत उभ्या राहतात व गुजराथी बायकांप्रमाणें एका लांकडी दांडक्यानें धुणें धोपटतात;

दगडावर किंवा पायावर हापटीत नाहींत. अर्थात् याच ठिकाणीं इतर बायकाहि येत असल्यामुळें व त्यांच्या गप्पागोष्टी चालत असल्यामुळें जोसेफिनला ताज्या बातम्यांकरितां दुसऱ्या वर्तमानपत्राची गरज भासत नाहीं ! सर्व बित्तंबातमी तिला आपोआपच कळतें !

पिअरचें घर मोठें ऐसपैस असून घरावरील लाल लाल कौलें तर त्याला फारच आवडतात. सगळ्यांना भोंवतालीं बसून शेकतां येईल अशी एक मोठी थोरली शेगडी घरांत असून संध्याकाळचे वेळीं सर्व कामधाम आटोपल्यावर त्यांची आई तेथें बसते व पिअर व जोसेफिन यांना कितीतरी गोष्टी सांगते; अधूनमधून त्यांचा बापही त्यांना छानछान वाचून दाखवितो. कोंपऱ्यांत धुराड्याला लागूनच रुंद रुंद बाक मांडले असून त्या मुलांना तेथें बसून गप्पागोष्टी मारायची फारच मजा वाटते. बाहेरच्या बाजूस एक लहानशीच फुलबाग असून बहुतेक बागकाम मुलेंमुलेंच करतात.

पिअरची मावशी एका शहरांत राहते. तें शहर पिअरच्या घरापासून बरेंच दूर असून फार मोठें आहे. त्याला पॅरिस म्हणतात. पिअर जोसेफिनला नेहमीं सांगतो कीं, या पॅरिस-इतकें मोठें व सुंदर गांव पृथ्वीवर दुसरें असणें शक्यच नाहीं. पिअर व जोसेफिन घरीं फारसें काम नसलें म्हणजे कधीं कधीं त्यांच्या मावशीकडे जातात. त्यांना रॉबर्ट् म्हणून एक मावसभाऊ आहे. त्याचा तो काळा ब्लाऊज्,गुढघ्यापर्यंतची त्याची ती आंखुड विजार, पायांतले पायमोजे व बूट वगैरे ऐटबाज पोषाख पाहून,पिअरला असला पोशाख आपल्यालाहि असावा असें कधीं कधीं वाटतें; परंतु आपल्या शेताच्या कामधंद्याला असला शहरी व खर्चाचा पोषाख काय उपयोगाचा असा समंजसपणाचा विचार मनांत येऊन

तो आपलें समाधान करून घेतो. तो कधीं कधीं रॉबर्टबरोबर त्याच्या शाळेंत, व खेळायलाही जातो. त्याला त्यांचा 'बॅटल् डोर' व 'शटल् कॉक्'चा खेळ फारच आवडतो. शाळेंत जातांना रस्त्यावर दिसणारी एक गोष्ट त्याला फारच चमत्कारिक वाटते. सर्व लोक दुकानांचे आंतले बाजूस बसून खात पीत नाहींत; तर खुशाल बाहेर रस्त्यांवर झाडाखालीं टेबलें खुर्च्या मांडून त्यांवर बसून खातात! झाडांच्या व घरांच्या थंड सावलींत असें करणें त्यांना बरें वाटतें. परंतु आपलेकडील अतिशय कडक हवेंत किंवा इंग्लंडसारख्या अतिशय थंड हवेंत असें उघड्यावर बसून खाण्यांत मजा वाटणार नाहीं.

पॅरिसच्या गडबडीच्या व धांदलीच्या राहणीला कंटाळून पिअर व जोसेफिन् जेव्हां आपल्या शेतावर परत येतात तेव्हां त्यांना आपलें तें मोकळें ऐसपैस स्वतःचें घर, घराबाहेरची आपली ती फुलबाग, आपलें शेत व शेतांतील गुरेंढोरें वगैरे पाहून फारच आनंद होतो; व विशेषतः शेतांतलें काम, कामानंतरचें संध्याकाळचें आईच्या हातचें जेवण, जेवणानंतरच्या शेकोटीभोंवतालच्या बापाच्या तोंडच्या गोष्टी, व त्यानंतरची सुखाची विश्रांति इत्यादि गोष्टींमुळें त्यांना जितका आनंद होतो तितका आनंद त्यांना पॅरिसमध्यें—नाहीं स्वर्गामध्येंहि—होणार नाहीं!

'नील्स्' व 'सोनिया'

(नॉर्वे)

हेन्रीच्या इंग्लंड देशाच्या उत्तरेला नॉर्वे म्हणून एक देश आहे त्यांतील एका खेड्यांत नील्स् नांवाचा एक मुलगा राहतो. नील्स्च्या प्रांताच्या भोंवतालीं व सबंध नॉर्वे देशांतच इतके कांहीं उंच उंच डोंगर आहेत कीं, तो सर्व प्रांत सह्याद्रीच्या डोंगराळ प्रांताप्रमाणें दिसतो. शिवाय तेथें हवाहि अतिशय थंड असल्यामुळें त्याःसर्व डोंगरांवर आपल्या हिमालयाप्रमाणें बर्फच बर्फ पडलेलें असतें. देश इतका थंड व डोंगराळ असला तरी नील्स्ला स्वतःचा देश सोडून पिअरच्या उबदार हवेच्या व सखल प्रदेशांत कांहीं राहावेंसें वाटणार नाहीं ! इतका त्याला स्वतःच्या देशाचा अभिमान आहे !

नील्स्चें गांव दोन उंच डोंगरांचे खिंडींत असून तें इतक्या खोलीवर आहे कीं, तेथपर्यंत भोंवतालच्या समुद्राचें पाणी येत असून तें एक लहानसें बंदरच झालें आहे. सबंध नॉर्वे देशाचे किनाऱ्यानें अशा प्रकारें ५०।५० मैल आंत गेलेले समुद्राचे फांटे कितीतरी आहेत, व उन्हाळ्यांत कितीतरी शौकी लोक अशा ठिकाणीं हवा खाण्याकरितां लांबलांबचे प्रदेशांतून येथें येतात ! त्यांना डोंगरावर उंच ठिकाणीं घेऊन जाण्याचा नील्स्ला एक उद्योगच होऊन बसतो.

नील्स्चा बाप कोळी असून त्याची एक फार सुंदर होडी आहे. त्या होडींत बसून तो मासे पकडण्याकरितां निघाला म्हणजे नील्स्ही

त्याचेबरोबर जातो, व बापाला मोठमोठे मासे पकडायला लागतो. हे मासे घरीं आणल्यावर ते चिरून वाळवून ठेवतात, व त्याच्या पोटांतील एका भागाचें तेल काढतात. याच तेलाला आपण कॉड-लिव्हर असें म्हणतों.

मासे पकडण्याचें हें काम जरा घामट असतें; आणि म्हणून नील्स् यावेळीं एक जुनासा कोट व एक लांडी विजार येवढेंच घालतो. परंतु सणावाराचे दिवशीं त्याचा फारच थाट असतो. त्या दिवशीं तो सद्र्यावरून एकादें नक्षी नक्षीचें जाकीट घालतो; व कमरेला एक सुंदरसा पट्टा बांधतो. नील्स्ला सोनिया नांवाची एक बहीण आहे. या सणाच्या दिवशींचा तिचा थाट तर कांहीं विचारायासच नको! लांब बाह्यांचा एक पांढरा शुभ्र पोलका, त्यावर एक बिन बाह्यांचें लाल लाल जाकीट, खालीं झगझगीत काठांचा एक निळा परकर, त्यावर रंगीबेरंगी मणी लावलेला एक कंबरपट्टा, झुळझुळ वाहणाऱ्या केसांवर खालीं नक्षीचे कांठ असलेली एक मुकुटासारखी घट्ट टोपी, व कमरेवर पुढच्या बाजूनें बांधलेला एक पांढरा शुभ्र रुमाल, असा हा सर्व थाट पाहून 'एकादी परीच डोंगरावरून खालीं उतरली आहे कीं काय' असें तिच्या आईला—व इतरांनाही वाटल्यास नवल काय?

नील्स्च्या चुलत्याचें घर त्याच्या घरापासून बरेंच दूर डोंग-रांत असून नील्स् व सोनिआ कधीं कधीं काकूकडे राहण्यास जातात. घराभोंवतालींच एक शेतही असून, गुरेंढोरेंहि बरींच आहेत. गुरांना खाणें घालणें, पाणी पाजणें, दूध काढणें, लोणी करणें वगैरे बऱ्याचशा कामांत ते दोघेहि आपल्या काकूला बरीच मदत करतात. शेत डोंगरावर असून घर लांकडांचें बांधलें आहे. घरांत बसाउठायला, स्वयंपाकाला, दाणावैरण सांठवायला अशा

निरनिराळ्या जागा असून, त्या, आपण बांधतों त्याप्रमाणें एकमेकांना लागून बांधलेल्या नाहींत, तर अगदीं स्वतंत्र आहेत. घराशेजारींच गुरांचा गोठा व घोड्याचा तबेला आहे. या सर्व जागा तुटक तुटक कां हें तुम्हांला सहज सांगतां येईल. दूधदुभत्याच्या कामाप्रमाणें धुण्यापाण्याच्या व स्वयंपाकाच्या कामांतही मुलें काकूच्या हाताशीं लागतात. या देशांत थंडीच्या दिवसांत लागणाऱ्या भाकरी उन्हाळ्याचे दिवसांतच करून ठेवण्याचा प्रघात असल्यामुळें हें भाकरी करण्याचें काम एका माणसाला उरकतच नाहीं. नील्स्च्या काकूला उन्हाळ्यांतच भाकरी करून ठेवाव्या लागतात, याचें कारण असें कीं, त्या देशांत हिवाळ्यांत किती तरी दिवस सूर्य क्षितिजावर येत नाहीं, व जिकडेतिकडे अगदीं थंड असून काळोख पडलेला असतो, व त्यामुळें कसलेंच काम करणें शक्य नसतें. उलट उन्हाळ्यांत सूर्य नेहमींच आभाळाचे कडेकडेनेंच फिरत असल्या-मुळें मध्यरात्रींहि तो मावळलेला दिसत नाहीं; आणि किती तरी दिसत रात्रीवांचून तसेच जातात. यामुळें उन्हाळ्यांत हवा बरीच उबदार असते, आणि म्हणून हिंवाळ्याची बेगमी उन्हाळ्यांतच करून ठेवण्याची तिकडे चाल आहे.

उन्हाळ्यांत खालच्या खालच्या कुरणांतील गवत संपलें म्हणजे नील्स्चा काका गुराढोरांना आणखी उंचावर घेऊन जाऊन तेथील कुरणांत चरावयास सोडतो. तेव्हां काकाबरोबर नील्स्ही वर डोंगरावर जातो. गुरें वळणेंसवरणें, धारा काढणें इ० कामांची हौस तर त्याला असतेच; परंतु उंच उंच पहाडांवर चढून तेथली मोकळी व स्वच्छ हवा खाण्यांत, आणि उंच निसुळत्या कड्यांवर चढून अवघड जागचें गवत कापून त्याचे भारे बांधण्यांत त्याला विशेष मजा व एक प्रकारची बहादुरी वाटते. उंच कड्यांवरील गवत

खालीं वाहून नेण्याचें काम ते फारच मजेदार रीतीनें करतात. नील्स् सगळा भारा डोक्यावर व एकटाच खालपर्यंत आणीत नाहीं, तर तो जमा केलेलं गवत एका जाळ्यांत कोंबतो, व खालीं सोनियाचे हातांत देतो; ती तें जाळें खालीं काकाचे हातांत देते; व काका तें एका तारेला लटकावून देतो. ही तार उंच कड्यापासून खालीं थेट घरापर्यंत—तारायंत्राचे तारेसारखी खांबाखांबांनीं—बांधून नेली असल्यामुळें तिच्या वरच्या टोंकाला जाळें लटकावून त्याला एक जोराचा हिसडा दिला कीं तें थेट घरांतल्या परसांत जाऊन पडतें ! आहे कीं नाहीं युक्ति ! नील्सूला सगळ्यांत जास्त कोणतें काम आवडत असेल तर तें त्या जाळ्याला हा हिसडा देण्याचें ! जाळें खालीं आलें म्हणजे गवत काढणें, त्याचे भारे बांधून तें वैरण-घरांत रचून ठेवणें वगैरे साधीं कामें तो करीत नाहीं. तीं सोनियानें व काकूनें करावयाचीं !

नील्स्च्या घराभोंवतीं पाइन झाडांचीं कितीतरी दाट जंगलें आहेत. या झाडांची ठेवण सामान्यतः सुरूच्या झाडासारखी असून, त्यांची पालवी खालीं रुंद व वर निमुळती होत जाते. या झाडाचें लांकूड फारच मजबूत, चिंवट, व सरळ दोऱ्यावर कापलें जात असल्यामुळें घरें बांधण्याचे कामीं त्याचा फारच उपयोग होतो. खिडक्या, दारें, कपाटें वगैरेंच्या चौकटी, बाहालें, तुळया, खांब, तक्ते वगैरे सर्वच गोष्टी याच्या चांगल्या होतात. याच लांकडाच्या लगद्यापासून कागद व सालीपासून काड्यांच्या पेट्या होत असून, नॉर्वे देशांतून आपलेकडे येणारा कागद व काड्यांच्या पेट्या आपल्याला नील्सूच पाठवितो असें म्हणण्यास हरकत नाहीं. हीं झाडें पाडणें, तीं चिरकामाच्या कारखान्यापर्यंत वाहून आणणें, हीं सर्वच कामें अतिशय कठीण आहेत. तथापि तींहि मोठ्या युक्तीनें केल्यास

अतिशयच सोप्या रीतीनें व बिनखर्चानें होतात. ही युक्ती तेथील लोक इतक्या मजेदार रीतीनें करतात कीं, नीलस्नें त्या कामांचीं वर्णनें कितीतरी वेळां ऐकलीं असतील, तरी तो जेव्हां जेव्हां आपल्या काकाकडे जातो तेव्हां तेव्हां तो त्याचेकडून पुनः एकदां सांगवून घेतो ! तीं झाडें अशा ठिकाणीं पाडतात कीं, तीं तेथून पाण्याच्या ओघाबरोबर आपोआप खालीं कारखान्यापर्यंत वाहात जातात. वाहत्या पाण्याच्या जोरदार प्रवाहांचा त्या लोकांनीं पाहा कसा उपयोग करून घेतला आहे तो ! याच प्रवाहांचे जोरावर—खोपवलीच्या टाटाच्या कारखान्यांतल्याप्रमाणें—वीज उत्पन्न केली जात असून तिच्या जोरावरच नॉर्वेतील कारखाने चालविले जात आहेत. पाण्याचा आणखी उपयोग कोणता करावयाचा राहिला !

कधीं कधीं मात्र तीं लांकडें पाण्यांत अशीं कांहीं आडवीं तिडवीं गोळा होतात कीं, त्यांचा एक भला मोठा गुंजाडा किंवा जाळें होतें; व हें जाळें स्वतःही पुढें जात नाहीं, व मागाहून येणाऱ्या दुसऱ्या लांकडांनाही पुढें जाऊं देत नाहीं ! व अशा रीतीनें सबंध प्रवाहाचा तुंबारा होऊन राहतो. अशा स्थितींत एकादी गुंतागुंतीची गांठ सोडवितांना आपण मुख्य धाग्याला प्रथम हात घालून हळूहळू बाकीचे सर्व धागे सोडवितों, त्याप्रमाणें मुख्य भानगडीचें लांकूड नीट सरळ करून इतरांचा मार्ग मोकळा करून द्यावा लागतो.. अर्थात् हें काम करतांना माणसाला या लांकडावरून त्या लांकडावर अशा कांहीं शिताफीनें उड्या माराव्या लागतात कीं, कांहीं बोलायची सोय नाहीं ! हातांतली काठी घसरून किंवा पायाखालचें लांकूड निसटून झोंक गेलारे गेला, कीं एकदम गच्छंति व्हावयाची !

असा अडचणीचा प्रसंग आपल्यावर यावा व त्यांतून आपण मोठ्या

शिताफीनें बाहेर निसटावें अशी इच्छा नीलस्ला कितीतरी वेळां होते ! व आपण केव्हां एकदां मोठे होऊं, व हा लांकूडतोडचाचा धंदा करूं असें त्याला होऊन जातें !

कधीं कधीं त्याला आपण शी (Ski) च्या खेळांतील शर्यत कधीं जिंकूं असेंहि होतें. हा शीचा खेळ तिकडे हिंवाळ्यांत बर्फ पडलें म्हणजे खेळावयाचा असतो.आपण आपल्या लांकडी घोड्यांच्या खेळांत ज्याप्रमाणें दोन उंच उंच काठ्यांच्या योगानें लांब लांब ढांगा टाकून पळण्याच्या शर्यती लावतों, त्याचप्रमाणें शीच्या खेळांत बर्फावरून धांवण्याच्या शर्यती असतात. हा खेळ मोठा कठीण व कुसरीचा असून एकादे वेळेस तोल सुटल्यास बर्फावर तोंडघशीं पडून कायमची दुखापत होते. पण नील्स् खेळण्याचा जबर शौकी व महत्त्वाकांक्षीहि असल्यामुळें त्याला असल्या खेळांचें कांहींच वाटत नाहीं !

‘ तुरी ’
(लाप्लंड)

युरोप खंडांत नील्सच्या नॉर्वे देशाचेंहि उत्तरेस लाप्लंड म्हणून एक अत्यंत थंड भाग आहे. तेथें ‘तुरी’ राहतो. तो बाराच वर्षांचा आहे, पण शिकार काय सुंदर करतो ! कारण त्याचा बापही एक कसलेला शिकारी असून, त्यानें तुरीला अगदीं लहानपणापासून शिकार करण्याला शिकविलें आहे.

तुरी वयाचे मानानें जरा ठेंगूच आहे. त्याचे आईबाप व त्या थंड देशांतले सर्वच लोक ठेंगू आहेत. त्याचें नाक बसकें व कपाळपट्टी अगदीं अरुंद असल्यामुळें तो दिसायला कसासाच दिसतो. मात्र आईबापांप्रमाणें तो प्रकृतीनें अगदीं धडधाकट व दणकट आहे. कष्टानें उपजीविका करणारीं माणसें तशींच असतात.

नील्स् व पिअर यांच्या वडिलांचा धंदा बैठा असल्यामुळें त्यांचीं घरेंही एका ठिकाणीं बांधलेलीं व कायम स्वरूपाचीं आहेत. पण तुरीच्या बापाला व त्या प्रांतांतील इतर लोकांना पोटापाण्या-करितां एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं असें सारखें हिंडावें लागत असल्यामुळें त्यांना एका ठिकाणींच कायमचें घर बांधतां येत नाहीं. पुढें पुढें संवयीनें त्यांना एके ठिकाणीं राहणेंहि आवडे-नासें होतें. तुरीचें असेंच आहे. त्याला आपल्या रेनडिअर सांबरांचे मागोमाग सारखें हिंडावेंसें वाटतें.

तुरीच्या बापाचा अशा सांबरांचा एक मोठा कळप असून त्या कळपाची त्याला फारच काळजी घ्यावी लागते. कारण तीं डोळा चुकवून कोठें दूर गेलीं व लांडग्याच्या तडाक्यांत सांपडलीं, तर

त्याचें केवढें नुकसान व्हावयाचें ! पाळत ठेवण्याचे कामांत त्याचे कुत्रे बरेच तरबेज झालेले असून, लांडगा आला रे आला, कीं ते त्याच्यावर भुंकतात, व मालकाला त्याची वर्दी देतात. तुरीला तर या सांबरांइतका उपयुक्त प्राणी जगांत दुसरा कोणताच नाहीं असें वाटतें ! आणि तें त्याचे दृष्टीनें अगदीं बरोबरही आहे; कारण अन्न–पाणी, वस्त्र, घर, वाहन वगैरे मनुष्याच्या आयुष्यांतील ज्या मुख्य मुख्य गरजा त्या सर्व त्याच्या बाबतींत एकटें सांबर भागवितें ! थंडीच्या दिवसांत तुरी सांबराच्या चामड्याचा कोट व कांतड्याची विजार घालतो. त्याच्या टोपीचा मधला भाग जरी कापडाचा असला तरी तिचा पट्टा सांबराच्या फर लोंकरीचाच असतो. त्याचे उंच उंच बूट व जाड हातमोजे हेहि सांबराच्याच कांतड्याचे असतात. उन्हाळ्यांत मात्र तो लोंकरीचा कोट व लोकरीचीच विजार घालतो. हा कोट शिपाई फॅशनचा असून त्याच्या खालच्या बाजूनें व मनगटांवरील 'कपां'वर सुंदर नक्षीकाम केलेलें असल्यामुळें तुरी एकाद्या उमद्या शिपायासारखा दिसतो.

तुरीची होडीच्या आकाराची बर्फावरून चालण्याची एक लहानशी गाडी आहे. तिला तो 'पुल्का' म्हणतो. या पुल्केला तो सांबर जुंपतो, व मोठ्या ऐटीनें लगामाला हिसडा देतो. त्याबरोबर सांबर चालू लागतें. गाडी थांबवावयाची असल्यास तो लगामाला उलट बाजूनें पुनः एक हिसका देतो, व त्याबरोबर सांबर उभें राहतें. ही गाडी हांकलण्याचें काम अतिशय कठिण असून, पहिल्या पहिल्यांदा तुरीची बरीच फजिती होत असे. अगोदर किती तरी दिवस त्याला पुल्केंत स्वस्थपणें बसतांच येत नसे. तो जरा हलला कीं, ती कलंडून तो खालीं बर्फावर हापटत असे; पण हें कांहींच

नाहीं. तो पडला तरी गाडीला जुंपलेलें सांबर उभें न राहतां पुढेंच धांवत सुटे, आणि बिचाऱ्या तुरीला त्याला पकडण्याकरितां त्याचे मागोमाग किती तरी वेळ रडत व ओरडत जावें लागे ! पडण्यापेक्षां त्याला या गोष्टीचें फार वाईट वाटे ! पुढें पुढें त्याला पुल्केंत स्थिरपणें बसतां येऊं लागलें तरी एकादे वेळीं सांबर असें कांहीं अचानक उधळे, किंवा एकदम वळे कीं, तुरीला चांगलाच धक्का बसे ! परंतु हल्लीं मात्र त्याला त्याच्या बापाइतकें चांगलें बसतां येऊं लागलें आहे.

सबंध वर्षभर तुरीला व त्याच्या घरच्या मंडळींना सांबरांच्या कळपामागोमाग जावें लागतें. प्रत्येक ठिकाणीं त्यांना आपला तंबू बरोबर न्यावा लागतो. हा तंबू सांबराच्या कातड्याचा व लोंकरीच्या कापडाचा बनविलेला असतो. जागा ठरवून तंबू घातला म्हणजे मध्यभागीं एक चूल मांडतात, व त्या चुलीवर अन्न शिजविण्याकरितां एक मोठें लोखंडी भांडें तंबूच्या आढ्यापासून लटकावून देतात. नंतर एक लांकडाचा ओंडा पोखरून तान्ह्या मुलांकरितां एक पाळणा तयार करतात; व त्यांत त्याला घालून व तो वरून दोरीनें बांधून, अशा तऱ्हेनें उभा करून ठेवतात कीं, मुलाला चुलींतला जाळ व वर जाणारा धूर हीं तर दिसावींत, पण तें तर पडूं नये !

हिंवाळ्यांत सर्व शेवाळें बर्फाखालीं गडप होतें; तेव्हां सांबरें आपल्या पायांनीं व शिंगांनीं बर्फ उकरून शेवाळें वर आणतात, व तें खातात. कधीं कधीं शेवाळें खूपच खोल जातें, त्यावेळीं सांबरेंहि बर्फांत इतकीं खोल जातात कीं, बर्फावर त्यांच्या शेंपट्यांशिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं !

कधीं कधीं सांबरांच्या वासानें लांडगे तुरीच्या तंबूच्या आसपास

येतात. त्यांची चाहूल लागून सांबरें घाबरलेलीं दिसूं लागलीं, म्हणजे तुरी व त्याचा बाप आपले भाले घेऊन ताबडतोब लांकडी जोडे घालून सज्ज होतात व लांडग्यांचा पाठलाग करितात. हातीं लागतील तितक्यांना मारून व बाकीच्यांना दूर पळवून लावून ते परत तंबूंत येतात; तों इकडे मरून पडलेल्या लांडग्यांना, त्यांचे जीव बचावून उरलेले भाईबंद यथेच्छ खात बसतात ! भुकेलेल्या लांडग्यांना परजातीय सांबरें काय किंवा स्वजातीय लांडगे काय दोन्ही सारखेच ! खाण्याचे बाबतींत त्यांच्या मनाला आपपरभाव मुळींच शिवत नाहीं! लांडगा किती खादाड आहे पाहिलंत ?

बाप बरोबर नसतांनाहि तुरी एकटा शिकार करतो. पक्षी व दुसरे प्राणी यांना फसवून कसें पकडावयाचें हें त्याला चांगलेंच माहित आहे. एकदां तो सबंध रात्रभर एकटाच शिकार करीत होता. रात्रीं झोंप येऊं लागली तेव्हां त्यानें बर्फांतच एक खड्डा खणला, व त्यांत तो खुशाल निजला. त्याला त्या बर्फाच्या उबेंत इतकी छान झोंप आली कीं, तशी झोंप त्याला पुष्कळ वेळां घरीं अंथरुणापांघरुणांतही लागत नसेल !

नील्सूच्या देशांतल्याप्रमाणें तुरीच्या लाप्लंड देशांतही हिंवाळ्यांत कितीतरी दिवस सूर्यदर्शन होत नाहीं.त्याचा अर्थ असा नाहीं कीं,तितके दिवस तेथें अगदीं अंधार असतो.कारण त्या वेळीं तेथें बर्फापासून उत्पन्न होणारा एकप्रकारचा विलक्षण प्रकाश पडलेला असून त्यांतच उत्तर ध्रुवाकडून येणाऱ्या नाना प्रकारच्या रंगांच्या छटांनीं युक्त व देदीप्यमान प्रकाशाची भर पडते. शेंदरी, सोनेरी, निळा,तांबडा,हिरवा इत्यादि रंगांनीं बनलेला तो अलौकिक प्रकाश पाहून तुरीला आश्चर्य वाटतें, व आनंदाच्या भरांत ईश्वराची लीला किती अगाध आहे असा विचार त्याच्या मनांत आल्याचें त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट

दिसतें. तुरीच्या देशांतल्या या असल्या विलक्षण प्रकाशाला आरोरा प्रकाश म्हणतात. तो प्रकाश पाहणें जरी शक्य नसलें तरी त्याच चित्र कोठें पाहण्यास मिळाल्यास अवश्य पाहा.

उन्हाळ्यांत तुरी व त्याच्या घरची सर्व मंडळी सांबरांमागोमाग उत्तरेकडे जातात. कारण तेथील बर्फ आतां वितळूं लागून जिकडे तिकडे सांबरांना लागणारें गवत व शेवाळें वर आलेलें असतें. दलदलीच्या सखल जमिनीवर उन्हामुळें डांस होऊन ते सांबरांना डसूं लागले म्हणजे सांबरें उंच प्रदेशावर जातात, व तीं तिकडे गेलीं म्हणजे त्यांचे मागोमाग तुरी व त्याची मंडळीहि वर जातात. या ठिकाणची उबदार हवा व मंद मंद वारा यांमुळें त्यांच्या मनाला फार बरें वाटतें. तंबू लावून झाल्यावर तुरी आतां न लागणारे कपडे व खाण्याचे पदार्थ लांडग्यांचे तोंडीं पडूं नयेत म्हणून पाईन झाडांच्या खालच्या फांद्या बांधून त्यांचा 'मौजा' तयार करतो, व तेथें ते पदार्थ सुरक्षित सांठवून ठेवतो. उन्हाळ्याचे दिवसांत पुष्कळशीं फुलें, पक्षी व प्राणी दृष्टीस पडत असल्यामुळें तुरीला हे दिवस फारच आवडतात. शिवाय या दिवसांत सूर्य कधींच मावळत नाहीं. अगदीं मध्यरात्रींही तो क्षितिजावर लाल लोखंडी तापलेल्या गोळ्याप्रमाणें दिसतो. हा देखावा पाहून तर तुरीला अतिशय आनंद होतो, व या आनंदाच्या भरांतच तो झोंपीं जातो.

'यान' व 'बेत्च'

(हॉलंड)

यान मोठा नशीबवान पोरगा आहे ! त्याचा देश हॉलंड हा पिअरच्या फ्रान्स देशाशेजारींच जरा उत्तरेस आहे. सबंध युरोप खंडांत हॉलंडचे डच लोक अतिशय स्वच्छ म्हणून नांवाजलेले आहेत. यान वयानें लहान असला तरी त्याचा सर्व पोषाख मोठ्या माणसासारखा असल्यामुळें, तो केवढा थोरला तरी दिसत आहे ! त्याची विजार आपलेकडील काबुली लोकांचे चोळण्याप्रमाणें कशी सैल व अघळपघळ आहे पाहा! यान् सारखा आणखी एक मुलगा तिच्यांत सहज मावेल ! त्याच्या कमरेचा तो रुंद पट्टा व त्यावरील चांदीचीं बटणें पाहा. त्याचा निळा पोकळ सद्रा पिअरच्या सद्र्यासारखा विजारीवर मोकळा सुटला नसून तो विजारींतच अडकावून टाकला आहे हें बरें आहे; नाहींतर आणखी बोंगा झाला असता! त्याचे जोडेही पिअरच्या जोड्यासारखेच लांकडाचे केलेले असून तेही चालतांना मोठ्यांदां वाजतात. त्याची टोपी बरीच मोठी असून आपल्या कानटोपीच्यासारखा तिला एक गोंडा आहे.

घरांत शिरतांना यान इंग्रज मुलांप्रमाणें आपले जोडे घालून आंत जात नाहीं, तर आपल्याप्रमाणेंच तो ते बाहेर रांगेनें लावून ठेवून नंतर घरांत शिरतो. एकतर बाहेर रस्त्यावर बरीच धूळ व चिखल असतो, व दुसरें असें कीं, घरही अतिशय स्वच्छ असतें. सर्व भिंतींना बाहेरून निळा रंग दिला असून खिडक्या मात्र पांढऱ्याच आहेत. कठडे मात्र हिरव्या रंगाचे आहेत. यानच्या गांवांतलीं किंबहुना सबंध हॉलंडमधील सर्वच घरें त्याच्या घरासारखीं आंतून बाहेरून अगदीं स्वच्छ, झकपक व नीटनेटकीं



समुद्र सपाटीखालील हॉलंड व बाळसेदार डच मुलें

असतात. आंतून भिंतींच्या निम्या भागांवर मंगलोरी कौलासारख्या कौलांचे तुकडे बसविले असून त्यांना निळा रंग दिलेला असतो, व वरच्या अर्ध्या भागाला नुसता चुनाच दिलेला असतो. जमिनीहि कौलाच्याच केलेल्या असून मधल्या फटी बारीक वाळूनें भरून काढलेल्या असतात. भिंतींवर तसबिरा टांगल्या असून यान् व त्याची बहीण बेत्च् (Betje) यांना त्या बऱ्याच आवडतातसें दिसतें. एकंदर घर अगदीं कोरें, जसें कांहीं नुकतेंच बांधलें आहे असें दिसतें. परंतु वास्तविक तें कोरें नसून यानची आई तें घर व त्यांतील सर्व सामानसुमान–भांडींकुडींसुद्धां–रोजच्या रोज घांसून पुसून स्वच्छ करून ठेवते, म्हणून तें तसें दिसतें. यानच्याच आईला हा विशेष शोक आहे असें नसून त्या गांवांतील व हॉलंडमधील सर्वच स्त्रिया आपलीं घरें अशाप्रकारें स्वच्छ व निर्मळ ठेवतात.

यानची आई एकाद्या सुखवस्तु बाईप्रमाणें अंगानें स्थूल व हंसतमुख दिसते. तिचा झगा तिच्या अंगाला इतका जो फिट्ट व रेंखून बसलेला दिसतो तो ती लठ्ठ आहे म्हणून नव्हे, तर त्याचे आंतून एकावर एक असे किती तरी दुसरे लहान कपडे तिनें आंगांत घातले आहेत म्हणून. तिची टोपी पांढरी शुभ्र व इस्तरी केल्यासारखी अगदीं कडक असून तिच्या दोहोंबाजूंस कान झांकण्याकरितां झांकणें आहेत. थंडीकरितां किती ही तरतूद पाहिलीत ? बेत्चा पोषाखही थेट आईसारखाच असून तिचे गुलाबी गाल, भुरे केस, निळे पाणीदार डोळे–सर्व कांहीं अगदीं आईसारखें आहे. या कपड्यांच्या योगानें तीहि वयाच्या मानानें किती मोठी दिसते आहे पाहा !

यानचा बापही नील्सूचे बापासारखाच कोळी आहे. तो ईल

मासे पकडण्याकरितां समुद्रावर जातो तेव्हां यानही बापाला पोंचविण्याकरितां किनाऱ्यापर्यंत जातो, व त्याची दूर दूर जाणारी होडी शेवटपर्यंत दिसावी म्हणून समुद्रकांठच्या एका मोठ्या रुंद बांधावर उभा राहतो. पुढें निळा समुद्र, व मागें खोल जमीन असा विलक्षण देखावा पाहून त्याला आश्चर्य वाटतें का नाहीं कोणास ठाऊक ! पण तिऱ्हाइताला तरी तें खास वाटतें ! कारण नेहमींची जमीन समुद्रसपाटीपासून थोडीशी कां होईना उंच असते असें आपण पाहतों. पण येथें तर उलट दिसतें ! परंतु वस्तुस्थितीच अशी आहे कीं, हॉलंड हा देश अतिशय सखल असून त्याचा बराचसा भाग पूर्वीं पाण्याखालीं असून आतां मात्र तें पाणी वाहून गेल्यामुळें तो उघडा पडला आहे. समुद्राचें पाणी पुनः पुढें येऊन कांठच्या लहान लहान गांवांची व शेतांची नासाडी होऊं नये म्हणून कांठाकांठानें इतके कांहीं भक्कम व मोठमोठे बंधारे बांधले आहेत कीं, त्यांवरून आगगाड्यासुद्धां जातात–येतात. तसेंच त्याला भेगा पडूं नयेत म्हणून सर्व काम कॉंक्रीटचें केलें असून, एकादी भेग पडलीच तर बंधारा एकदम ढांसळूं नये म्हणून कडेनें मोठमोठे पॉप्लरचे वृक्ष लाविले आहेत. तसेंच त्यावर सारखी देखरेख ठेवांवी लागते, नाहीं तर एकदम एकादें भगदाड पडून गांवेंच्या गांवें बुडून जावयाचीं !

या मोठ्या बंधाऱ्यावर उभें राहून यान जेव्हां मागें जमिनीकडे पाहतो तेव्हां आणखी किती तरी लहानसान बांध, कालवे व पवनचक्क्या त्याचे नजरेस पडतात. तेथें एंजिनांच्या ऐवजीं पवनचक्क्यांचाच इतका उपयोग कां केला असेल तें तुम्हीं ताडलेंच असेल. पावसाचें व इतर जें कांहीं पाणी जमिनींत सांचतें तें सर्व या कालव्यांत येऊन तेथून तें पवनचक्क्यांचे जोरावर चाललेल्या

शेंकडों पंपांनीं उपसून शेजारचे समुद्रांत टाकून देण्याकरितां या सर्व कालव्यांची व पवनचक्क्यांची योजना केलेली आहे. पाहिलंत, समुद्रानें गिळलेली जमीन त्याच्या घशांतून काढून घेण्याचा केवढा दांडगा प्रयत्न हा! मनुष्या, तुझी शर्थ आहे!! याच पवनचक्क्यांचे जोरावर लांकडें चिरण्याच्या व धान्य दळण्याच्या किरकोळ गिरण्याहि चाललेल्या असतात. याच कालव्यांतून मोठमोठीं मालाचीं गलबतें कांठावरून चालणाऱ्या माणसांकडून किंवा घोड्यांकडून चालविलीं जातात.

हिंवाळ्यांत या कालव्यांतील पाणी गोठून त्याचें बर्फ झालें म्हणजे यान त्यावर स्केटिंग करतो व हें करतांना बुटाला खालीं लावलेलीं चाकें फिरून तो घसरत घसरत खालीं जातो, तेव्हां त्याला फारच मजा वाटते. लहान बेत्चूहि स्केटिंग चांगलें करते. या देशांतील अगदीं लहान लहान मुलांनाही तीं चालूं लागल्यापासून स्केटिंग येतें; व त्याचा नाद म्हातारपणीं सुद्धां सुटत नाहीं. या मुलांच्याच आजीला इतक्या म्हातारपणींसुद्धां कधीं कधीं स्केटिंगची हुक्की येते! स्केटिंगप्रमाणेंच मुलांना पोहणेंहि अगदीं लहानपणापासून शिकविण्यांत येतें; कारण रोज कालव्यांशीं व समुद्राशीं गांठ पडत असल्यामुळें प्रत्येकाला पोहतां आलेंच पाहिजे. स्केटिंग्‌शिवाय यानला बर्फावर होडी चालविण्याचा, किंवा स्लेज–गाडींत बसून बर्फावरून घसरत जाण्याचा, किंवा बर्फावरील हॉकी खेळण्याचा भारी नाद आहे. खेळून खेळून अंगांत बरीच उष्णता उत्पन्न होत असल्यामुळें व घरांतही कोळशाची शेगडी सारखी पेटलेली असल्यामुळें त्याला थंडीचा कांहींच त्रास होत नाहीं.

हिंवाळा संपून उन्हाळा लागला रे लागला कीं, यान बेत्चूला

घेऊन मोठमोठ्या फुलबागांत जातो; व तेथील सुंदर सुंदर व चित्रविचित्र रंगांच्या ट्यूलिप, हयासिंथ वगैरे फुलांची शोभा पाहण्यांत दंग होतो. बागेच्या मध्यभागीं एक मोठा उंच व जाड खांब पुरला असून त्याचे टोंकावर बागेंतील बगळ्यांना बसण्यासाठीं एक लहानसा वाटोळा कट्टा केलेला असतो. बगळ्यांची इतकी बडदास्त उगीच नाहीं राखली जात. कारण ते पाणथळ जमिनींत राहणाऱ्या खेंकड्यांना व इतर जीवजंतूंना खाऊन टाकून बागाइताचा बचाव करतात. यानचे घराशेजारीं फुलझाडांप्रमाणेंच निरनिराळ्या फळबागाही असून त्यांत कितीतरी प्रकारचे कंद व गड्डे तयार होतात. सबंध हॉलंड देशच अशाप्रकारच्या कंदमुळांबद्दल प्रसिद्ध असून इंग्लंडसारख्या आसपासचे देशांत रोज जहाजावारीं कंद व इतर भाजीपाला येथून रवाना होतो.

नॉर्वेतील नील्स्‌प्रमाणें यान्‌ही कधीं कधीं आपल्या चुलत्याकडे राहण्याला जातो. चुलत्याची थोडीशी शेतवाडी असून कांहीं गुरेंढोरेंहि आहेत. त्याचा चुलतभाऊ पीटर जेव्हां गायींना वैरणपाणी घालतो, किंवा दूध काढून त्याचें ताक, लोणी, चीज् वगैरे करतो, तेव्हां यान्‌ही त्याला मदत करतो. त्या घरांतील सर्वच माणसांना गायींबद्दल भारी प्रेम वाटत असून तीं त्यांची अतिशय काळजी घेतात. गोठ्यांतील जमिनी व भिंती, घरांतल्या जमिनी व भिंतीइतक्याच स्वच्छ व सुंदर असून, गायींच्या शेपट्या शेणानें लडबडूं नयेत म्हणून त्या वरचेवर बांधून ठेवण्याची व्यवस्था केलेली असते. त्यांना घालावयाचें गवतही ताजें, हिरवेंगार, व मऊ लुसलुशीत असतें. त्यांना थंडी वाजूं नये म्हणून त्यांचे अंगावर रोज झुली घालतात. गायींहि पीटरवर व त्याच्या बापावर अगदीं खूष असून एकेक गाय चांगलें वीसवीस शेर दूध देते. अर्थात् इतकें सर्व दूध

व त्यापासून निघणारें चीज यांची त्यांना चांगलीच किफायत होते. पीटरच्या गांवांत दुधाच्या कितीतरी डेअऱ्या असून तेथील बहुतेक लोकांचा धंदा गवळ्याचाच आहे.

पीटर बाजारांत दूध नेतो तें आपलेकडील प्रमाणें खांद्यावर कावड घालून तिच्यांतून नेत नाहीं, तर त्याची एक लहानशी कुत्र्याची गाडी आहे, तिच्यांतून नेतो. त्याचा कुत्रा 'बेप्' आपलेकडील कुत्र्यापेक्षां बराच मोठा व सशक्त असून त्याला गाडींतून दुधाच्या चरव्या किंवा घरांतील दुसरीं लहान लहान मुलें ओढून बाजारांत घेऊन जाण्याचें कांहींच वाटत नाहीं. बाजारांत जमणारें सर्व चीज कंदांप्रमाणेंच बोटींतून इंग्लंडला पाठविण्यांत येतें; कारण तें इंग्रज लोकांना अतिशय आवडत असल्यामुळें त्याला इंग्लंडांत चांगलाच भाव येतो.

पीटरच्या घरांत अंथरुणाच्या वळकट्या वगैरे कोठेंच दिसत नाहींत हें कसें ? त्याच्या घरचीं माणसें मुळीं निजतच नाहींत कीं काय ? सर्व बिछाने कपाटें, दारें, फळ्या वगैरेंच्या आड ठेवलेले असून निजण्यापूर्वी ते कधींहि पसरून ठेवीत नाहींत. नाहींतर ते मळतात. निजावयाची वेळ झाली कीं ते उलगडावयाचे व एकदां जें गुपचीप निजावयाचें तें एकदम दुसरे दिवशीं सकाळीं जागें व्हावयाचें !

‘कार्ल’ व ‘जेनेट’

(स्वित्सरलंड)

आल्प्स् पर्वतांत स्वित्सरलंड म्हणून एक देश आहे. त्यांतील एका गांवांत कार्ल (Karl) व जेनेट (Geannette) हीं मुलें राहतात. या मुलांचें हें गांव नील्स्च्या गांवाप्रमाणेंच एका दरींत असून, भोंवतालीं कोठेंहि पाहिलें तरी उंच उंच डोंगर व त्यांचीं बर्फाच्छादित शिखरें यां-शिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं!

कार्लच्या गांवांतील रस्ते फरशीचे असून, तिचे सर्व दगड पाण्यानें झिजून अगदीं गुळगुळीत झाले आहेत. आंत पाणी येऊं नये ह्मणून घराच्या सर्व खिडक्यांना व दारांना मोठमोठ्या झडपा लावल्या असून, त्यांच्या हिरव्या रंगानें सर्व घरें कशीं छानदार दिसतात. गांवाच्या मध्यभागीं एक मोठें मोकळें पटांगण असून, लोणी, चीज, भाज्या, वगैरेंचा बाजार तेथेंच भरतो. घरोघरचीं मुलें घरांत पुरून उरलेलें लोणी घेऊन बाजारांत विकण्याकरितां जमतात किंवा झऱ्यावर पाणी भरण्याकरितां जमतात, तेव्हां गप्पा--गोष्टीचे भरांत कितीतरी वेळ तेथेंच उभीं राहतात! कोठेंही जा, मुलें येथून तेथून सारखींच !

कार्लचा बाप शेतकरी असला, तरी तो बऱ्याचशा गाई व मेंढ्याही पाळतो. इकडे बहुधा सर्व शेतकऱ्यांचीं सामान्यत: दोन घरें असतात; एक हिंवाळ्यांत राहण्याकरितां डोंगराच्या पायथ्याशीं, व दुसरें उन्हाळ्यांत राहाण्याकरितां डोंगरावर. सबंध हिंवाळाभर कार्लच्या घरची मंडळी दुसऱ्या मजल्यावर राहात असून तळमजल्यांत गुरें ढोरें बांधलेलीं असतात. नील्स्च्या नॉर्वे देशांतल्याप्रमाणें येथें गुरांकरतां निराळे गोठे बांधलेले नसतात. हिंवाळ्यांतील थंडी संपून केव्हां एकदां उन्हाळा लागतो, असें सर्वांनाच होऊन जातें !



गगनचुंबी आल्पस् व तेथील निरोगी मुलें

कारण उन्हाळा लागला ह्मणजे ४ महिने सर्व गुरें वर पर्वतावर चरावयास जातात;व अर्थातच घरांतील पुरुषमंडळीहि वरच वस्ती करतात. चार महिने घरांत अडकून पडल्यामुळें जो कंटाळा आलेला असतो तो अशा रीतीनें घालवून टाकावयाला मिळाल्यामुळें त्यांना फार बरें वाटतें. कार्लला नीलस्प्रमाणेंच डोंगरावर गुरें घेऊन जाण्यांत फारच मजा वाटत असून तो त्याकरितां अगदीं हुरळलेला असतो. डोंगरावर गुरें चरायाला सोडून जेव्हां का सर्व मुलें मोकळ्या मैदानावर जमून एकादा खेळ खेळतात, किंवा गप्पा मारीत बसतात, किंवा कळपांतील एकादी शहाणी गाय पुढें होऊन सर्व कळप तिच्या मागोमाग चरत फिरतो व त्यांच्या गळ्यांतील घंटा जेव्हां घणघण वाजतात तेव्हां जी कांहीं मजा येते ती विचारावयासच नको! जसं कांहीं हिंदुस्थानांतलं गोकूळच तिथं अवतरलं आहे!

कार्लच्या घराचे आसपास गायींना चरावयाला कुरणें नसतात असें नाहीं, परंतु तीं फक्त हिंवाळ्याकरतांच राखून ठेवलीं असल्यामुळें गुरांना उन्हाळ्यांत तेथें चारण्याची मनाई असते; व म्हणून त्यांना डोंगरावरच न्यावें लागतें.

हे डोंगर उंच उंच असून तेथील कुराणांत इतकें सुंदर गवत उगवतें व त्या गवताला इतकीं लहानलहान व चित्रविचित्र रंगांचीं फुलें आलेलीं असतात कीं, एकदंर देखावा फारच रमणीय दिसतो. वास्तविक अशाच कुरणांना 'आल्प्स्' असें मूळ नांव आहे; परंतु आतां मात्र तें नांव सबंध पर्वताला लावतात. कार्लच्या बापानें हें उन्हाळ्याचें घर एका निराळ्या प्रकारचेंच बांधलेलें असतें. तें लहानशा झोंपडीसारखें असून, लांकडाचें केलेलें असतें. वरील हलकें छपर वादळांत उडून जाऊं नये म्हणून त्यावर मोठमोठे

दगड ठेवलेले असतात. हा चार महिन्यांचा थारेपालट कार्लच्या व त्याच्या बापाच्या प्रकृतीला फारच चांगला मानवतो. उंच डोंगरावरील शुद्ध व मोकळी हवा, गुरें वळणें, धारा काढणें वगैरे-सारख्या कामांत होणारा भरपूर व्यायाम, लोणी, भाकर, फळें इत्यादि सारखें साधें सात्त्विक अन्न, इतक्या गोष्टी असल्यावर प्रकृति सुदृढ व निकोप बनल्यास व वृत्ति आनंदी राहिल्यास आश्चर्य तें कसलें! प्रकृति चांगली राहण्यास मांस अगदीं आवश्यकच आहे असें नाहीं. इंग्लंडसारख्या देशांत जेथें तें असेल तेथें ठीकच आहे; परंतु कार्लचे देशांतल्याप्रमाणें जेथें तें नाहीं तेथें प्रकृतीचें त्यावांचून अडतेंच असें नाहीं.

चरण्याच्या भरांत जेव्हां गुरें लांब लांब पांगतात आणि धारेची तर वेळ होते, तेव्हां त्यांना गोळा करण्याकरितां कार्ल एक मोठें लांब शिंग वाजवितो; व त्याचा आवाज त्या दऱ्याखोऱ्यांत इतका कांहीं घुमत राहतो कीं, सर्व गुरें – तीं कितीहि लांब असलीं तरी– तो ऐकल्याबरोबर घराकडे वळतात. आपल्या बापाला दुरून हांक मारायची झाल्यासही कार्ल असेंच शिंग फुंकतो.

गुरांच्या पायापेक्षां शेळ्यामेंढ्यांच्या पायाची रचना कांहीं निराळी असल्यामुळें डोंगरांच्या अगदीं वरच्या टोंकावर गुरांना जातां येत नाहीं, अशा अवघड ठिकाणीं शेळ्या मेंढ्या सहज जाऊं शकतात. परंतु एकादे वेळेस त्यांच्यापैकींहि एकाद्याचा पाय घसरून तें पडतें व दिसेनासें होतें; तेव्हां त्याला शोधून काढतांना शेतकऱ्याच्या जिवाची काय त्रेधा उडते! व एकादे वेळीं उंच उंच कड्यांतून जातां येतांना त्याचाच पाय घसरून तो स्वतःच अडकून बसतो!

आतां हिंवाळ्याला सुरुवात होणार असें दिसतांच कार्ल व

त्याचा बाप सर्व गुरेंढोरें वळून आपल्या खालच्या घरीं येतात. कारण नंतर डोंगरावर राहणें अत्यंत धोक्याचें आहे. एकदां का बर्फाचीं वादळें व बर्फाच्या वर्षावामुळें डोंगरांचे कडे कोसळण्यास सुरुवात झाली म्हणजे डोंगरांवरील घरेंदारेंचशीं काय पण मोठेमोठे वृक्ष व कधींकधींतर सबंध गांवचेगांव वाहून जातात ! कार्लच्या खालच्या घरांतही चोंहोंबाजूंनीं इतकें कांहीं बर्फ सांचतें कीं, इकडून तिकडे जाण्यायेण्याकरितां नेहमींच्या गाड्यांचे ऐवजीं आतां बर्फावरच्या गाड्याच वापराव्या लागतात. कार्लचा या दिवसांत खेळावयाचा खेळ मुख्यत: नीलसूच्या 'शी' सारखाच असतो. कधीं कधीं तो 'टबॉगनिंग' चा खेळहि खेळतो.

कार्ल व जेनेट यांना या दिवसांत गुरांढोरांचें कांहींच काम नसल्यामुळें हे चार महिने तीं अगदीं खेळण्याखिदळण्यांतच घालवीत असतील असें तुम्हांला वाटेल. परंतु हें खरें नव्हे. गुरांना चारापाणी घालणें, धारा काढणें वगैरे किरकोळ काम त्यांना असतेंच, पण त्याशिवाय या दिवसांतलें म्हणून आणखी एक काम त्यांना करावें लागतें. कार्लचा बाप व त्या देशांतील एकंदर सर्वच पुरुष उन्हाळ्यांत मुख्यत: गुराख्याचें काम करीत असले, तरी इतर वेळीं ते आपली सुतारकीच्या हत्यारांची पेटी काढून,त्यांनीं कांहींना, कांहींतरी लांकडी वस्तु करीत असलेले दृष्टीस पडतात; व मोठ्या माणसांचें पाहून कार्ल व इतर मुलेंहि कितीतरी लांकडी सामान – निरनिराळे प्राणी, पेट्या, फुलें वगैरे – तयार करतात. पेटींतील हत्यार घेऊन कांहींना कांहीं ताशीत बसण्याचा त्यांना नादच असतो. जेनेटही कधीं स्वस्थ बसायाची नाहीं. आईप्रमाणें तीही लेस नाहींतर दुसरें कांहीं तरी करण्यांत गुंतलेली असते. याच जिनसा पुढें ते उन्हाळ्यांत हवा खाण्याकरितां म्हणून जे शौकी व

हौशी लोक त्यांच्या गांवीं येतात त्यांना विकतात, व बराचसा पैसा कमावतात. पाहिलीत त्या मुलांची रिकामपणची कामगिरीहि कशी किफायतीची असते !

कार्ल व जेनेट यांचा पोषाख बराचसा यान् व बेत्‌च् यांच्या पोषाखासारखाच असतो. मात्र तो तितका झकपक, नीटनेटका व सुंदर नसतो. स्वित्सर्लंडमध्येंहि हॉलंडप्रमाणेंच मोठीं माणसें व लहान मुलें यांच्या पोषाखाच्या पद्धतींत कांहींच फरक नसतो. आपलेकडेहि खेड्यांतून लहान मुलगे बापासारखेच आंगरख पागोटें घालून वावरत नाहींत काय ? फरक येवढाच कीं, बापाचें पागोटें मोठें, तर मुलाचें लहान ! जेनेटचा झगा आईच्या झग्यासारखाच घोळदार व रेघोरेघांच्या कापडाचा केलेला असतो, तर कार्लच्या अंगांतही बापासारखाच एक लोंकरीचा शर्ट व डोक्याला एक फेल्ट्‌ची टोपी असते.

कार्लचा चुलता त्याच्या बापाप्रमाणें शेतकरी व गवळी नाहीं, किंवा तो नील्स्‌च्या बापाप्रमाणें कोळीहि नाहीं; त्याचा धंदा उन्हाळ्यांत आल्प्स् पर्वतावर हवा खाण्यास येणाऱ्या लोकांना उंच उंच डोंगरांवर सिध्या व सुरक्षित वाटांनीं घेऊन जाऊन, तेथील पाहण्यासारखीं ठिकाणें दाखविणें हा आहे. तो वाट दाखवितो म्हणून त्याला वाटाड्या किंवा गाईड् म्हणतात. तो स्वतः फारच मजबूत असून उंच उंच कड्यांवरून चालण्याचे कामांत फारच तरबेज आहे. प्रवाशी लोक डोंगरांवरून चालण्याचे कामांत फारच कच्चे व त्यांपैकीं एकादा तर फारच घाबरट आहे, असें त्यास दिसून आलें तर तो सगळ्यांच्याच कमरेभोंवतीं एक लांब दोरखंड बांधतो, व मग ती माळकाच्या माळका हातांतील उंच उंच काठ्यांचा टेकू घेत घेत वर जाते; एकाद्याचें पाऊल घसरून तो

कोलमडलाच तरी बाकीच्यांच्या वजनामुळें तो 'दे माय धरणी ठाय' करीत नाहीं! हें एकंदर काम मोठें कठीण व कधीं कधीं तर धोक्याचेंहि असतें. मग हे लोक इतके कष्ट घेऊन सुखाचा जीव दुःखांत घालतात तरी कशाला? पण मनुष्याचा मोठेपणा तर यांतच आहे कीं, सृष्टीचा नक्षा पार उतरावयाचा! पाहावयाचें असें कांहीं ठेवायाचें नाहीं. तो मनांत म्हणतो 'आल्प्स्ची येवढी काय मोठी बिशाद! तो कितीहि उंच व कठीण असेना, मी त्याच्या डोक्यावर पाय ठेवीनच ठेवीन'! व अशा रीतीनें त्यानें खरोखरीच आल्प्सचें शिखर गांठलें म्हणजे त्याला स्वतःच्या शक्तीची जाणीव होऊन त्याला फार आनंद होतो. शिवाय सर्व कांहीं गोष्टी त्याला पहाव्याशा वाटतात, व त्या पहाण्यास मिळाल्या म्हणजे त्यास फार आनंद होतो.

कार्लेच्या चुलत्याला डोंगरांतल्या सर्व वाटा ठाऊक आहेत; परंतु एकंदर डोंगर इतका वळणावळणाचा व वाटा इतक्या गुंतागुंतीच्या आहेत कीं एकदां त्याचाहि रस्ता चुकला! तो चार तास रस्ता शोधीत होता, परंतु बिचाऱ्याला कांहीं तो सांपडला नाहीं. शेवटीं तो अतिशय थकला व तेथेंच बेशुद्ध होऊन पडला! परंतु सुदैवानें सेंट बर्नार्डच्या कुत्र्यांना त्याचा वास लागून ते तेथें आले, व त्यांनीं त्याला सेंट बर्नार्डच्या मठींत नेऊन सोडलें. पुढें तेथील महंतांनीं योग्य ते उपचार करून त्याला शुद्धीवर आणलें, व नंतर तो आपल्या घरीं सुखरूप परत आला. सेंट बर्नार्डनें अशी मठी तेथें स्थापिली नसती व संकटांत सांपडलेल्या माणसांचा तलास करून त्यांना मठांत आणून सोडण्याचें कुत्र्यांना शिकविलें नसतें, तर कार्लेचा चुलता व त्याच्यासारखेच वाट चुकलेले आणखी किती तरी लोक जिवंत परत आले नसते. धन्य त्या कुत्र्यांची व त्या सेंट बर्नार्डची!

' हान्स् ' व ' ग्रेत्शेन् '

(जर्मनी)

स्वित्सर्लंडचे जवळच पूर्वेस जर्मनी म्हणून एक देश आहे. त्या देशाचा सॅक्सनी या नांवाचा एक भाग आहे. त्यांतील एका गांवांत हान्स व ग्रेत्शेन हीं मुलें राहतात. या मुलांचा बाप एक सामान्य शेतकरी असून त्याचें घर गांवाचे एका टोंकास आहे. या बाजूचें हें घर बहुतेक शेवटचेंच असून तेथूनच जवळच्या जंगलाला सुरुवात होते. घर बैठें व एक मजलीच असलें व तें साध्या दगडांविटांचेंच बांधलेलें असलें तरी त्यांत हवा व उजेड भरपूर खेळत असल्यामुळें तें लहानसेंच घर मोठें टुमदार दिसतें. घरांतील खिडक्यांना आपलेकडील प्रमाणें दोनच दारें नसून बाहेरून दोन व आंतून दोन अशीं चार दारें आहेत. अशा प्रकारच्या दुहेरी दारांचा एक फायदा असा होतो कीं, त्यामुळें बाहेरील थंड हवा व आंतील उबदार हवा या अगदीं अलग राहून आंतील थंडीचें एकंदर प्रमाण बरेंचसें कमी होतें.

हान्स व ग्रेत्शेन यांचें घर कांहीं कमी हवाशीर नाहीं; परंतु या मुलांना मोकळ्या उघड्या हवेचा नादच इतका भयंकर आहे कीं, उन्हाळ्याला सुरवात होण्याचा अवकाश, कीं तीं बहुतेक घराबाहेर भटकत असलेलीं दृष्टीस पडतात. तसें म्हटलें तर सर्वच देशांतील मुलांना घरांत बसून राहण्याऐवजीं बाहेरच्या उघड्या हवेंत भटकायाला आवडतें. परंतु हान्स व ग्रेत्शेन यांचा, व जर्मनींतील इतर मुलांचाही हा शोक कांहीं और आहे !

उन्हाळ्याचे दिवसांत हान्स व ग्रेत्शेन सकाळीं सहाचे सुमारास निजून उठतात. आपलेकडे सहा वाजतां सूर्य उगवण्याचे बेतांत,

किंवा फार तर उगवलेला असतो. परंतु जर्मनींत उन्हाळ्यांतले दिवस फारच मोठे असून तेथें पहाटे चार वाजतांच उजाडून सूर्योदयही होतो ! उठल्याबरोबर तोंड, केस वगैरे साफसूफ करून व पोषाख बदलून मुलें न्याहारीला बसतात. ही न्याहरी इंग्लंडांतल्या-प्रमाणें मोठी पोटभराची नसते. एक पेलाभर दूध किंवा कॉफी व त्याचेबरोबर लोणी लावलेल्या पावाच्या एक दोन फांकी येवढेच पदार्थ त्या वेळीं असतात. न्याहारी झाल्याबरोबर हान्स व ग्रेतशेन् आपल्या पुस्तकाच्या पिशव्या पाठीवर बांधून—आपलेकडील प्रमाणें बगलेंत लोंबत्या लटकावून नव्हे—व बरोबर मधल्या सुटींत खाण्याकरितां सँड्विचेस घेऊन शाळेंत जाण्याकरितां बाहेर पडतात. अगोदरच बाहेर भटकण्याची हौस, अन् त्यांतून सकाळची शाळा ! मग काय विचारतां ! त्यांच्या स्वाभाविक इच्छेला राजरोसपणाचें स्वरूप मिळून मुलांना सकाळच्या प्रहरीं शाळेंत जातांना अतिशय आनंद होतो. बारा वाजतां शाळा सुटली कीं मुलें घरीं येतात; व कधीं कधीं गायन, चित्रकला, खेळ, हस्तव्यवसाय वगैरे विषयांच्या तासांना पुनः दोन वाजतां परत शाळेंत जातात. येवढ्या लहानपणापासूनच जर्मन मुलांना भारी काम असतें, नाहीं ? पण त्याशिवाय जर्मन माणसांना पुढें मोठेपणीं सतत उद्योगाची जी संवय लागलेली दिसते ती कशी लागली असती ? प्रत्येक वर्गांत एका कोंपऱ्यांत एक मोठी भट्टी बांधलेली असून तिच्यांतील रसरशीत निखाऱ्यांमुळें सबंध वर्ग कसा उबदार राहतो ! बाहेर किती क्रा थंडी असेना, आंत तिचा मागमूसही नसतो !

हान्सचा पोषाख इतर मुलांचे पोषाखाचे मानानें बराच साधा असतो. उघड्या गळ्याचा एक शर्ट, त्यावर कमरेपर्यंतचा एक कोट, गुढग्यांपर्यंत पोंचणारी एक आंखूडशी विजार, खालीं पाय-

मोजे व बूट, व पुढें कोंच आलेली एक टोपी, हा काय तो त्याचा नेहमींचा पोषाख. अर्थात् पाऊस पडत असेल किंवा अतिशय थंडी पडली असेल तर त्याचे पोषाखांत थोडासा बदल होतो. उदाहरणार्थ, पावसांत बाहेर जातांना तो एक लोंकरीचा गरम ओव्हरकोट किंवा रेन्कोट घालतो. ग्रेत्शेनचा पोषाखही साधारणतः भावाचे पोषाखासारखाच असतो. नाहीं म्हणावयास शर्ट व कोट यांऐवजीं ती एक आंखूडसा झगा घालते. बाकी मोजे, बूट व टोपी हीं सर्व भावाचे प्रमाणेंच असतात. हान्सच्या शाळेंतील सर्व मुलांच्या टोप्या एकाच रंगाच्या असतात. इतर शाळांतील मुलांच्या टोप्यांचे रंगही ठरलेले असतात. त्यामुळें शाळा सुटून निरनिराळ्या रंगांच्या टोप्या घातलेल्या मुलांच्या रांगा रस्त्यानें जाऊं लागल्या म्हणजे एकंदर देखावा मोठा सुंदर दिसतो!

हान्स व ग्रेत्शेन दुपारीं शाळेंतून घरीं आल्यावर त्यांचें जेवण होतें. यावेळीं ' सूप ' मांस, मासे, बटाटे किंवा कोबी, कॅरट, सॅलड, मटार वगैरे इतर भाज्या व पुडिंग् इतके पदार्थ असतात. घरच्या शेतांत होणाऱ्या रायची काळसर भाकरीहि कधीं कधीं असते. रायप्रमाणें मांस व अंडीं हींहि घरचींच असतात. कारण हान्सचा बाप मुख्यतः शेतीच करीत असला तरी तो शेतीबरोबरच कोंबड्या, बदकें, डुकरें, गाई, वगैरे प्राणी पाळून, त्यांपासून तो अंडीं, मांस, दूध, चीज, लोणी वगैरे कितीतरी पदार्थ घरच्या घरीं उत्पन्न करतो. याशिवाय त्याचा एक फळमळाहि असून त्यांत ॲपल, पेअर, प्लम्, चेरी, पीच वगैरे फळेंहि चांगलीं होतात. उन्हाळ्याचे सुरुवातीला या सर्व फळझाडांना बहर येत असून हान्सची आई या फळांचे जाम, मार्मोलेड वगैरे मुरांब्यासारखे कितीतरी पदार्थ करून ठेविते. हे पदार्थ करावयाचे म्हणजे फळें धुणें, तीं शिजविणें, पाक तयार

झाला म्हणजे त्याच्या बाटल्या भरून ठेवणें, तो नासूं नये म्हणून बाटल्यांना सील करून ठेवणें, वगैरे कितीतरी लहानसान कामें करावीं लागतात. परंतु ग्रेत्शेन या सर्व गोष्टी करूं लागत असल्यामुळें तिच्या आईला या एकंदर कामाचें कांहींच वाटत नाहीं.

ग्रेत्शेन अशाप्रकारें घरांतल्या कामांत आईला उपयोगी पडते, तर हान्स् झाडांना कीडबीड लागली असल्यास ती काढून टाकण्यांत व इतर रीतीनें त्यांची निगा राखण्यांत बापाला मदत करतो. झाडांना सशांचा फार उपसर्ग होतो, म्हणून हान्स आतांशें एक बंदुक खांद्यावर टाकून व एक कुत्रा बरोबर घेऊन सशांच्या शिकारीला जातो; व एकाददुसरा ससा तरी तो मारून आणतोच! अर्थात् त्या दिवशीं जेवणांत सशाचें मांस हें असतेंच! कारण हान्सची आई मुलांनीं केलेल्या श्रमाचा योग्य तो मोबदला देण्यास नेहमीं तयार असते.

उन्हाळ्याचे दिवसांत हान्स व ग्रेत्शेन आपल्या इतर सोबत्यांना घेऊन दाट जंगलांत हिंडायाला जातात. किंवा कधीं कधीं नदीवर पोहायाला जातात. परत येतांना तीं कधीं रिकाम्या हातानें येत नाहींत; तर स्ट्रॉबेरीज् रॅास्पबेरीज् वगैरे कितीतरी प्रकारच्या बेरी गोळा करून आणतात. त्यांची आई या बेरींचा जाम करून तो दुसऱ्या दिवशीं सकाळीं पावाबरोबर खाण्यास देते, किंवा कधीं कधीं त्यांचें पुडिंग करून त्यांस वाढते. मधल्या वेळचें खाणें झाल्यावर बशा व इतर भांडीं धुणें, पुसणें वगैरे सर्व कामें मुलेंच करितात. ऐदोबासारखीं नुसतीं जेवीत नाहींत! दुपारीं शाळेंत जावयाचें नसल्यास तीं बागेंत जाऊन गाई, घोडे, डुकरें, कोंबड्या वगैरे पाळीव प्राण्यांना दाणापाणी वगैरे घालतात, व लाडिवाळपणानें कितीतरी वेळ त्यांच्याशीं खेळत बसतात. आठाचे

सुमारास त्यांचें रात्रीचें जेवण होतें. या जेवणाचा बेत दुपारच्या जेवणाच्या बेतापेक्षां जरा निराळा असतो. या वेळीं पाव–लोणी, थंड मांस, चीज व एक पेलाभर कोको किंवा चहा इतके पदार्थ असतात. फळांच्या दिवसांत फळेंहि जेवणावरच खातात. आपलेकडील प्रमाणें जेवणानंतर मुखशुद्धीकरितां म्हणून खात नाहींत. जेवण झाल्यावर मुलें एकाददुसरा तास लिहिणें, वाचणें वगैरे अभ्यास करितात. पुष्कळवेळां ग्रेत्शेन आईला जुने कपडे शिवणें, तुटलेल्या गुंड्या वगैरे लावणें, किंवा पायमोजे दुरुस्त करणें अशासारख्या कामांत मदत करते. हान्स मात्र जमा करून ठेवलेल्या लोखंडी तुकड्यातांकडचांचें एकादें खेळणें किंवा यंत्र तयार करीत बसतो ! जसा कांहीं एकादा मोठा संशोधक कांहीं यांत्रिक शोधच लावीत बसला आहे ! त्यांचा बाप एकादें पुस्तक, किंवा वर्तमानपत्र वाचीत पडतो, किंवा कधीं कधीं मित्रमंडळीबरोबर जवळच्या दुकानांत बिअर प्यावयास जातो. पाहिलेंत, जर्मन कुटुंबांतील मुलेंबाळें कशीं कोणत्याना कोणत्या उद्योगांत गुंतलेलीं असतात ! तसेंच घरांतलीं कामें करायाला सुद्धां त्यांना लाजबीज कांहीं वाटत नाहीं !

थंडीच्या दिवसांत शेजारच्या तळ्याचें पाणी गोठलें कीं हान्स व ग्रेतशेन स्केटिंग करायाला जातात. त्या दिवसांत थंडी इतकी भयंकर असते कीं, त्यांना खूपच कपडे घालावे लागतात. परंतु नुसत्या कपड्यांनींहि भागत नाहीं; म्हणून अंगांत पुरेशी उष्णता येण्याकरितां त्यांना सारखें धांवणें, पळणें, खेळणें, किंवा दुसरें कांहीं हालचालीचें काम करावें लागतें. म्हणून खेळणेंसवरणें तिकडे रिकामटेकडेपणाचें समजत नाहींत. उलट त्याशिवाय थंडीचें निवारणच होऊं शकत नाहीं. कधीं कधीं हान्स व ग्रेत्शेन

आपली बिनचाकी गाडी घेऊन बर्फावरून घसरगुंडीचा खेळ खेळतात. वरून खालीं घसरत येतांना कांहींच श्रम नाहींत; परंतु खालीं आल्यावर गाडी वरच्या बाजूस ओढून नेतांना चांगलाच व्यायाम होतो, व अंगांत उष्णता उत्पन्न होऊन थंडी वाजेनाशी होते. अशाप्रकारें संध्याकाळपर्यंत खेळून तीं घरीं जातात, तों त्यांच्या आईनें त्यांचेकरितां कढत कढत 'सूप' तयार करून ठेविलेली असते. अगोदरच व्यायामानें भूक लागलेली, त्यांतच बाहेरच्या कडक थंडीला अगदीं योग्य अशी कढत कढत 'सूप' व विशेष म्हणजे 'सूप' आपल्या आईनें आपल्याकरितां मुद्दाम तयार केलेली अशी भावना; मग ती सूप पीत असतांना हान्स व ग्रेत्शेन् यांना किती तरी आनंद होत असेल ? जर्मन आईबापांना आपल्या मुलांबद्दल भारी प्रेम वाटतें, व उलट जर्मन मुलांनाही आपल्या आईबापांबद्दल, कुटुंबाबद्दल, समाजाबद्दल व सबंध राष्ट्राबद्दल भारी आदर वाटतो.

हान्स व ग्रेत्शेन यांना थंडीच्या दिवसांतील बर्फावरचे खेळ व इतर खाण्यापिण्याची चंगळ यांची जरी बरीच मजा वाटत असली तरी, वसंतऋतु केव्हां येईल असें त्यांनाहि झालें असतें. कारण त्याच वेळीं झाडांना हिरवीगार पालवी फुटूं लागते. बरेचसे पक्षी जर्मनींतील थंड हवेला कंटाळून दक्षिणेकडील उबदार हवेंत गेले असतात ते याच सुमारास परत येतात. व सूर्यही जास्त प्रखरतेनें तापत असल्यामुळें थंडी नाहींशी होऊन हवा जास्त उबदार होत असते. आणि सृष्टीनें अशा रीतीनें आपलें रम्य रूप धारण केलें म्हणजे हान्स व ग्रेत्शेन यांना पुनः एकदां रानावनांत मोकळेपणानें हिंडतां येतें व सृष्टींतील स्वाभाविक आनंद उपभोगितां येतो.

' मारिओ ' व ' नीना '

(इटली)

मारिओ हा इटली देशांत राहतो. हा देश आल्प्स्चे दक्षिणेला त्याच्या पायथ्याशीं असून तेथील हवा नील्स् किंवा यानच्या देशांइतकी थंड नाहीं, व तेथें बर्फही पडत नाहीं; जिकडेतिकडे चांगलें स्वच्छ ऊन पडत असल्यामुळें येथील झाडें, फुलें, फळें, व माणसेंही अगदीं तेजःपुंज, तजेलदार व उल्हासी दिसतात. मारिओचे आईबाप गरीबच आहेत, तथापि त्यांना व मारिओलाहि त्याचें कांहींच वाटत नाहीं. तो सर्वकाळ गात व हंसत असतो; त्यामुळें त्याचा अगोदरच पाणीदार असलेला चेहरा जास्तच खुलून दिसतो. तो काळासांवळा असला तरी अगदीं निरोगी व आनंदी असल्यामुळें त्या काळेपणांतही एकप्रकारची चमक मारते. त्याचा पोषाख साधा व जुनासाच असला तरी त्याचा गळ्याभोंवतालचा तांबडा रुमाल व जुन्या टोपीखालून बाहेर डोकावणारे त्याचे काळे कुरळे केंस त्याला फारच शोभतात.

मारिओला लिहितांवाचतां येत नाहीं, कारण त्याच्या गांवांत शाळाच नाहीं. परंतु एरवीं तो व्यवहारांत अतिशय कुशल व हुशार असून बाजारहाट करतांना कधीं फसावयाचा नाहीं. त्याच्या आईला त्याच्या या व्यवहारकुशलतेचें अतिशय कौतुक वाटून ती झऱ्यावर पाणी भरावयाला गेली म्हणजे तेथें आलेल्या इतर बाय-कांना आपल्या मुलाच्या शहाणपणाच्या गोष्टी मोठ्या अभि-मानानें सांगत असते. मारिओप्रमाणेंच त्याची धाकटी बहीण नीनाही घरकामांत फारच तरबेज आहे. धुणें, पाणी, स्वयंपाक वगैरे सर्व काम ती आईच्या बरोबरीनें करते. पाण्यानें भरलेला

मोठा थोरला घडा डोक्यावर घेऊन व दोन्ही हात सोडून ती चालली म्हणजे फारच चांगली दिसते; आपल्याला त्याचें फारसें वाटत नाहीं. कारण आपल्याकडे खेड्यांतील सर्वच बायका व मुली अशा रीतीनें डोक्यावर पाणी आणतात. परंतु जेनेट्, बेतृच्, जेसेफीन वगैरे तिकडील मुलींना व बायकांना त्याचें फार आश्चर्य वाटतें ! धुण्याचे मोठमोठे भारे व लाकडाचीं ओझींहि नीना व तिची आई– इटलींतील गरीब कुटुंबांतील सर्वच बायका–डोक्यावरूनच आणतात, व आपलेप्रमाणेंच त्यांसही त्याचें कांहीं वाटत नाहीं.

मारिओचा बाप धनगर असून एकदां तो मेंढ्यांबरोबर डोंगरावर गेला म्हणजे कितीतरी दिवस घरीं परत येत नाहीं. त्याला पुष्कळ दिवस डोंगरावर एकट्यालाच राहावें लागलें तरी त्याचें त्याला फारसें वाटत नाहीं. उघड्या माळावरच झुळझुळ वाहणाऱ्या वाऱ्यांत तो खुशाल झोंप घेतो, किंवा आपला पावा काढून खुशाल वाजवीत बसतो. त्याची मिळकत जरी अगदींच बेताबाताची असली, तरी जोंपर्यंत मुलाबाळांना रोजच्या खाण्याची ददात पडत नाहीं तोंपर्यंत त्याला मुळींच फिकीर वाटत नाहीं. ही समाधानी व बेफिकिरी वृत्ति त्याची एकट्याचीच नसून इटली देशांतील सर्वसाधारण माणसांचीहि अशीच वृत्ति असते.

कार्लच्या घरच्या मंडळीप्रमाणें मारिओच्या घरची मंडळीहि मांस वगैरे फारसें खात नाहींत. चीज्, अंडीं व मॅकरोनी यांवर त्यांचें चांगलें भागतें. मॅकरोनी हा आपल्या शेवयासारखा पदार्थ असून, तो पुढल्यादारीं पायऱ्यांवर बसून कढतकढत खाण्यांत मारिओला फारच मजा वाटते. त्याला असाच अतिशय आवडणारा आणखी एक पदार्थ म्हणजे चेस्नटच्या भाजलेल्या बिया.

त्याला या बियांचें इतकें वेड आहे कीं, कधींकाळीं एकादा पैसा त्याला मिळाला तर तो धांवत धांवत शेजारच्या दुकानांत जातो व तेथून गरम गरम चेस्नट् विकत घेऊन खात बसतो. एकादे वेळेस कोंपऱ्यावरच्या दुकानांतील लठ्ठ बाईपासून तिच्या कढईतील गोगलगाईचा गरम गरम रस्सा घेऊन खातांना त्याला फारच मजा वाटते.

मारिओ, नीना किंवा इटलींतील कोणीच चहा पीत नाहींत; त्याचेऐवजीं तीं कॉफी किंवा दूध पितात. मारिओ थोडासा चैनी दिसला तरी तो जात्या फार कामसू आहे. रानांतून लांकडांचे भारे आणून ते सांठवून ठेवणें, द्राक्षांच्या मळ्यांत जाऊन द्राक्षें जमा करणें वगैरे कष्टाचीं व किचकट कामेंहि तो व नीना आपले आईचे बरोबरीनें करतात. त्यांच्या चुलत्याचा एक द्राक्षांचा मळा असून तो कधीं कधीं या मुलांना आपल्या गाडींत घेऊन जातो. आपल्या चुलत्याच्या–म्हणजे एकप्रकारें आपल्या स्वतःच्याच–त्या रंगीत व डौलदार दुचाकी गाडींत बसून जातांना मारिओ व नीना यांनीं इतरांकडे किती अभिमानानें पाहिलें असेल! काकाच्या मळ्यांतील द्राक्षें मुलें इतक्या हौसेनें व झपाझप गोळा करतात कीं, कामाच्या भरांत संध्याकाळ झाल्याचेंहि त्यांचे लक्षांत येत नाहीं! हीं द्राक्षें तोडून झाल्यावर मारिओ व नीना खालीं तळ-घरांत जातात; व द्राक्षासव करण्याची सर्व कृति अथपासून इति-पर्यंत पाहतात. तोडलेलीं द्राक्षें प्रथम मोठमोठ्या हौदांत सांठवून ठेवतात; नंतर कामावरचीं कांहीं बायकामुलें तीं पायाखालीं चिरडून त्यांचा रस करतात; कांहीं कामकरी तो रस बाटल्यांत भर-तात; ही सर्व कृति पाहून मारिओ व नीना यांना फारच आश्चर्य

वाटतें. परंतु कामकरी द्राक्षें पायाखालीं तुडवितात हें पाहून मात्र त्यांना कसेंसेंच होतें !

द्राक्षें गोळा करण्याचा हंगाम संपला कीं ऑलिव्हचा हंगाम सुरू होतो. बाजारांत जें ऑलिव्ह तेल मिळतें तें याच फळांचें गाळलेलें असतें. मारिओच्या घराच्या आसपास या ऑलिव्ह फळांचे पुष्कळ मळे असून मारिओ व नीना आपल्या आईबरोबर तीं फळें वेंचायाला जातात. हीं फळें वेंचण्याचें काम अत्यंत किचकट असल्यामुळें काकाच्या मळ्यांतील द्राक्षें गोळा करण्याचें काम त्यांना जितकें आवडतें तितकें हें काम आवडत नाहीं. तसेंच ऑलिव्हचें तेल काढण्याची कृतीहि अगदीं साधी असल्यामुळें द्राक्षाची दारू करतांना पाहून त्यांना जितकी मजा वाटते तितकी तेलाचा साधा घाणा चालतांना पाहून त्यांना वाटत नाहीं. मात्र तेल ज्या उंच उंच पिपांत भरून ठेवतात त्या पिपांची त्यांना मौज वाटते, व कधीं कधीं तीं पिपें रिकामीं असलीं म्हणजे त्यांत तीं लपंडाव खेळतात ! आपली आई फोडणीबिडणीला व दिवाबत्तीला हेंच तेल वापरते येवढेंच नव्हे, तर याच तेलाचे साबण व आणखीहि पुष्कळ पदार्थ करतां येतात हें मारिओला समजल्यापासून त्या तेलाबद्दलचा त्याचा तिटकारा कमी झाला आहे.

हल्लीं हल्लीं तर त्या तेलाचा स्वाद त्याला इतका आवडूं लागला आहे कीं, एखाद्या भाजीला ऑलिव्ह तेलाची फोडणी नसली तर ती भाजी तो खात नाहीं !

कधींकधीं मारिओ डोंगरांवर चेसनट् गोळा करण्याकरतां जातो; व येतांना आपल्या आईसाठीं बरेचसे घेऊन येतो. ती ते वाळवून

व दळून त्यांचें पीठ करते, व तें रायच्या पिठांत मिसळून त्याच्या भाकरी करते. मारिओला ही भाकरी व चीज फारच आवडतें. एकंदरीत पाहतां, मारिओ व नीना यांना जितकें काम पडतें तितकें कांहीं नील्स्, कार्ल, यान यांना पडत नाहीं. असें असून मारिओ व त्याची बहीण जितकीं आनंदी दिसतात तितकीं कांहीं दुसरीं मुलें दिसत नाहींत. याचें कारण असें आहे कीं, मारिओचा इटली देशच फार सुंदर असून त्यांत फळाफुलांची अगदीं चंगळ आहे. जिकडेतिकडे उन्हाचा उबदारपणा व तकाकी असून कधींहि उदास, सुन्न व भयाण वाटत नाहीं. वास्तविक मारिओ व त्याची बहीण इतर मुलांचे मानानें गरीब आहेत; परंतु या भोंवतालच्या गोष्टीमुळें त्यांचा स्वभाव आनंदी व उत्साही बनला आहे.

इटली देशांत रोम म्हणून फार मोठें शहर आहे. तेथें शेंकडों वर्षांपासूनचे मोठमोठे राजवाडे व आणखी कितीतरी गोष्टी पाहण्यासारख्या आहेत. 'लांबलांबचीं माणसें तेथें जाऊन त्या गोष्टी पाहून येतात; पण आपणांला मात्र त्या पाहतां येत नाहींत' याचें मारिओ व नीना यांना फारच वाईट वाटतें. व एकदां तर त्यांनीं आपल्या आईपाशीं रोमला जाण्याची गोष्टही काढली होती. परंतु 'तेथें जाण्याला बराच खर्च येतो व आपल्यासारख्या गरीबांना तितका पैसा कसा मिळणार' असें जेव्हां तिनें त्यांना सांगितलें, तेव्हांपासून त्या बहीणभावांनीं खूप काम करून पैसा मिळवावयाचा, व कसेंहि करून एकदां रोम पाहावयाचें, असा मनाशीं निश्चयच केला आहे. तीं दोघें इतकें काम करतात याचें हेंहि एक कारण नसेल ना ?

'वॅसिन्‌का' व 'कॅटेरिना'

(रशिया)

वॅसिन्‌का (Vasinka) रशिया देशांत राहतो. हा देश आशिया व युरोप या दोन्ही खंडांत उत्तरेला पसरला असून, अतिशय मोठा आहे. आपलें हिंदुस्थानही बरेंच मोठें आहे, परंतु रशियाचे मानानें तें लहानच दिसतें. वॅसिन्‌काचें गांव अतिशय लहान असून त्यांत शें–दीडशें घरें व एक देऊळ आहे. भोंवतालीं रायची व बटाट्याची थोडीशी शेती असून, पलीकडे गाई-घोड्यांना चरतां येईल अशी कुरणाळ जमीन आहे. हीं कुरणें संपलीं म्हणजे जिकडे तिकडे दाट व विस्तीर्ण जंगलाशिवाय दुसरें कांहींच दिसणार नाहीं. हल्लीं जेथें गांव आहे तेथेंहि पूर्वीं जंगलच असून, झाडें तोडूनच तेथें वस्ती करावी लागली आहे. भोंवतालीं सर्व जंगलच असल्यामुळें ५–५० मैलांत दुसरें एकादें लहानसें गांवही नाहीं, मग शहर तर दूरच !

अशा परिस्थितीमुळें वॅसिन्‌काचे घरीं पैपाहुणा सहसा येत नाहीं; पण चुकूनमाकून आलाच, तर तो मात्र महिना–महिना राहिल्याशिवाय जात नाहीं. कारण वरचेवर कोण कोणाकडे येतो जातो ? असा विचार करून तो तेथेंच ठिय्या देतो !


हिंवाळ्यांत तेथें अतिशय थंडी पडत असून, घरें, दारें, जमीन, झाडें वगैरे सर्वांवर बर्फाचे अगदीं दाट थर बसतात. अगोदरच कडक थंडी, व त्यांतच झोंबऱ्या वाऱ्यांची भर, मग काय विचारतां ? रशियाचे उत्तरेस अतिशय मोठा समुद्र असून तो नेहमीं थंडीनें गोठलेला असतो. या समुद्रावरून थंड वारे वाहण्याला सुरुवात झाली म्हणजे मध्यंतरीं त्यांना आडवायाला कोठेंहि फारसे उंच पर्वत

नसल्यामुळें ते थेट दक्षिणेकडे आरपार जातात, व त्यामुळें सर्वच देश येथून तेथून थंडीमय होतो. वॅसिन्का घराबाहेर पडला म्हणजे सारखा कुडकुडत असतो.

वॅसिन्काचे अंगांत एक भला मोठा लांब कोट असून कोटाचें कापड फारच जाड असतें. तो अंगाबरोबर बसावा म्हणून त्यानें कमरेभोंवतीं एक मोठा पट्टा बांधलेला असतो. त्याची विजारही बरीच लांब असून ती खालीं बुटांत अडकवलेली असते. बूट जाड-जूड कातड्याचे असून ते गुढघ्यापर्यंत पोंचतील इतके उंच असतात. डोक्याची टोपीहि खूप जाड व केंसाळ चामड्याची असून ती कानांचे पाळीवरून येईल इतकी रुंद असते. वॅसिन्काचा सबंध पोषाखच अशा तऱ्हेचा असतो कीं, त्याच्या योगानें शरीराच्या शक्य तितक्या भागांचें भयंकर थंडीपासून रक्षण व्हावें. मारिओच्या किंवा पिअरच्या देशांतल्याप्रमाणें तो नुसता शोभेकरितां नसतो. नाकाकानासारख्या उघड्या भागांची वॅसिन्काला फारच काळजी घ्यावी लागते; नाहींतर बाहेरच्या थंड हवेचा झोत एकदम लागून ते कायमचे निकामी व्हावयाचे !

वॅसिन्काची बहीण कॅटेरिनाही एक साधा लोंकरीचा लांब झगा व विजार घालते. सणावाराचे व जत्रेचे दिवशीं मात्र ती रंगारंगाच्या पट्टयांचा व नक्षीचा झगा घालते, व एक सुंदरसा रुमाल डोक्या-वरून आणून खालीं हनुवटीशीं मफलराप्रमाणें बांधते. आईचा पोषाखही साधारणपणें तसाच असून, ती बसते तेव्हां एक मोठा थोरला रग अंगावर घेऊन बसते. वॅसिन्काच्या बापाचा पोषाख मुलाप्रमाणेंच असून, त्याच्या हातांत नेहमीं एक लांब चामड्याचा चाबूक असतो.

वॅसिन्काचें घर लांकडाचेंच बांधलेलें असून, तें साधारणतः



थंड सायबेरिआ व तेथील एक काटकसरी कुटुंब

५–७ वर्षांपेक्षां जास्त टिकणार नाहीं, असें म्हणतात. कारण कितीतरी घरें ५–७ वर्षांतच आंतल्या शेगडींतील विस्तवानें पेटून जळून गेलीं आहेत! वॅसिन्काचे घरांतही एका कोपऱ्यांत एक मोठी विटांची शेगडी बांधलेली असून, तिच्यांतील विस्तव सारखा पेटलेला असतो. शेगडीवर एक मोठा लांकडी माचा मांडलेला आहे. वॅसिन्का, केटेरिना, व त्यांची आई हीं सर्व त्या माच्यावर एकमेकांना गुरगुटून निजतात. खालून शेगडीचा शेक, व वरून पांघरुणांची व एकमेकांच्या अंगाची ऊब, इतकी जेव्हां व्यवस्था करावी तेव्हां कोठें थंडी जरा कमी लागते! शेगडी व माचा यांशिवाय घरांतील तिसरी महत्त्वाची वस्तु म्हणजे शेगडी-वर सारखी उकळत असलेली एक भली मोठी चहाची किटली. वॅसिन्काला व त्याच्या घरच्या सर्वच मंडळींना चहाचा अतिशय शोक आहे. मात्र त्यांत दूध न घालतां ते थोडासा लिंबाचा रस घालून तो घेतात. तसेंच ते तो कपाऐवजीं कांचेचे ग्लासांतूनच पितात. बाहेर थंडी इतकी जबर असते कीं, चहा निवविण्याकरतां आपलेप्रमाणें त्यांना उथळ बशाबिशा तर लागत नाहींतच, उलट तो निवूं नये म्हणून हे उंच उंच ग्लास ते वापरतात. तसेंच पडसें वगैरे होऊं नये म्हणून त्यांच्याकडे लिंबू पिळण्याची चाल पडली असावी. जरा थंडी झाल्यास आपल्यालाही डॉक्टर लोक गरम पाण्यांत लिंबू पिळून तें घेण्यास सांगत नाहींत काय? तसेंच तिकडील लोकांना इतके-वेळां चहा प्यावा लागतो कीं, प्रत्येक वेळीं दूध घालायाचें म्हटल्यास दूधच पुरावयाचें नाहीं. प्रत्येक घरांत शेगडी, माचा व किटली या तीन गोष्टी असल्या म्हणजे मग टेबलें, खुर्च्या, बाकें वगैरे लांकडी सामान असलें–नसलें सारखेंच.

वॅसिन्का व कॅटेरिना यांचा बाप शेतकरी असून, बराच गरीब

आहे; व यापुढें श्रीमंत होण्याची त्याला फारशी आशाहि नाहीं. कारण त्यानें कितीही मेहनत करावयाचें म्हटलें, तरी त्याच्या जमिनींतून आतांपेक्षां जास्त पीक निघणें शक्य नाहीं, व अर्थात् उत्पन्नही वाढण्याचा कांहीं संभव नाहीं. रशियांतील बहुतेक शेतकऱ्यांचें असेंच आहे. कारण त्यांपैकीं बरेचसे मुळींच शिकलेले नसून त्यांना शेतकीच्या नवीन तऱ्हेच्या आउतांची किंवा खतांची फारशी माहिती नाहीं. नाहीं म्हणावयास आतां मात्र त्यांची सुधारणा झपाट्यानें होत आहे. बापाच्या गरीबीमुळें वॅसिन्का व कॅटेरिना यांना रोज मांस खाणें परवडत नाहीं. राय धान्याची काळसर भाकरी, चीज्, अंडीं, येवढ्यांवरच त्यांना रोज भागवावें लागतें.

वॅसिन्का व कॅटेरिना यांना हिंवाळ्यांत बाहेर जंगलांत जाणें शक्यच नसतें. कारण सबंध जंगलभर लांडगेच लांडगे आहेत. लांडगे अगोदरच खादाड, व त्यांतच थंडी ! मग काय विचारतां ! त्यांना या दिवसांत इतकी सपाटून भूक लागते कीं, ते रात्रीं टोळ्यांटोळ्यांनीं भक्ष्य शोधावयास जंगलांतून बाहेर रस्त्यावर येतात, व नशीबानें एकादें वाट चुकलेलें गुरूं किंवा एकादा वाटसरू सांपडला कीं, त्याला फाडफाडून खातात. बरें ते इतके असतात कीं, त्यांना सर्वांना हुसकावून देणें शक्य नसतें. एका टोळीला पळवून लावलें तरी दुसरी टोळी तयार ! अशा-प्रकारें वॅसिन्काला एकट्याला बाहेर पडणें शक्य नसल्यामुळें तो गांवांतील इतर पुरुष मंडळी लांडग्यांची शिकार करावयाला निघाली म्हणजे त्यांचेबरोबर जातो. कारण जाळें लावण्यांत व त्यांत लांडगे पकडण्यांत त्याला फार मजा वाटते. लांडग्याच्या केंसाळ कातड्याची टोपीहि त्याला फार आवडते.

आपलेकडील हिंवाळ्यापेक्षां तिकडचा हिंवाळा जास्त काळपर्यंत टिकतो; व म्हणून तो फारच कंटाळवाणा होतो. वॅसिन्का उन्हाळ्याच्या दिवसांची सारखी वाट पाहात असतो. एकदां ऊन पडायला सुरुवात झाली म्हणजे तें इतकें कडक पडतें कीं, पांच सहा महिन्यांत पडलेलें बर्फ अवघ्या दोन चार दिवसांतच पार वितळून जातें; व सगळीकडे दलदल व चिखल होऊन बाहेर पडण्याची पंचाईत पडते. हिंवाळ्याचे दिवसांत बर्फ पडलें होतें तेव्हां साध्या गाड्यांचा उपयोग होत नसला तरी बर्फावरून चालणाऱ्या गाड्यांचा तरी होत होता. परंतु आतां त्याही निरुपयोगी ठरतात! अर्थात् अशी स्थिति फार दिवस टिकत नाहीं; आणि वॅसिन्का आणि कॅटेरिना यांना लवकरच बाहेर शेतांत किंवा रानांत जातां येतें.

उन्हाळा फार थोडा वेळ टिकत असल्यामुळें व तेवढ्यांतच त्यांना सबंध वर्षाचीं कामें उरकावयाचीं असल्यामुळें वॅसिन्काची व त्याच्या बापाची फारच धांदल उडते. जूनमध्यें गवत कापावयाला होतें. तें कापून होतें न होतें तोंच ऑगस्टमध्यें ओट व राय हीं धान्यें तयार होतात. त्यांची कापणी, मळणी वगैरे होते तोंच शेतें नांगरून पुढची पेरणी करून ठेवावी लागते. कारण एकदां का हिंवाळ्याला सुरुवात झाली म्हणजे सगळाच कारभार आटोपला! वॅसिन्काच्या आईबापांची-व रशियांतील इतर शेतकऱ्यांचीहि-या दिवसांत इतकी कांहीं लगबग व धांदल उडते कीं, मोठ्या माणसांप्रमाणेंच मुलांनाही अतिशय काम पडतें. यामुळें त्यांचें शिक्षण मात्र कांहींच होत नाहीं. शिवाय त्या गांवांत शाळा नाहीं, व खाजगी शिकविण्याची सोय करावी तर दुसरेंहि कोणी शिकलेलें नाहीं! नाहीं म्हणावयास तेथली एक म्हातारी, लहानपणीं एका दूरच्या

मोठ्या गांवीं गेली असतां थोडेंसें वाचावयाला शिकली होती. परंतु त्याला इतके दिवस झाले आहेत कीं, ती वाचावयाचें तर विसरली आहेच, पण 'आपण वाचावयाला शिकलों होतों का नव्हतों' हेंहि तिला आतां आठवत नाहीं !

शेतांतलीं सर्व पिकें–बिकें नेहमींप्रमाणें निघालीं व हिंवाळ्याची सर्व तरतूद झाली म्हणजे वॅसिन्‌काचे घरांतील मंडळींना फार बरें वाटतें; व वॅसिन्‌काचा बाप सर्व गांवकऱ्यांना आपलेकडे जेवावयाला बोलावतो. तीहि मंडळी सर्व कामें आटोपल्यामुळें आनंदांत असतात. सर्वच मंडळी अशा आनंदाच्या मनःस्थितींत असल्यामुळें मेजवानीला जो कांहीं रंग चढतो तो विचारावयासच नको ! मारे जिकडे तिकडे गप्पागोष्टी व थट्टामस्करी चालू असतात. 'गेल्या हिंवाळ्यांत आपली काय दशा झाली होती ! गुरांना वैरणीची एक काडीहि न उरल्यामुळें घरांवरचीं छपरें काढून त्याचें गवत त्यांना कसें चारावें लागलें' इत्यादींची आठवण अशावेळीं कोणालाच होत नाहीं; किंवा 'यंदांचें वर्ष ठीक झालें, पुढचें वर्ष कसें काय निभणार !' अशीही काळजी वाटत नाहीं. जो तो आतांच्या आनंदांत दंग असतो ! पण काळ त्यांना थोडाच अशा आनंदाचा उपभोग फार वेळ घेऊं देणार आहे ! त्याचें चक्र चालूच असल्यामुळें, गांवकऱ्यांची तशी इच्छा नसली तरी लवकरच उन्हाळा संपतो, व फिरून एकदां हिंवाळा सुरू होतो. पण वॅसिन्‌काला व त्याच्या घरच्या मंडळींना यावेळीं मागच्याइतकी हिंवाळ्याची भीति वाटत नाहीं; कारण त्यांचीं यंदाचीं सगळीं पिकें देवाच्या दयेनें फार चांगलीं आलीं आहेत.

वाँग्

(चीन)

आशियांतील रशियाचे दक्षिणेस त्याला लागूनच दुसरा एक मोठा देश आहे. त्याला चीन म्हणतात. चीनमधील एका लहान खेड्यांत आपल्या वाँग्चें घर आहे. तें सगळें बांबूचें केलेलें असून त्या गांवांतील इतर लहान मोठीं घरेंहि बांबूचींच केलेलीं आहेत. गांवाचे भोंवतीं सगळीकडे भाताचीं शेतें पसरलीं असून पलीकडील नदी व तिच्या कांठावरील मोठें गांव हीं दुरून दिसताहेत.

'आपण मुलगी असतों तर आपले हाल कुत्रेंहि खातें ना' असें वाँग्ला वाटून, देवानें आपणांस मुलीचे जन्माला घातलें नाहीं म्हणून तो मनांतून देवाचे आभार मानतो. वाँग्चे आईबापांनाही तो जन्माली आला तेव्हां 'मुलगा झाला' म्हणून फारच हर्ष वाटला ! कारण त्यांचे देशांत मुलगी होण्याऐवजीं मुलगा व्हावा अशी सगळ्यांचीच इच्छा असते; व म्हणून मुलगी झाली म्हणजे मन फारच खट्ट होतें. कारण आईबापांना असें वाटतें कीं, 'मुली म्हणजे लोकाचें धन ! आज ना उद्यां त्यांचीं लग्नें झालीं म्हणजे त्या माहेरचें गणगोत सोडून परक्याच्या घरीं जाणार ! तोच मुलगा झाला तर तो जन्मभर घरचेवरींच राहून आपल्या म्हातारपणीं आपल्याला तांब्याभर पाणी तरी देईल !' नेमके हेच विचार आपलेकडील आईबापांचे मनांतही मुलीचे जन्माचे वेळीं येत नाहींत काय ? आईबापांचा आपलेसंबंधीं हा विशेष ओढा पाहून वाँगलाही त्यांचेबद्दल अतिशय आदर व पूज्यबुद्धि वाटते, व तो त्यांच्याशीं अत्यंत अदबीनें वागतो. त्यांच्या इच्छेविरुद्ध तो कसलीहि गोष्ट करीत नाहीं.

वाँग् झाला तेव्हां घरांत कोण आनंद झाला! मुलाला भुताखेताची बाधा होऊं नये, म्हणून रस्त्यावरील दरवाजावर तिकडच्या चालीप्रमाणें त्यांनीं आलें बांधलें. त्याला मोठ्या माणसांच्या कपड्यांत गुंडाळून त्याचे तोंडांत थोडीशी केकही घालण्यांत आली. अर्थात् याचा वाँग्ला अतिशय त्रास होऊन तो रडूं लागला. पण हे सगळे विधी करण्याची चालच असल्यामुळें त्याच्या रडण्याला कोण जुमानणार! अरेरे! गरीब बिचारा वाँग्! तो महिन्याचा झाल्याबरोबर त्याच्या डोळ्याचे केंस काढण्यांत आले. बिचाऱ्याला केंस पुरते आले कां नसेनात! नंतर त्याचें नांव ठेवलें, व त्याचे अंगांत रेशमी झबलें, पायांत रेशमी चड्डी वगैरे अडकवून त्याला देवाला नेलें. देवळांत आईबापांनीं व इतर आप्तेष्टांनीं देवानें कुटुंबांत मुलगा दिला म्हणून त्याचे आभार मानले. नंतर आपलेकडील बारशासारखी एक मोठी जेवणावळ झाली. आपण लग्नकार्यांत आमंत्रण देतांना अक्षदा म्हणजे तांबडे तांदूळ हातावर देतों; वाँग्च्या बापानें तांबड्या तांदुळांऐवजीं तांबडीं अंडीं घरोघर पाठवून जेवणाचें आमंत्रण दिलें; जेवावयाला आलेल्या लोकांनीं वाँग्ला व त्याच्या आईला देणगीदाखल कांहीं कांहीं सुंदर वस्तु दिल्या. शेवटीं वाँग्च्या आईनें त्याचे तोंडांत थोडासा चहा व केक घातल्यावर समारंभ संपला, व आलेले लोक घरोघर गेले. या दिवशीं चहा, केक वगैरेंचें नुसतें शास्त्रच करावयाचें असून, मूल आतां मोठें झालें येवढेंच दर्शविण्याचा त्याचा हेतु असावा.

वाँग् तीन महिन्यांचा झाल्याबरोबर पहिल्या महिन्याप्रमाणेंच आणखी एक विधी करण्यांत आला. त्याला एका लहानशा खुर्चीत बसवून, त्याच्या पायांत चालण्याची शक्ति यावी व त्यानें लवकर लवकर चालावयास लागावें अशा वेड्या भावनेनें त्याचे तोंडांत

शिजविलेल्या डुकराची तंगडी घालण्यांत आली ! खाणें, बसणें, चालणें वगैरे सर्व गोष्टी मुलाला अगदीं लवकर लवकर याव्यात, ही इच्छा या सर्व विधींचे मुळाशीं असते हें खरें; पण ती इच्छा अशा विधींनीं साधेल असें मानणें बरोबर आहे काय ? मूल जसजसें मोठें होईल तसतसें तें या सगळ्या गोष्टी आपोआप करीलच. मग त्या त्याच्यावर अगदीं लहानपणापासून लादण्यांत काय फायदा ? वाँग्नें तो चहा व ती केक आतां किती आनंदानें खाल्ली असती ! पण त्यावेळीं बिचारा कोण रडला !

वाँग् हल्लीं एक तांबडा सद्रा व एक सैलशी विजार घालतो. डोक्याची टोपी घट्ट असून तिचा रंग काळा आहे. पूर्वीं मुलींच्या वेण्यांप्रमाणें मुलांच्या शेंड्यांच्याहि लांब लांब वेण्या घालून त्या पाठीवर सोडण्याची चाल होती. तसेंच मुलांचीं पावलें जखडून बांधून, किंवा जाड लांकडी जोड्यांत मुडपून ठेवून बारीक करण्याची चमत्कारिक चाल असे. पण वाँग्चे आईबापांनीं या चमत्कारिक चाली टाकून दिल्या असून इतर लोकही त्यांचें अनुकरण करीत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे.

आपलेकडे जसा पाडव्याचा सण असतो तसा वाँग्चे देशांतही वर्षाच्या सुरुवातीचा एक सण असतो. त्यादिवशीं सर्वांचीं वयें वाढतात असें मानण्याची चाल आहे व तें खरेंहि आहे. पण वर्षांतील कोणत्याही इतर दिवशीं मुलाचा जन्म होवो, याच दिवशीं त्याला नवीन वर्ष लागतें असें ते मानतात; त्यामुळें सर्वांचे वाढदिवस एकाच दिवशीं साजरे केले जातात. अर्थात् त्या दिवशीं घरोघर मोठे समारंभ व मेजवान्या चालतात. आपलेकडील दिवाळींतलेप्रमाणें त्या दिवशीं तिकडे खूपसें फराळाचें करीत असून रात्रीं दारूहि सपाटून उडवितात. वाँग्ला दारू उडविणें व पतंग

उडविणें फारच आवडतें.पतंग कागदाचे असून त्यांना निरनिराळ्या प्रकारच्या पक्ष्यांचे आकार दिलेले असतात. ते आभाळांत उंच उंच उडत असतांना इतके खरोखरच्या पक्ष्यांप्रमाणें दिसतात कीं, पक्षी उडतो आहे का पतंग उडतो आहे हें खालून समजत नाहीं !

वाँग्चे गांवीं शाळा असली तरी तो शाळेंत जात नाहीं. कारण त्याला भाताचे शेतांत किंवा कलिंगडाचे मळ्यांत आपले बापाचे हाताखालीं काम करावें लागतें. शिवाय त्याच्या बापाला शाळेंतलें पुस्तकी शिक्षण मुळींच आवडत नाहीं. वाँग्ला स्वतः-लाही शाळेंत जावेंसें वाटत नसल्यामुळें बाप आपल्याला शाळेंत पाठवीत नाहीं याचा त्याला आनंदच होतो. चिनी लेखनपद्धतींत निरनिराळे शब्द निरनिराळ्या खुणांनीं लिहावयाचे असल्यामुळें जितके शब्द भाषेंत तितकीं अक्षरें वर्णमालेंत असा चमत्कारिक प्रकार झाला आहे; व म्हणून चिनी अक्षरें शिकणें लहान मुलां-नाच नव्हे तर मोठ्या माणसांनाहि फार कठीण जातें. वाँग्ला शाळेंत जावेंसें वाटत नाहीं याचें खरें कारण हें आहे.

वाँग् कधीं कधीं जवळच्या शहरांत जातो. वस्ती अतिशय दाट असल्यामुळें तेथें त्याला एकप्रकारची चमत्कारिक घाण येते. हेंच शहर इतकें गजबजलेलें आहे असें नसून चीनमधल्या प्रत्येक लहानमोठ्या गांवाची हीच स्थिति आहे. त्या देशांत इतके लोक आहेत कीं, सबंध जगांतल्या लोकांचे तीन हिस्से केले तर एक हिस्सा एकट्या चिनी लोकांचा भरेल ! आपल्या हिंदुस्थानांत असेच पुष्कळ लोक आहेत, पण त्यांची संख्या चीनमधील लोकसंख्ये-पेक्षां कमीच भरेल, असें वाटतें.

चीन देशांत तांदूळ, वाल, पावटे, वगैरे पदार्थ बऱ्याच मोठ्या प्रमाणावर होतात. परंतु इतक्या सर्व लोकांना ते पुरणें शक्य

नसल्यामुळें, इतर देशांत कोणीहि खाणार नाहींत असे कितीतरी चमत्कारिक पदार्थ चिनी लोकांना खावे लागतात. वाँग्च्या घरांत वरील पदार्थांशिवाय अंडीं, कोंबड्या, बदकें, पक्षी इत्यादींचे निरनिराळे पदार्थ करून खातात. एकदां तर दुष्काळांत त्याच्या बापाच्या शेतांत एकही दाणा न पिकल्यामुळें त्यांना कुत्रीं, मांजरें, झुरळें, पाली, गोगलगाई, उंदीर, घुशी, साप इत्यादि प्राणीहि खाण्याची पाळी आली ! तुमच्यापैकीं कांहींना हें नुसतें ऐकूनच शिसारी आली असेल. पण वाँग् व चिनी लोक यांच्या दृष्टीनें जरा विचार करा. लोक अतिशय, व खावयाला तर थोडें, अशा स्थितींत त्यांनीं तरी काय करावें, आपल्या देशांत खूपसें धान्य, भाजीपाला, फळें, इत्यादि पदार्थ नियमितपणें पिकतात म्हणून ठीक आहे. परंतु कल्पना करा कीं, आपल्या दुर्दैवानें हे जिन्नस मुळींच पिकेनासे झाले, तर आपणही वाँग्सारखेंच मिळेल तें खाऊन जीव बचावूं. विश्वामित्र ऋषी येवढा तपस्वी ! पण भुकेनें जीव व्याकुळ झाला तेव्हां मांगानें वाळत घातलेलें कुत्र्याचें चामडेंहि त्यानें खाल्लें असें म्हणतात.

त्या शहरांतील दुकानांना कांचेच्या तावदानांच्या मोठमोठ्या खिडक्या नसल्यामुळें त्यात कोणकोणता माल विक्रीकरितां आहे हें बाहेरून दिसत नाहीं. म्हणून बाहेर दुकानांवर मोठमोठ्या कागदी पाट्या चिकटविलया असून त्यांवर दुकानांत मिळणाऱ्या वस्तूंचीं चित्रें काढलेलीं असतात. वाँग्ला अक्षरें येत नव्हतीं तरी त्याला या पाट्या तेव्हांच समजल्या. रस्त्यांतून कितीतरी मजूर खांद्यावर आपलेकडील मेण्यासारख्या खुर्च्या घेऊन जातांना वाँग्च्या दृष्टीस पडले. इतर गाड्यांप्रमाणें हेंहि एक वाहनच असून त्यांत बसल्यावर वाँग्ला अतिशयच मजा वाटली. दुसरी एक एकचाकी गाडी

वाँग्‌नें पाहिली. ह्या गाडीलाही बैल किंवा घोडा जुंपलेला नसून ती एक माणूसच ओढून नेत होता. या गाडीचें चाक मधोमध असून तिच्या दोन्ही अंगांस सामानसुमान ठेवण्यास किंवा माणसांना बसण्यास जागा ठेवलेली असते. दोन्हीकडचीं वजनें सारखीं असलीं म्हणजे ही गाडी सुरळीत जाऊं शकते.

कधीं कधीं वाँग् नदीवर फिरावयास जातो. नदींत शेंकडों लहानमोठ्या होड्या नांगरून पडलेल्या असून कितीतरी लोक त्या होड्यांवरच कायमचीं घरें करून राहिलेले आहेत. कांठाशींच मोठमोठीं दुकानें असल्यामुळें जमिनीवर उतरलें नाहीं तरी त्यांचें मुळींच अडत नाहीं. मुलांचे खेळही होडींतले होडींत किंवा पाण्यांत चालतात; व यामुळें पुष्कळ वेळां त्यांना चालावयाला येऊं लागलें नाहीं तरी पोहावयाला येतें! वाँग्‌ला तेथली एक गोष्ट विशेष मौजेची वाटली ती ही कीं, मोठे मोठे काळे पक्षी पाण्यांतील मासे चोंचीनें पकडून व तोंडांत धरून आपल्या मालकाला नेऊन देत! त्यांच्या मानेभोंवतीं एक कडें घातलें असून तें असें कांहीं बसविलें होतें कीं, पक्ष्यांना मासा तर पकडतां यावा, पण पकडलेला मासा स्वतःच गट्ट करून टाकतां येऊं नये. वाँग्‌ला याचें फारच आश्चर्य वाटलें; व त्या आश्चर्याच्या भरांत ' आपणाला पुढें पैसे मिळाल्याबरोबर आपण असले पक्षी घेऊं, त्यांजकडून बरेचसे मासे पकडून, त्या माशांवर बराचसा पैसा मिळवूं, व आपल्या आईबापांना म्हातारपणीं आतांप्रमाणें कष्ट करावयास न लावतां त्यांना आनंदानें 'हरि हरि' करीत बसूं देऊं ' असे कितीतरी विचार त्याच्या मनांत आले!

'केटो' व 'ओ-कोटो-सान'

(जपान)

वाँगच्या चीन देशाचे पूर्वेस समुद्रांत जपान नांवाचीं मोठमोठीं बेटें आहेत. त्यांपैकीं एका बेटांतील एका लहान गांवांत केटो राहतो. या बेटांपैकीं कांहीं बेटें तर अतिशय मोठीं व फार सुंदर आहेत. तीं अगदीं पूर्वेकडे असल्यामुळें सूर्य प्रथम त्या बेटांत उगवतो असें केटोला व तेथील बहुतेक लोकांना वाटतें, व म्हणून त्या बेटांना 'उगवत्या सूर्याचा देश' असे ते म्हणतात. केटोला व तेथील सर्वच मुलांमाणसांना आपल्या या 'उगवत्या सूर्याच्या देशाचा' फारच अभिमान वाटतो. केटोच्या आईबापांना आपल्या मुलाचा आपल्या देशाबद्दलचा हा अभिमान पाहून मनांतून भारी संतोष होतो, व यामुळें तर मुलावरील त्यांच्या मूळच्या प्रेमांत अधिकच भर पडते. ते मुलाला कधींहि रागें भरत नाहींत, किंवा त्याला हिडिसफिडिस करीत नाहींत. आईबापांच्या या वागणुकीचा परिणाम मुलांवर चांगला होऊन तींहि दुसऱ्यांशीं वागतांना अत्यंत सभ्य व सौम्यपणानें वागतात.

केटो व त्याच्या घरची मंडळी तुरीच्या देशांतील माणसांप्रमाणेंच जरा ठेंगू आहेत. तुरीच्या लॅप्लंड देशांतील हवा अतिशय थंड असल्यामुळें तेथें झाडांप्रमाणेंच माणसांचीही उंची फारशी वाढत नाहीं असें म्हणतात. परंतु केटोच्या जपान देशांत तर कांहीं तशी स्थिति नाहीं. मग ते ठेंगू कां ? ते लोक अगदीं लहानपणापासून पाय गुढग्याखालीं दुमडून गुढग्यांवर बसतात, व कधीं मोकळेपणानें बसत नाहि.त यामुळें तर त्यांची उंची कमी होत नसेलना ? तसें असल्यास आईबापांच्या बसण्यासवरण्याच्या पद्धतीचा परिणाम फक्त

त्यांच्यापुरताच होतो असें नसून तो त्यांच्या मुलांबाळांवरही होतो असें ठरतें. केटोचे डोळेहि बरेच बारीक दिसतात. तो ते कधीं पुरे उघडीतच नाहीं असें वाटतें. त्याच्या देशांतील सर्वच माणसांच्या डोळ्यांची व पाहण्याची तऱ्हा हीच.

केटोचें गांव डोंगराच्या एका खोऱ्यांत आहे. या खेड्याचे उत्तरेस जवळच 'फुजियामा' नांवाचा एक उंच डोंगर आहे. त्याचेवर कधीं कधीं बर्फ पडतें. त्याचे एका शिखरांतून धूर, वायु वगैरेंचे झोत बाहेर पडत असून कधीं कधीं प्रत्यक्ष आगीचे लोळही बाहेर येतात. एकदां कांहीं प्रवासी या डोंगराजवळून जात असतांना ते डोंगरांतून बाहेर पडणाऱ्या पदार्थांनीं भाजून मेले असें केटोनें ऐकल्यापासून त्याला त्या डोंगराची फारच भीति वाटते. असें असूनही या डोंगराइतका चांगला डोंगर जगांत दुसरा नसेल असं त्याला वाटतें.

वाँग्च्या घराच्या भिंती बांबूच्या कुडाच्या आहेत. पण केटोच्या घराच्या भिंती तर कागदाच्याच केलेल्या आहेत. जपानांत घर बांधावयाला दगड किंवा विटा मिळणार नाहींत असें नाहीं; पण घर दगडांविटांचें बांधून उपयोग काय? कारण तेथील जमीन बरेच वेळां हादरत असून पुष्कळ वेळां मोठमोठे धक्केहि बसतात. असे धक्के बसले म्हणजे सर्व घरें खालीं कोसळून पडतात. नुकतेंच केटोच्या गांवापासून बरेंच दूर असलेलें एक मोठें शहर अशा प्रकारें जमीनदोस्त झालें! घरें नुसत्या कागदांचीं किंवा बांबूचीं केलेलीं असलीं म्हणजे तीं पडलीं तरी त्यांपासून फारसें नुकसान होत नाहीं; व पुनः पुनः बांधावीं लागलीं तरी फारसा खर्च नाहीं. फुजियामांतील धुराप्रमाणेंच जमिनीचें हें हादरणें केटोला व त्याच्या देशांतील कोणाही मुलाला मुळींच आवडत नाहीं. पण न



भूकंपमय जपान व तेथील खेळकर मुलें

आवडून करणार काय? हॉलंड देशांतल्याप्रमाणें एक वेळ समुद्राला बांध घालून तो आडवितां येईल ! परंतु या जळत्या पर्वताचें तोंड किंवा हें जमिनीचें थरथर कांपणें कोण कसें बंद करणार ? कदाचित् तसाही कोणी निघेल; नाहीं तरी कशावरून ?

घराच्या बाहेरच्या भिंतींप्रमाणें खोल्यांच्याही भिंती कागदाच्याच केलेल्या आहेत. यामुळें केटोची आई त्या वाटेल तेव्हां काढते, व वाटेल तेव्हां घालते. केटोच्या घरांत बसण्याकरितां थोडचाशा गवती चटया, आडोसा करण्याकरितां बांबूच्या कामटचांचे पडदे, व फुलें घालून ठेवण्याचें एकादें फुलपात्र इतकेंच सामान आहे. त्याच्या आईबापाला टेबलें, खुर्च्या, कोंच वगैरे लांकडी सामानाची गरज कधींच भासत नाहीं. कारण ती मंडळी खुर्च्याटेबलांवर कधींच जेवीत नाहींत. खालीं चटईवर बसून पुढें एकाद्या लहानशा स्टुलावर ताट ठेवलें म्हणजे त्यांचें भागतें. तसेंच केटो पिअर, नील्स, यान् या मुलांप्रमाणें कांट्यांचमच्यांनीं जेवीत नाहीं; तर दोन लांब लांब काडचा घेऊन त्यांनीं ताटांतील पदार्थ तोंडांत घालतो. अशा प्रकारें काड्यांनीं जेवणें तिऱ्हाइताला अतिशय कठीण वाटतें; पण एकदां संवय झाली म्हणजे सर्व कांहीं साधतें. केटोचे जेवणांत मुख्य पदार्थ दोन—एक भात,व आमटीसारखा दुसरा एक पातळ पदार्थ. केटो—वॅसिन्काइतका नाहीं तरी—बराच चहा पितो. त्याचा कप वॅसिन्काचे ग्लासाइतका मोठा नसतो, व त्यास कानही नसतात.

केटोला ओ—कोटो—सान् नांवाची एक बहीण असून तीहि त्याच्यासारखीच सभ्य, शांत व समंजस आहे. त्याच्याप्रमाणेंच तिचें बोलणें, चालणें, बसणें, उठणें, सर्व कांहीं मोठें सुंदर दिसतें.

ती लहान असली तरी तिच्या आईला घरांतल्या कामांत तिचा फारच उपयोग होतो. ती आपल्या तान्ह्या भावाला सारखी पाठीवर घेऊन फिरवीत असते. तिच्या अंगांत एक सैलसा गुलाबी कोट असतो. या कोटाला तिकडे 'किमोना' म्हणतात. तिनें किमोनावरून कमरेभोंवतीं शेल्यासारखा एक रुमाल बांधला असून पाठीमागचे बाजूस त्याच्या टोंकांची एक ऐटदार गांठ मारली आहे. केटोच्या अंगांत नुसता किमोनाच असून पायांत एक सैलशी विजार आहे. त्याला डोक्यावर फारसे केंस नसून तो एक मोठी थोरली गवताची टोपी घालतो. त्याच्या पायांत बूट वगैरे कांहींच नसतें. नीना किंवा कॅटेरिना जशा डोक्यावर एकादा रुमाल बांधतात तसा ओ–कोटो–सान् बांधीत नाहीं. केसांचे निरनिराळ्या रीतीनें भांग काढणें, त्यांचे निरनिराळ्या आकाराचे लहानमोठे अंबाडे घालणें, टांचण्या, कंगवे, फण्या, आंकडे, इत्यादींच्या मदतीनें ते चापूनचोपून बसविणें इत्यादि गोष्टी तिला अतिशय आवडत असल्यामुळें ती आपल्या केंसांना अतिशय जपते, व त्यामुळेंच ती डोक्यावरून रुमाल वगैरे घेत नसावी.

केटो व त्याची बहीण दोघेही शाळेंत जातात. या दोघांना शिकण्यासवरण्याची जितकी गोडी लागली आहे, तितकी पिअर, मारिओ, कार्ल वगैरे मुलांपैकीं कोणालाच लागलेली नाहीं. याचें कारण असें आहे कीं, केटोच्या देशांत शाळा पुष्कळ असून येथील प्रत्येक मुलामुलीला लिहितां वाचतां आलेंच पाहिजे अशी येथील राजाची फार इच्छा आहे. त्यांची लिहिण्यावाचण्याची तऱ्हा मात्र अगदीं चमत्कारिक आहे. आपलेप्रमाणें ते डावीकडून उजवीकडे आडवें वाचीत जात नाहींत, तर कागदाच्या उजव्या बाजूच्या वरच्या कोंपऱ्यापासून खालीं खालीं वाचीत जातात !

केटोची शेती त्याच्या घराजवळ आहे. या जमिनींत त्याचा बाप तांदूळ करतो. जपानांत खूप पाऊस व बरेंचसें ऊन असल्या-मुळें व याच गोष्टी मुख्यत: तांदुळाला लागत असल्यामुळें तेथील सर्वच शेतकरी आपल्या शेतांत तांदूळ करतात. तांदूळ हें जपानी लोकांचें मुख्य अन्न तर आहेच, परंतु या-शिवाय दारू, चटया, टोप्या वगैरे कितीतरी पदार्थ भाताच्या गवता-पासून व दाण्यापासून ते तयार करू शकतात. पावसाळ्यांत डोक्यावरील टोपी भिजूं नये म्हणून तिला ज्या एका पिवळ्या तेलकट कापडाचा अभ्रा घातलेला असतो तें कापड तांदुळाच्या गवताचेंच केलेलें असतें. येथें भाताच्या शेतीचें काम फारच किच-कट व कष्टाचें असतें. लावणी करतांना सबंध वेळ पाण्यांत ओणवें उभें राहावें लागतें. वरून उन्हाचा चटका बसत असतो, तर खालून जळवा चावत असतात! आपलेकडील शेतकरी तांदु-ळाचें पीक वर्षांतून एकदांच काढीत असल्यामुळें त्यांना हा त्रास फार तर तीन चार महिनेच सोसावा लागतो. परंतु जपानांतील लोक दोन दोन, तीन तीन पिकेंहि काढीत असल्यामुळें त्यांना हा त्रास जवळजवळ बाराहि महिने सोसावा लागतो. केटोचा बाप संध्याकाळीं शेतावरून परत आल्यावर अतिशय थकलेला दिसतो. एकादे वेळीं तर 'नको ही शेती, रिक्षा ओढण्याचा धंदा बरा' असाहि विचार त्याचे डोक्यांत येतो. परंतु लगेच 'आपल्या गांवकऱ्यांची स्थितीहि आपल्याप्रमाणेंच कष्टाची आहे,' असा दुसरा विचार मनांत येऊन त्याला थोडें समाधान वाटतें, व त्या समाधानाचे भरांत तो आपल्या पुढील उद्योगाला लागतो.

केटोचे बहिणीला घरांतलें काम करून पुन: रेशमाचे किड्यां-कडे पहावें लागतें. त्या किड्यांना खाण्याला तुतीचीं पानें लागतात;

व ते इतके खादाड असतात कीं, एका दिवसांत ते या पानांचे भारेचेभारे खाऊन फस्त करतात. शेताचे बांधावर हीं झाडें भरपूर असलीं, तरी प्रत्येक खेपेला ताजीं पानें आणून घालावयाचीं म्हटलें म्हणजे तिला फारच काम पडतें. शिवाय किड्यांचे कोष बनले म्हणजे त्यांपासून रेशमाचा धागा काढण्याचें किचकट कामही तिलाच करावें लागतें.

जपानांत अतिशय फुलें होतात; व तेथील लोकांना फुलांचा फार शोक असतो;परंतु केटोला व त्याच्या बहिणीला तर तो अतिशयच आहे. मार्चचे सुमारास जिकडे तिकडे चेरीचीं झाडें फुललीं म्हणजे एकंदर देखावा इतका बहारीचा दिसतो कीं, कितीतरी लोकांना त्यावेळीं काव्य करण्याची स्फूर्ति होते. केटोहि कधीं कधीं कविता करून बहिणीला म्हणून दाखवितो. बिचारीला आवडतात का नाहीं कोणास ठाऊक !

जपानांत वसंतऋतु जितका आल्हाददायक असतो, तितकाच हिंवाळा त्रासाचा होतो. सर्व घरें कागदाचीं असल्यामुळें त्यांचेपासून थंडीचें निवारण फारसें होत नाहीं. तसेंच तेथें होणाऱ्या कोळशाला इंग्लंडांतल्या कोळशाप्रमाणें चांगली आंच नसल्यामुळे त्याचाहि तितकासा उपयोग होत नाहीं; आणि म्हणून केटोच्या घरची मंडळी कापसाच्या मोठमोठ्या रजया व दुलया पांघरून निजतात. घरांत गाद्यागिरद्या नसल्यामुळें, व अंथरुणाचें सर्व काम चटयांवरच भागवावयाचें असल्यामुळें केटो अंगावरची दुलईच अशी कांहीं लपेटून घेतो कीं, त्यामुळें त्याला निराळ्या अंथरुणाची जरूरच भासत नाहीं.

मे महिन्याच्या पांचव्या तारखेची वाट सर्व मुलगे मोठ्या उत्कंठेनें पाहात असतात. कारण त्या दिवशीं ‘ ईरिस् फिटी ’

म्हणून मुलांचा एक सण असतो. त्या दिवशीं केटोला कितीतरी मेवामिठाई व इतर चांगल्या चांगल्या वस्तू भेट म्हणून येतात. सबंध दिवस तो पतंग उडविण्यांत किंवा दुसरे खेळ खेळण्यांत दंग असतो. त्या दिवशीं त्याचा बाप घराबाहेर पाडव्याच्या गुढीप्रमाणें एक उंच दांडी उभी करून तिच्या टोकाला एक कागदी मासा लटकावतो. तो वाऱ्यानें इकडे तिकडे हेलकावे खाऊं लागला म्हणजे केटोला अतिशयच मजा वाटते; पण 'हा मासा जसा वाऱ्याशीं झुंजतो आहे तसें आपणही परिस्थितीशीं झुंजलें पाहिजे' असें तत्त्व मुलाचे मनांवर बिंबावें अशी बापाची इच्छा असते, ती मात्र सफल होते का नाहीं कोणास ठाऊक! केटोची आई खास मुलांकरितां म्हणून एक दिंडासारखा पिठाचा पदार्थ करते, व तो ईरिस झाडाचे पानांत गुंडाळून त्याला देते.

वाँग्च्या देशांत मुलांचेंच भारी स्तोम असतें; मुलींना कोणीच विचारीत नाहीं. तसें केटोच्या देशांत नसतें.मुलांच्या 'इरिस् फिटी'-सारखा मुलींचाही 'पीच् फिटी' म्हणून एक सण असतो. तो मार्चचे तिसऱ्या तारखेस असतो. तिला त्या दिवशीं कितीतरी बाहुल्या मिळतात. त्यांपैकीं दोन चांगल्या बाहुल्या घेऊन ती एकीला 'राजा' व एकीला 'राणी' करते. राजाराणीचे अंगावर ती पुष्कळसे कपडे व दागिने घालते; व त्यांचेपुढें गौरींतल्याप्रमाणें मोठमोठीं मेवामिठाईचीं ताटें ठेविते. आपण जसा देवाला नैवेद्य दाखवून त्यांतला थोडासा भाग प्रसाद म्हणून खातों, तसेंच तीहि राजाराणींपुढें ठेवलेल्या पदार्थांपैकीं थोडासा भाग प्रसाद म्हणून भक्षण करते. केवढें हें जपानी मुलांचें आपल्या राजाराणीवरचें प्रेम! हें झाल्यावर ती बाकीच्या बाहुल्यांना कपडे वगैरे घालते, व सर्व मंडळींना त्या मोठ्या कौतुकानें दाखविते.

बाहुल्या दाखवितांना तिला मनांतून इतका कांहीं आनंद होत असतो, व ती अशी कांहीं खुलून दिसते कीं, जणू कांहीं एखादी प्रेमळ आईच आपलें तान्हें बाळ आपल्या नातेवाइकांना दाखवीत आहे ! बहिणीच्या या सात्विक आनंदाचा हेवा केंटोला वाटण्याचें कांहींच कारण नसतें; कारण थोड्याच दिवसांत त्याचाहि ' इरिस् फिटी ' सण पुन्हां यावयाचा असतोच.

'मोंकिन्' व 'सॉन्यान्'

(ब्रह्मदेश)

आपल्या हिंदुस्थान देशाचे थेट पूर्वेस ब्रह्मदेश म्हणून एक देश आहे. तेथें एका लहानशा गांवांत मोंकिन् व सॉन्यान् हीं मुलें राहतात. ब्रह्मदेशांत ऊन व पाऊस यांची चंगळ असून जमीनहि चांगली सुपीक असल्यामुळें तेथील लोकांनीं थोडीशी मेहनत केली तरी पुष्कळसें पीक येतें. त्यामुळें तेथील लोक जरा आळशी झाले असून खुशालचेंडूप्रमाणें वेळ घालवितांना दिसतात.

मोंकिन् ज्या गांवांत राहतो तें गांव नदीचे कांठीं आहे. पावसाळ्यांत नदीला पूर येऊन गांव वाहून जाऊं नये म्हणून गांवांतील घरें पाण्यांत खांब उभे करून त्यावर बांधलेलीं आहेत. घरें उंचावर बांधल्याचा दुसराही एक फायदा असा होतो कीं, त्यामुळें घरांत साप वगैरे येण्याची फारशी धास्ती नाहीं. नदीवरून घरांत जातांना मोंकिन् एक लहानशी शिडी टाकतो. त्याचें घर कळकाचें व लांकडाचें केलेलें असून त्याला माडीबिडी कांहीं नाहीं. कारण माडीवर चढून चालणें म्हणजे खालच्या मजल्यांत असलेल्या माणसांच्या डोक्यांवर चढून नाचण्यासारखें आहे असें तेथील लोकांना वाटतें! मोंकिन्चे घराभोंवतीं जिकडेतिकडे वेल व फुलें आहेत. कुंपणें घ्या, भिंती घ्या, झाडें घ्या, कोठेंहि फुलें नाहींत असें होत नाहीं. शिवाय तीं आपलेकडीलपेक्षां कितीतरी मोठीं व निरनिराळ्या रंगांचीं असतात. मोंकिन्ला व त्या देशांतील सर्वच लोकांना फुलांचा फारच शोक असून त्यांच्या अंगावर नेहमीं फुलें असतात.

मोंकिन्चा कोट झग्यासारखा लांब असून पांढरा आहे. त्याचे

कमरेला एक फडकें गुंडाळलेलें असून तें हिरव्या रंगाचें आहे. त्यानें टोपीऐवजीं एक रेशमाचें फडकें डोक्याला बांधलेलें आहे. त्याच्या बहिणीचा पोषाखही बहुतेक त्याच्यासारखाच आहे. तिनें आपले केंस ऋषीच्या जटांसारखे वरच गुंडाळलेले असून ते नीट बसावेत म्हणून त्यांत एक फणी बसविलेली आहे. तिच्या केंसांत एकादें सुंदर फूल नेहमींच असतें; व त्यामुळें ती फारच मोहक दिसते. ब्रह्मदेशांतील सर्वच मुली तिच्याप्रमाणें मोहक दिसतात.

मोंकिन्‌ला आठवें वर्ष लागतांच जवळच्या शाळेंत घातलें. ही शाळा म्हणजे एक मठी असून त्याचे मास्तरही संन्याशी भिक्षूच आहेत. त्यांचा झगा पिवळ्या रंगाचा असून मोंकिन्‌ला पहिल्या-पहिल्यांदा त्याची फार मजा वाटे. त्याला लिहितांवाचतां येऊं लागल्यावर, गुरूप्रमाणें त्यालाही संन्यासदीक्षा देण्यांत आली. डोक्यावरील सर्व केंस काढून टाकल्यावर त्यानें एक पिवळा झगा अंगांत घातला. या शाळेंतलें शिक्षण आटोपल्यावर त्याच्या पायां-वर व कमरेवर गोंदण्यांत आलें. तिकडे गोंदण्याचा एक मोठा विधी असून सर्व मुलांना असें गोंदून घ्यावें लागतें. पायांवरील काजळानें गोंदलेले ते भयंकर वाघ पाहून भीति वाटण्याऐवजीं मोंकिन्‌ला आनंदच होतो, व तो त्याकडे मोठ्या डौलानें पाहतो; कारण 'या आपल्या गोंदण्यावर भाळून कितीतरी सुंदर मुली पुढें आपल्याशीं लग्न लावावयाला तयार होतील' असें त्याला मनांतून वाटत असतें. त्याची बहीणही 'आपण केव्हां मोठे होऊं, व आपले कान टोंचून त्यांत केव्हां एकदां सोन्याच्या काड्या घालूं' अशी सारखी वाट पहात असते ! कारण कान टोंचलेले नसले तर पुढें मोठेपणीं इतर बायकांप्रमाणें तिला दागिने घालतां येणार नाहींत !

मोंकिन् भोंवरा फिरवूं लागला किंवा पतंग उडवूं लागला, किंवा



फुलता ब्रह्मदेश व तेथील हंसरीं मुलें

कधीं कधीं नदीवर आपली लहानशी होडी वल्हवीत असला म्हणजे ती खेळकर पोरही आपली बाहुली घेऊन पाहावयाला जाते.

लांकडांचीं घरें लवकर पेटतात, व घराला लागलेली आग लवकर न विझतां कधीं कधीं सबंध गांवच्या गांव पेटण्याची धास्ती असते, म्हणून त्या देशांत प्रत्येक घराच्या छपरांतील एक वासा पुढें आणून त्याच्या टोंकाला एक हूक अडकविलेला असतो. त्याच्याच शेजारीं एक मोठा पंखाहि बांधलेला असतो. हेतु हा कीं, जर का आगबीग लागलीच तर घरावरील छप्पर हुकाला धरून झट्दिशीं खालीं ओढून घेतां यावें, व पंख्यानें आग विझवितां यावी. मोंकिन्च्या घरालाही अशी सोय केली आहे.

मोंकिन् व त्याची बहीण यांचा भुतांखेतांवर, व यक्ष, किन्नर, अप्सरा, देवता वगैरेवर फार विश्वास आहे. अरण्यें, झाडें, नद्या वगैरेंच्या विशेष देवता असून त्यांना संतुष्ट राखलें नाहीं तर कांहीं-तरी वाईट होतें अशी भीति त्यांना सारखी वाटत असते; व या भुतांखेतांना तृप्त करण्याकरितां म्हणून तीं मुलें रानांत काट-क्याचीं लहान लहान देवळें करून त्यांत मांसे, भात वगैरे पदा-र्थांचे बळी ठेवून देतात. ही चाल व आपल्यांतील तीन वाटा फुटतील तेथें कांहींतरी उतरून ठेवण्याची चाल सारखीच दिसते.

इतर देशांतील मुलांप्रमाणेंच मोंकिन् व न्यान् हींहि मासे व अंडीं खातात. परंतु तीं जितकीं जास्त अधिक झालेलीं असतील तितकीं तीं त्यांना ज्यास्त आवडतात; यामुळें इतर मुलांना त्यांच्या घरीं जेवावयाला जाणें फारसें आवडणार नाहीं.

ब्रह्मदेशांत हत्ती पुष्कळ असून ते फार शाहाणेहि असतात. सामान वाहून नेण्याचे किंवा इतर अवघड गोष्टी करण्याचे कामीं ब्रह्मी लोकांना हत्तींचा उपयोग फारच होतो. मोंकिन्नें असे किती-

तरी हत्ती आपले गांवीं पाहिले आहेत. मोंकिन्च्या घराशेजारींच एक मोठें जंगल असून त्यांत देवदाराचीं झाडें खूपच आहेत. देवदाराचें लांकूड फार मऊ व टिकाऊ असल्यामुळें घरेंबिरें बांधतांना त्याचा फारच उपयोग होतो. तेथेंहि, नॉर्वे देशांतल्याप्रमाणें, लांकडें नदीच्या प्रवाहावरून वाहून आणतात, पण पाडलेल्या जागेवरून नदीच्या किनाऱ्यापर्यंत ओढून नेण्याचें काम, व किनाऱ्यावरून तीं पाण्यावरील तराफ्यांत उचलून ठेवण्याचें काम माणसें न करितां हत्तीच करतात. ते आपल्या सोंडेनें तराफ्यावर लांकडें इतकीं सफाईनें चढवितात व इतकीं ओळींत रचतात कीं, मोंकिन्ला त्याच्या चातुर्याचें फारच कौतुक वाटतें. तसेंच त्यांना काम केव्हां थांबवावयाचें हेंहि चांगलें कळतें. काम करणाऱ्या माणसांची जेवावयाची घंटा झाल्याबरोबर सोंडेंतला ओंडा तसाच खालीं टाकून गुलाम नदींत डुंबावयाला धांवतात.

एके दिवशीं मोंकिन् आपल्या चुलत्याबरोबर एका लांकडाच्या तराफ्यावर बसून रंगून बंदर पाहावयाला गेला. तराफ्यावर बसून प्रवास करण्याचा त्यांचा हा पहिलाच प्रसंग असल्यामुळें त्याला त्याची फारच गम्मत वाटली. त्याच्या चुलत्यानें त्याला एका लांकडें चिरण्याच्या कारखान्यांत नेऊन ओबडधोबड लांकडें तासून तीं साफसूफ कशीं करतात हें दाखविलें. मोठमोठीं लांकडें पाण्यांत तरंगत ठेवून त्यांवर बांबूच्या झोंपड्या उभारून माणसें कशीं राहतात हें पाहूनही त्याला फार मौज वाटली. त्यांपैकीं एका झोंपडींत तर एक गायही होती! तो इतके दिवस एका लहानशा खेड्यांतच राहिलेला असल्यामुळें रंगूनसारखें मोठें शहर पाहून त्याला फारच आनंद झाला. बुद्धाचीं उंच उंच देवळें व विशेषतः ‘ श्वे डागन् ’ नांवाचें सोन्याचें देऊळ पाहून त्याला

मोठा चमत्कार वाटला ! प्रत्येक देवळावरील छत्रीच्या आकारांचे निरनिराळे कळस, व त्यांवरील वाऱ्यानें हलणाऱ्या घंटा त्यानें लक्षपूर्वक पाहिल्या. घंटांचा नाद तर त्याला खूपच आवडला. पण ' भुतांखेतांना पळवून लावण्याकरितां या घंटा बांधलेल्या आहेत, माणसाच्या कानाला आनंद देण्याकरितां नव्हेत ' असें जेव्हां चुलत्याकडून त्याला कळलें तेव्हां त्याला हंसूं आलें.

नदीवरील घरें, रंगूनचीं देवळें, त्यांचे ते उंच उंच कळस, व त्यांवरील घंटांचे आवाज या सर्वांचा मौंकिन्च्या मनावर इतका कांहीं परिणाम झाला होता कीं, घरीं गेल्यावर त्यानें त्या सर्व गोष्टी बहिणीला मोठ्या घोळूनघोळून सांगितल्या. पण त्याच्या त्या सांगण्याचा उलटच परिणाम होऊन भावानें सांगितलेल्या गोष्टींवर बहिणीचा मुळींच विश्वास बसेना !

रंगूनच्या त्या सर्व गोष्टी खरोखरच विश्वास न बसण्यासारख्याच आहेत !

'क्रोमो' व 'सिना'

(मलाया)

क्रोमोचें घर मलाया देशांतील एका गांवांत आहे. जपान आशिया खंडाचे ईशान्य बाजूला आहे असें म्हटलें तर मलाया देश आशिया खंडाच्या आग्नेय बाजूला आहे असें म्हणतां येईल. या देशांतील हवा आपल्या हिंदुस्थान देशाच्या हवेपेक्षां जास्त उष्ण असल्यामुळें क्रोमो आपल्यापेक्षां बराच काळा आहे. त्याचे केंस तर इतके काळेभोर आहेत कीं, पिअर्, नील्स्, यान् इत्यादि मुलांच्या केंसांत व क्रोमोच्या केंसांत भयंकर फरक दिसतो. त्याचें नाक रुंद व चपटें असून नाकाच्या दोहोंबाजूंनीं आडवीं हाडें फारच वर आलीं आहेत. त्यामुळें साहजिकच त्याचीं गालफडें बसल्यासारखीं दिसतात. त्याचे दांत मात्र फारच सुंदर व पांढरे स्वच्छ असून ते त्याच्या काळ्या चेहऱ्यामुळें जास्तच पांढरे दिसतात. तो नेहमीं आनंदी व खेळकर दिसतो. नेसत्या पंचाशिवाय त्याच्या अंगावर दुसरे कांहींच कपडे नसतात. तो नेहमीं जवळ जवळ उघडाच असतो. आपल्यालासुद्धां उन्हाळ्यांत उघडेंच बसावें असें नाहीं कां वाटत ? आपण घराबाहेर पडतों तेव्हां ऊन लागूं नये म्हणून डोक्यावर कांहींतरी घेतों, व पायांतही कांहींतरी घालतों. पण क्रोमो कडक उन्हांतही बोडका व अनवाणीच फिरतो. क्रोमोची धाकटी बहीण सिना त्याच्या इतकीच राकट असून तीही घराबाहेर पडतांना छत्री, जोडा वगैरे कांहीं घेत नाहीं, किंवा अंगांतही दुसरें कांहीं घालीत नाहीं !

क्रोमोचें खेडें नदीच्या मुखाशींच असून सर्व गांव मॉकिन्चे खेड्याप्रमाणेंच पाण्यावरच वसलेलें आहे. सर्व घरें उंच उंच खांब

पाण्यांत पुरून त्यांवर बांधलेलीं असून तीं पाण्यावर तरंगत असल्या-सारखीं दिसतात. एका घरांतून दुसरे घरांत जाण्याकरितां लांकडी शिड्या टाकल्या असून त्या ओलांडून जातांना एका बोटींतून दुसऱ्या बोटींत गेल्यासारखें वाटतें. क्रोमोच्या बापाचें घरही असेंच खांबांवर बांधलेलें असून तें अगदीं लहान आहे. त्याच्या भिंती बांबूच्या केलेल्या असून घरांवर कौलांऐवजीं ताडामाडाचे झांप किंवा पोफळीच्या सांवळ्या घातलेल्या आहेत. तें बांधणें चाललें असतांना क्रोमोला फारच गंमत वाटली. प्रथम जंगलांत मोठ-मोठीं लांकडें पाडून तीं पाण्यावरून वाहवून खालीं कशीं आणलीं, मग त्यांना चिखलांत व वाळूंत खोल पुरून उभें कसें केलें, नंतर त्यांवर दुसरीं लांकडें आडवीं टाकून घराचा तळमजला कसा केला, मग बांबूच्या भिंती उभारून पानांचें छप्पर कसें शिवलें,व शेवटीं चटया, कांतडीं वगैरे पसरून व भांडींकुंडीं लावून एकंदर घर कसें सजविलें, इत्यादि सर्व गोष्टी त्याच्या तोंडपाठ झाल्या आहेत !

खालील पाणी व घरांतील तळजमीन यांत फारसें अंतर नसल्यामुळें क्रोमो रात्रीं कुशीला वळला म्हणजे खालीं पाण्याचा जो 'चुबक चुबक' आवाज चाललेला असतो तो त्याला स्पष्टपणें ऐकूं येतो. व तो एकादे वेळीं पालथें वळून भेगांतून पाहूं लागला, तर तें पाणी त्याला दिसतेंहि. पहिल्यापहिल्यांदा त्याला पाण्याची भीति वाटून झोंप येत नसे, व कधीं कधीं तो स्वप्नांत 'पडलों पडलों' म्हणून ओरडायाचाहि! पण पुढें पुढें संवईनें त्याला चांगली झोंप येऊं लागली. हल्लीं क्रोमो व इतर मंडळी तळमजल्यावर निजतच नाहींत. कारण त्या ठिकाणीं त्याच्या बापाच्या होड्या, डुकरें, कोंबड्या वगैरे ठेवलेल्या आहेत. लहान होडी अगदीं

एका माणसापुरतीच आहे. दुसरी होडी मात्र बरीच मोठी असून तिला सुंभाचें शीड आहे.

क्रोमोचा बाप व त्या गांवांतील इतर माणसें आपला बहुतेक वेळ समुद्रावरच घालवितात. कारण किनाऱ्यालगतच एक मोठें जंगल असून हा गांवही मूळ त्या जंगलाचाच एक भाग होता. जंगलांतील झाडी फारच दाट व हिरवीगार आहे; तथापि आंत भयंकर उकडतें ! तेथें पाऊस व ऊन दोन्ही अतिशय पडत असल्यामुळें हवेंत इतकी कांहीं वाफ सांचून राहते कीं, तो सर्वच भाग जसा कांहीं कोणी वाफाळून किंवा उकडून काढीत आहे असें वाटतें. झाडें, वेली, गवत, शेंवाळें वगैरे सर्व कांहीं अतिशय झपाट्यानें व दाट वाढतात. मागचीं झाडें तोडून पुढें जावें तों मागचीं झाडें पुनः वाढून तय्यार !

क्रोमो जेव्हां जेव्हां या जंगलांत जातो, तेव्हां तेव्हां त्याला सारखें इकडे तिकडे पाहून चालावें लागतें. कारण न जाणो, एकादा वाघ बीच गर्द झाडींतून एकदम पुढें येऊन झडप घालावयाचा ! बरेच दिवसांपूर्वीं याच जंगलांत त्याच्या थोरल्या भावावर एका भयंकर वाघानें उडी मारली होती ! त्याच्या बापानें वाघावर मोठ्या शिताफीनें आपल्या क्रीसचा वार केला म्हणून निभावलें ! ही गोष्ट घडली त्यावेळेस क्रोमो अगदीं लहान होता; परंतु ती त्याला अजून चांगली आठवत असून त्यानें ती कित्येकांना व कितीतरी वेळां सांगितली असेल. या अरण्यांत माकडें सारखीं 'चीं चीं' करीत असतात; गांधीलमाशांचेंहि सारखें घोंऽऽऽघोंऽऽऽ चाललेलें असतें; सर्व प्रकारच्या लहानमोठ्या माशांच्या झुंडी हवेंत फिरत असतात; आणि मोठमोठे टप्पोरे डांस अंगाचे चावे सारखे घेत असतात. हें अरण्य बाहेरून चांगलें हिरवेंगार दिसून

मनाला मोठा आनंद झाला, तरी आंत गेलें म्हणजे तेथील खरें सुख कळूं लागतें.

नदीच्या वरच्या बाजूला थोडीशी मोकळी जागा आहे; आणि याच ठिकाणीं गांवांतल्या लोकांच्या थोड्या शेतवाड्या आहेत. येथेंच क्रोमोच्या बापाचेंहि एक शेत व एक वाडी आहे. शेतांत घरापुरतें भात पिकत असून वाडींतही थोडेंसें नारळी--पोफळीचें उत्पन्न होतें. वाडींत जंगल माजूं नये म्हणून त्याला अतिशय काळजी घ्यावी लागते; व तो एकसारखा फालतू झाडेंझुडपें उपटून जमीन मोकळी करण्यांत गुंतलेला असतो. क्रोमोला मात्र हें कष्टाचें व एकेकट्यानें करावयाचें काम बिलकूल आवडत नाहीं. त्यापेक्षां त्याला होडींत बसून जाणें, मासे मारणें अशीं कामें जास्त आवडतात. कारण त्यावेळीं भोंवतालच्या मुलांशीं बोलावयास सांपडतें !

पाण्यांत काम करीत असतांनाच भूक लागली तर क्रोमो चटदिशीं शिडीच्या सर्व पायऱ्या चढून वर घरांत जातो, व भात, मासे, फळें वगैरे जें कांहीं हाताला लागेल तें खातो. कधीं कधीं सीनानें स्वयंपाक करून ठेवला असल्यास ठीकच. सीना क्रोमोपेक्षां कितीतरी लहान; पण ती त्याच्यापेक्षां कितीतरी समंजस आहे ! घरांतलें वरचें सर्व काम तीच करीत असून आई दुसऱ्या कामांत असल्यास स्वयंपाकही तीच करून ठेवते. आपण मोठे केव्हां होऊं, व आपले दांत आईसारखे बारीक करून केव्हां घेऊं असें तिला झालेलें असतें. आपल्या दृष्टीला सुळ्यासारखे दांत चांगले दिसत नाहींत. पण मलायांतल्या सर्वच स्त्रियांना तसे दांत आवडतात. क्रोमोच्या बापाचे दांत मूळचे क्रोमोसारखेच पांढरे स्वच्छ असले तरी पानतंबाखूमुळें आतां ते अगदीं काळे

दिसतात. म्हणून कोमोलाही आपले दांत आपल्या बापासारखे काळे केव्हां होतील असें वाटतें. आपल्याला पांढरे दांत असावेसें वाटतें, तर त्या देशांतील लोकांना काळे दांत आवडतात ! आहेत कीं नाहीं निरनिराळ्या देशांतल्या लोकांच्या निरनिराळ्या आवडीनिवडी ?

कोमोचे गांवांत केटोच्या गांवाप्रमाणें पुष्कळशा शाळा असणें शक्यच नाहीं. तथापि एकादी तरी असेल असें आपणास वाटतें. पण तीहि नाहीं ! अर्थात् कोमोला लिहितांवाचतां मुळींच येत नाहीं. मात्र पोहणें, पाण्यांत बुड्या मारणें, मासे पकडणें, इत्यादि गोष्टींत कोमो फारच पटाईत आहे. त्याला लांकूड खोदण्याचें कामहि येतें. घरासमोरची शिडी त्यानेंच खोदून तयार केली आहे. पण खरें सांगावयाचें म्हणजे त्यांपैकीं कोणतीच गोष्ट त्याला मनापासून करावीशी वाटत नाहीं. कारण आपण उत्तम शिकारी बनूं, व त्या जंगलांतले एकूण एक वाघ मारून टाकूं, म्हणजे पुनः केव्हांही कोणताच वाघ आपल्या भावाचे अंगावर येणार नाहीं, असें लहानपणींच त्यानें ठरविलें असून अद्यापही त्याचें तेंच ध्येय कायम आहे.

'बेटि' व 'पीटर'

(ऑस्ट्रेलिआ)

मलाया देशाचे पूर्वेस बऱ्याच अंतरावर ऑस्ट्रेलिआ म्हणून एक मोठा देश आहे. तो इतका मोठा आहे कीं, त्याला खंडच म्हणतात. तेथील एका गांवांत बेटि आणि पीटर हीं राहतात. या देशांतील हवा, पाणी वगैरे गोष्टी फारच चांगल्या असल्यामुळें त्या मुलांना आपला देश अतिशय आवडतो. बेटि व पीटर इंग्रजी भाषाच बोलत असून, त्यांचा पोषाख वगैरे सर्व कांहीं इंग्रज लोकांप्रमाणेंच असतें. त्यांचे वाडवडील जातीनें इंग्रजच असून, ते इंग्लंड सोडून ऑस्ट्रेलिआंत येऊन राहिल्याला त्यांना फारशीं वर्षे झालीं नाहींत.

पृथ्वीचे गोलावर ऑस्ट्रेलिआ व इंग्लंड हे दोन देश एकमेकांचे अगदीं उलट बाजूस असल्यामुळें इंग्लंडमध्यें जेव्हां हिंवाळा असतो, तेव्हां ऑस्ट्रेलिआंत उन्हाळा असतो; व इंग्लंडमध्यें जेव्हां उन्हाळा असतो तेव्हां ऑस्ट्रेलिआंत हिंवाळा असतो. त्यामुळें नाताळांत जेव्हां इंग्रज मुलें घरांत शेगडीशीं बसून मेजवानी झोडीत असतात, व बाहेरच्या बाजूस बर्फाचा वर्षाव चालू असतो, तेव्हां ऑस्ट्रेलिआंतील बेटि व पीटर एकाद्या झाडाच्या सावलींत बसून तीच मेजवानी बाहेर उघड्यावर बसून झोडीत असतात !

पीटर व बेटि यांचें घर इंग्रज लोकांचे घरांसारखेंच असून, त्यांचे खेळही हेनरी व रूथ यांच्या खेळांसारखेच आहेत. पीटर क्रिकेट फार चांगलें खेळत असून 'इंग्लंडबरोबर खेळण्याकरितां ऑस्ट्रेलिआंतून जाणाऱ्या टीममध्यें आपली तर निवड एखादे वर्षी होणार नाहीं ना' असा विचार पुष्कळ वेळां त्याचे मनांत येतो. अर्थात् तो फार

शहाणा असल्यामुळें त्यानें तो विचार कोणापाशीं बोलून दाखविला नाहीं ! इंग्रज लोकांचा एकच खेळ त्याला येत नाहीं; आणि तो म्हणजे स्केटिंग्; पण तेंही—ऑस्ट्रेलिआंत बर्फ पडत नाहीं, किंवा पडलेंच तर जमिनीवर फार वेळ टिकत नाहीं म्हणून. नाहींतर स्केटिंग् स्केटिंग् काय येवढें ! त्याला तें केव्हांच आलें असतें ! ऑस्ट्रेलिआंतही इंग्लंडप्रमाणें खूप बर्फ पडावें असें पीटर आणि बेटि यांना फार वाटतें. कारण, तसें झालें म्हणजे हेन्‌री व रूथ् यांना जें जें येतें, तें तें सर्व आपणांसही येईल; अमुक एक गोष्ट त्यांना येते व आपणांस मात्र येत नाहीं असें मग कोणासही म्हणतां येणार नाहीं. त्यांच्या गप्पागोष्टीहि इंग्लंडविषयींच चालतात; व मनांतही इंग्लंड हाच आपला मायदेश, तेंच आपलें ‘ होम ’ असें त्यांना वाटतें ! आपण एकदां ‘होमला’ जाऊन येणार असें त्यांनीं मनानें ठरविलें आहे ! अवघ्या सहा आठवड्यांची कथा !

जेव्हां बेटि व पीटर सकाळीं निजून उठतात तेव्हां इंग्रज लोक निजायाला जातात; कारण इंग्लंडमध्यें जेव्हां रात्र असते तेव्हां ऑस्ट्रेलिआंत उजाडलेलें असतें. आणि इंग्लंडमध्यें जेव्हां उजाडलेलें असतें, तेव्हां ऑस्ट्रेलिआची रात्र असतें. जेव्हां इंग्रज लोकांची ब्रेकफस्टची तयारी चालू असते, तेव्हां पीटर व बेटि निजण्याच्या तयारींत असतात ! आहे का नाहीं सर्व उलटा प्रकार !

बेटि व पीटर यांची शाळा रूथ्‌च्या शाळेसारखीच आहे. तींहि सकाळीं ब्रेकफस्ट् घेऊन शाळेंत जातात. बेटीहि रूथ्प्रमाणें नेट्‌बॉलमध्यें पटाईत आहे. त्यांना शाळेंत जाणें फारच आवडत असून तें, तीं कधींच चुकवीत नाहींत. शाळेंत लांबून येणारीं बरींचशीं मुलें तट्टांवरून येतात.

त्यांच्या चुलत्याचें एक मोठें कुरण आहे. तेथें तीं कधीं कधीं

राहावयाला जातात. तेथें इतक्या मेंढ्या आहेत कीं, त्या सर्व मोजतां येणें शक्य नाहीं. त्यांनीं दोन चारदां मोजण्याचा प्रयत्न केला, पण मुळींच उपयोग झाला नाहीं ! लोंकर कापण्याचे दिवस आले तेव्हां त्यांना फारच मजा वाटली. लोंकर कातणारीं माणसें ती इतक्या झट्दिशीं कातरीत कीं, डाव्या हातानें कोंकरूं धरण्याचा अवकाश कीं उजव्या हातचीं कातरी सर्रदिशीं कोंकराचे दोन्ही बाजूंवरून फिरे! व तें कोंकरूं पुढें सरून दुसरें त्याच्या जागीं उभें असलेलें दिसे! सर्व प्रकार इतका झटपट होई कीं, कातरणाराच्या हातांत कातरी नसून जादूची कांडीच आहे कीं काय असें पाहणारास वाटे! त्यापैकीं एक मनुष्य तर इतका पटाईत आहे कीं, त्यानें बेटी व पीटर यांचे देखत एका दिवसांत बरोबर तीनशें मेंढी कातरली ! या कातरलेल्या लोंकरीची चांगली वाईट निवडून प्रतवारी लावली म्हणजे ती सगळीं पोत्यांत भरून जवळच्या स्टेशनवर रवाना करतात. त्यांतील बरीचशी लोंकर खुद्द इंग्लंडला जाते, व तेथें त्या लोकरीचे निरनिराळे कपडे तयार होतात.

पीटर व बेटी यांचे गांवाभोंवतीं मोठमोठे मळे व फळबागा असून त्यांत भोपळे, अननस, अक्रोड, ॲपल्स्, पेअर्स्, पीचेस् वगैरें-चें पीक अतिशय होतें. इतकीं फळें असल्यामुळें मुलांची अगदीं चंगळ उडते ! या फळांपैकीं बरींचशीं हेन्रीचे देशाला पाठविलीं जातात. तेथें या वेळीं हिंवाळा असल्यामुळें तेथील फळांचा हंगाम संपलेला असतो; आणि म्हणून ऑस्ट्रेलियांतून जाणारीं हीं फळें इंग्लंडला अगदीं योग्य समयीं जाऊन पोंचतात.

पीटर एकदां आपल्या बापाबरोबर एका दूरच्या प्रांतांत प्रवासाला गेला होता. या प्रांतांत इतकें दाट जंगल आहे कीं, पुढचीं झाडें तोडल्यावांचून मागचें पाऊल पुढें टाकतां येत नाहीं ! या

जंगलांतून जातांना पीटरच्या बापानें त्याला या जंगलांतील प्रवासाचा कंटाळा येऊं नये म्हणून कितीतरी मनोरंजक माहिती सांगितली. 'तेव्हां अशींच दाट जंगलें जिकडे तिकडे पसरलीं होतीं; आपले वाडवडील प्रथम या देशांत आले व त्यांनीं असलींच जंगलें तोडून, व तेथील मूळच्या रानटी लोकांशीं मैत्री करून आपली वस्ती केली. कांहीं कांहीं मोठीं झाडें तोडून खालीं पाडणें शक्यच नसल्यामुळें येथील लोक झाडाच्या बुंध्यांत असे कांहीं खाचे करीत कीं, त्यामुळें झाडाचें पोषण अजीबात थांबे, व तें झाड आपोआप वाळे व वठे. अशा रीतीनें तें वठलें म्हणजे त्यास ते खालून आग लावून देत, व अशा प्रकारें सबंध झाड उभेंच्या उभें जळून खाक होई' ! ही माहिती ऐकत असतांना त्यांच्या पुढूनच एक कांगुरूं उड्या मारीत गेलें तिकडे पीटरचें लक्ष गेलें; कांगुरूच्या लांब लांब उड्या, त्याच्या पोटापुढची पिशवी, त्यांतील पोर, त्याचे पुढचे थोटे पाय, अजस्र शेपटी वगैरे चमत्कारिक गोष्टी पाहून त्याला फारच मजा वाटली. तो पुढें जातो तों त्याला एमू नांवाचा एक मोठा पक्षी दिसला. 'ह्याला पंख आहेत म्हणूनच पक्षी म्हणावयाचें; वास्तविक त्याला उडतां येत नाहीं' हें बापाच्या तोंडचें ऐकून पीटरला आश्चर्य वाटलें. ते शेवटीं एका म्हाताऱ्या जंगली मनुष्याचे झोंपडींत शिरले. ही झोंपडी पानांची व झाडांच्या सालींची केलेली होती. तो जंगली मनुष्य अतिशय काळा व कुरूप असून त्याच्या डोक्यावरचे व तोंडावरचे केंस अतिशय राकट दिसत होते.त्यांतच त्यानें सगळ्या चेहऱ्यावर गोंदून घेतलें असल्यामुळें तो अणखीं भयंकर दिसत होता. पण त्याची मुद्रा जरी क्रूर दिसत होती तरी तो मनानें अतिशय प्रेमळ होता. कांहीं वर्षांपूर्वीं पीटरचा बाप याच जंगलांत आला असतां वाट चुकला व अतिशय गोंधळून

गेला. त्या प्रसंगीं याच मनुष्यानें त्याला वाट दाखवून सुरक्षित रस्त्याला लाविलें होतें. ही पूर्वीची आठवण मनांत ठेवून, पीटरचा बाप त्याला भेटण्याकरितां मुलाला घेऊन इकडे आला होता. पीटरच्या बापाला दुरूनच ओळखून तो म्हातारा पुढें आला, आणि त्याला व विशेषतः लहानग्या पीटरला पाहून त्याला फारच आनंद वाटला. त्यानें पीटरला आपली झोंपडी–बिपडी, सर्व कांहीं दाखविलें. तें पहात असतां पीटरचें लक्ष लांकडाच्या एका वाकड्या तुकड्याकडे गेलें. हें पाहून त्या म्हाताऱ्यानें तो तुकडा कसा फेंकावयाचा हें पीटरला प्रत्यक्ष दाखविलें. त्यानें तो तुकडा वर भिरकावल्याबरोबर तो हवेंत इकडे तिकडे जाऊन कोठेंतरी दूर पडावयाचे ऐवजीं पुनः त्या म्हाताऱ्याच्या पायापाशींच येऊन पडला! तें पाहून पीटर आश्चर्यचकित मुद्रेनें बापाकडे पाहूं लागला. तेव्हां त्याचे बापानें त्यास समजावून सांगितलें कीं, 'हा लांकडी तुकडा शिकार करण्याचें एक शस्त्र असून याला बूमरँग म्हणतात. ज्या प्राण्याकडे तें फेंकलें असेल त्याला जर तें लागलें तर ठीकच, परंतु जरी नेम चुकला व तो प्राणी हातचा सुटला, तरी तें शस्त्र पुनः पायापाशींच येऊन पडतें. त्यामुळें प्राण्याबरोबर तेंही हातचें जात नाहीं!' हें ऐकून पीटरला त्या म्हाताऱ्याच्या योजकतेचें आश्चर्य वाटलें. म्हाताऱ्यालाही मुलाच्या चौकसपणाचें कौतुक वाटलें, व त्यानें त्याला तें बूमरँग् बक्षीस दिलें. पीटरनें तें त्या म्हाताऱ्यासारखें टाकण्याचा किती तरी प्रयत्न केला; पण तें आपलें त्याच्या पायापाशीं न पडतां लांबच पडे!

‘बिल्’ आणि ‘मेरी’

(कॅनडा)

बिल् आणि मेरी कॅनडा नांवाच्या एका मोठ्या देशांत राहतात. इंग्लंड देशाच्या पश्चिमेस समुद्रांत खूप दूर उत्तर अमेरिका म्हणून जें एक खंड आहे त्याचे उत्तरेस हा देश आहे. तो इतका मोठा आहे कीं, जवळ जवळ दोन हिंदुस्थान त्यांत मावतील ! परंतु तेथें राहणारे लोक मात्र हिंदुस्थानांत राहणाऱ्या लोकांपेक्षां कितीतरी कमी भरतील. कारण तेथील बराचसा प्रदेश अजून मोकळा पडलेला आहे. बिल् व मेरी यांचें घर कॅनडाच्या पश्चिम भागांत आहे. त्यांची घरची स्थिति बऱ्या प्रकारची असल्यामुळें हीं मुलें नेहमीं आनंदांत दिसतात. ऑस्ट्रेलियांत राहणाऱ्या बेटि व पिटरप्रमाणें बिल् व मेरी हींहि इंग्लिश भाषा बोलतात, व त्यांच्या देशाचें निशाणही इंग्लिश लोकांच्या निशाणाप्रमाणें यूनिअन् जॅकचेंच आहे. परंतु इतर बाबतींत या मुलांचे राहणींत व इंग्रज मुलांचे राहणींत फारसा सारखेपणा नाहीं.

बिल् आणि मेरी ज्या शेतांत राहतात त्याला ते ‘ रांच’ म्हणतात. तें आपलेकडील शेतांप्रमाणें अगदीं लहान व मधून मधून बांध घालून तुकडे पाडलेलें असें नसल्यामुळें तें ठिगळें लावलेल्या गोधडीप्रमाणें दिसत नाहीं. तें चांगलें मोठें व सलग आहे. बिल् घरावर अगदीं उंच चढून व पाय व मान उंच करून जरी पाहूं लागला, तरीसुद्धां त्याची दृष्टि शेताच्या हद्दीपर्यंत पोंचणार नाहीं. गव्हाचें पिवळें पीक व निळसर आकाश हीं एकमेकांना भिडलेलीं पाहून बिल्ला फारच मजा वाटते. घराच्या दुसऱ्या बाजूला शेंकडों फुलझाडें असून त्यांत कांहीं प्लम्स्चीं, तर कांहीं

ॲपल्स्चीं, कांहीं पेअरचीं तर कांहीं पीचचीं आहेत. तीं सर्व गुलाबी व पांढऱ्या मोहोरांनीं बहरलीं व हजारों भुंगे फुलांतून मध गोळा करण्याकरितां 'गुं गुं' करीत फिरूं लागले कीं, एकंदर देखावा फारच बहारीचा दिसतो. जसें कांहीं इंद्राचें नंदनवनच तेथें अवतरलें आहे! उन्हाळ्याच्या शेवटीं शेवटीं फळें पिकलीं म्हणजे त्यांची तोड सुरू होते. फळें तोडणें, तीं निवडून त्यांची प्रतवारी करणें, तीं पेटाऱ्यांत नीटनेटकीं भरणें, पेटारे परगांवीं पाठविणें वगैरे कामें अगदीं झटपट उरकावयाचीं असल्यामुळें घरांतील एकूनएक मनुष्याला त्या दिवसांत फार काम पडतें; इतकें कीं, 'रात्रीं अंथरुणाला पाठ केव्हां लागतें' असें त्यांस होऊन जातें. बिल् व मेरी हीं सुद्धां अतिशय दमतात. इतर दिवसांतल्याप्रमाणें अंथरुणांत गोष्टी सांगत पडणें त्यांना शक्य नसतें; उशीवर डोकें ठेवण्याचा अवकाश कीं त्या दोघांना गाढ झोंप लागून जाते!

त्यांचें हल्लींचें घर लांकडाचें असून साधारण बऱ्यापैकीं आहे. ह्याच्या अगोदरचें ओबडधोबड ओंडक्याचें व अगदींच कसेंतरी होतें. कारण त्यावेळीं त्यांचा बाप नुकताच त्या ठिकाणीं येऊन वस्ती करूं लागला होता. शेत–मळ्याला सुरुवातच असल्यामुळें पहिल्या पहिल्यांदा कांहींच उत्पन्न होत नसे; व अर्थातच त्याला फारच गरीबींत दिवस काढावे लागले. परंतु मेरीचे जन्मापासून अलीकडे फळमळा चांगला बाजूं लागल्यामुळें त्याची स्थिति बरीच सुधारली आहे. परवांच तो बायकोपाशीं 'आपण पुढच्यावर्षीं एक मोठें घर बांधूं' असें म्हणाला; हें ऐकल्यापासून बिल् व मेरी मोठ्या आनंदांत व थोड्याशा ऐटींत असतात.

बिल् व मेरी शाळेंत जातात. त्यांची शाळा घरापासून चांगली दोन मैल लांब असल्यामुळें तीं घोड्यावरून जातात, परंतु वेळ पड-

त्यास पायींहि जाण्याची त्यांची तयारी असते. कांहीं कांहीं मुलें तर पांच मैलांवरून येतात तरी त्यांना त्याचें कांहीं वाटत नाहीं. उलट मजाच वाटते. ते मधल्या वेळीं खाण्याकरितां बरोबर कांहीं फराळाचें घेऊन जातात, आणि तें खेळण्याचे पटांगणावरच खातात.

हिंवाळ्यांत जिकडे तिकडे बर्फ पडूं लागलें, व नद्या तळीं वगैरे गोठूं लागलीं म्हणजे, जो तो आपले बर्फावरून चालण्याचे जोडे, व गाड्या बाहेर काढतो. बर्फावर खेळावयाच्या निरनिराळ्या खेळांना सुरवात झाली कीं बिल मेरी वगैरे मुलें अगदीं आनंदांत असतात. बिल्चा बाप व गावांतील इतर मोठी मंडळीहि हे खेळ खेळतात. कारण त्यांनीं उन्हाळ्यांत खूप काम केलेलें असतें, व आतां दुसरें फारसें करावयाचेंहि नसतें. शिवाय मुलांबरोबर खेळणें हें त्यांना नेहमींच आवडतें. बिल् स्केटिंग फार चांगलें करतो, तर मेरी बर्फावरून जोडे घालून धावण्याचे कामांत कोणालाही ऐकत नाहीं. कधीं कधीं त्यांचा बाप आपल्या मोठ्या गाडीला तीन चार घोडे जोडतो, व घरांतील सर्व मंडळी, गडी माणसें, व इतर शेजारी पाजारी यांना गाडींत बसवून, बर्फावरून एक लांबची सफर करून येतो. या दिवशीं बिल् व मेरी अगदीं बापाशेजारीं पुढच्या बाजूला बसतात व मधून मधून ऐटींत चाबूकही फटकारतात ? मेरीच्या हातून एकदां चाबूक खालीं पडला, तेव्हां सर्वच मुलें मोठ्यानें हंसलीं; मेरी मात्र जरा वेळ खट्टू होती.

बिल् एकदां आजीला भेटावयाला गेला. आजोळ त्याच्या गांवापासून बरेंच लांब होतें. त्यामुळें त्याला कितीतरी दिवस आगगाडींत बसावयास सांपडलें. घरीं परत आल्यापासून तो मेरीला याच प्रवासाच्या गोष्टी सारखा सांगत असतो:—

" आम्ही सारखे आठ दिवस गाडींत होतों. आमचें जेवण, झोंप, खेळणें, वगैरे सर्व कांहीं गाडींतच चाललें होतें. शेंकडों मैलांत उंच उंच गवत व गव्हाचीं शेतें यांशिवाय तिसरें कांहींच नव्हतें, व स्टेशनेंहि बऱ्याच वेळानें येत होतीं. स्टेशनांचे आसपास गव्हाच्या उंच उंच टांक्या भरलेल्या असून, गहूं आगगाडीचे डब्यांत भरण्याची व्यवस्था फारच मजेदार होती. रॉकी पर्वतांच्या रांगांतून आमची गाडी जात असतां एंजिनाला अतिशय दम लागून तें अगदीं धापा टाकीत होतें ! कारण तें कितीतरी मोठ्यांदा भप् भप् करीत होतें. त्याचे एकट्याच्यानें गाडी रेटत नाहीं असें दिसल्या-बरोबर गाडीला दुसरें एंजिन् लावण्यांत आलें; व मग मात्र आमची गाडी चढावरून जरा झपाट्यानें जाऊं लागली. जिकडे तिकडे डोंगरांचीं उंच शिखरें दिसत असून त्यांवर बर्फ पडल्यामुळें तीं पांढरीं दिसत होतीं. मधून मधून खालील दऱ्यांतून पाण्याचे प्रवाह वाहात होते. व त्यांवरून गाडी पलीकडे जाण्याकरितां मोठमोठे लोखंडी खांबासारखे तिरपे पूल बांधलेले होते. "

बिल्चें हें रसभरित वर्णन चालू असतांना मेरी अगदीं कान देऊन ऐकत असे; बिचारीला काय माहीत कीं त्यांत बिल्नें आपल्या पदरचेंहि कांहीं सांगितलें असेल !

बिलचें घर ज्या भागांत होतें, त्याचे आसपास ' रेड इंडिअन् ' नांवाचे लोक राहतात. ते आतां पूर्वीइतके पुष्कळ राहिले नसून त्यांचा क्रूरपणाहि कमी कमी होत चालला आहे. तसेंच ते आतां पहिल्या-सारखे नटत सजतही नाहींत. त्यांच्या एका पुढाऱ्याला पाहण्याचा योग बिलला एकदां आला. मावळे लोक डोक्यावरून जशी घोंग-डीची खोळ घेतात तसेंच त्यानें डोक्यावरून कांहींतरी घेतलें असून, त्यावर जिकडे तिकडे पिसें लावलीं होतीं. त्याचा कोट लांब

झग्यासारखा होता. त्यानें कानांत व गळ्यांत कितीतरी दागिने घातले होते. त्याचे हातांत एक बंदुक असून तो दिसावयालाहि मोठा क्रूर दिसत होता. त्याचा चेहरा इतका गंभीर व क्रूर होता कीं, कितीतरी दिवसांत त्याला हंसूं आलें नसावें असें बिलला वाटलें!

बिल्ला एक सुंदर व छोटीशी होडी मिळाली आहे. तिच्या कडा बर्चच्या सालीच्या असून, तिचा सांगाडा सीडच्या लांकडाचा आहे. ही होडी मिळाल्यापासून बिल्ला दुसरें कांहीं सुचत नाहीं. तो मेरीला घेऊन सारखा नदीवर जातो, व होडींत बसून मोठमोठे मासे घेऊन येतो. या ठिकाणीं मासे पुष्कळ असल्यामुळें त्याला रोज कांहींना कांहीं शिकार सांपडतेच. कधीं कधीं त्याचेयेवढाले मासेसुद्धां त्यांना सांपडतात. व त्या उत्साहांत आपण पुढें कोळ्याचा धंदा करावा असें बिल्ला नेहमीं वाटतें.

बिलच्या गांवाचे उत्तरेस मोठमोठीं अरण्यें असून पुष्कळसे लांकूडतोडे मधून मधून तिकडे जाऊन तळ देऊन राहतात. झाडें तोडणें, तीं नदीच्या कांठावर रचून ठेवणें, बर्फ वितळून नद्यांना पूर आले म्हणजे तीं पाण्याबरोबर खालीं वाहून आणणें, वगैरे सर्व कामें हे लांकूडतोडे नॉर्वेमधील लोकांप्रमाणेंच करतात. लांकूडतोड्यांच्या एका कॅंपबरोबर जाऊन या सगळ्या गोष्टी प्रत्यक्ष पाहण्याचा बिल्चा बेत आहे. कारण त्याला या सगळ्या गोष्टींत फार मजा वाटते; व आपण पुढें लांकूडतोड्याचा धंदा करावा असेंहि तो आपल्या मनाशीं ठरवितो. त्याला शिकारीच्या गोष्टीहि फार आवडतात; व एकादेवेळीं शेजारच्या जंगलांत जाऊन अस्वलाची शिकार करावी अशीहि त्याला इच्छा होते; व त्या इच्छेच्या भरांत तो अस्वलाच्या कातड्याचा एक सुंदर रग् मेरीला देण्याचें वचन देतो!

' विलि '

(युनाइटेड् स्टेट्स् ऑफ् अमेरिका)

बिल् व मेरी यांच्या कॅनडा देशाचे दक्षिणेस त्याला लागूनच युनायटेड् स्टेट्स् ऑफ् अमेरिका म्हणून एक मोठा देश आहे. या देशांतील लोक इतर देशांतील लोकांचे मानानें फारच श्रीमंत आहेत असें म्हणतात. या देशांतील एका मध्यमशा शहरांत विलियम् राहतो. तो आतां १०-१२ वर्षांचा असला तरी त्याचे आईबाप त्याला ' विली'च म्हणतात. तो पहिल्यापासूनच इतर देशांतील मुलांचे मानानें अतिशय सशक्त व सुदृढ आहे. त्याची आई इस्पितळांत बाळंत झाल्याबरोबर तिनें विलीचें वजन करून पाहिलें, तें चांगलें १० पौंडांवर भरलें ! तिकडील बहुतेक मुलें विलीसारखींच सुदृढ असतात.

विलीचे आईबाप खाऊनपिऊन बऱ्यापैकीं असून, त्या शहरांत त्यांचें स्वतःचें एक लहानसें घर आहे. तें दुमजली असून त्याला खालीं एक तळघर आहे. स्वयंपाकाची, जेवण्याची व बसण्या-उठण्याची जागा पहिल्या मजल्यावर असून पाणी तापविण्याचा बंब, घर तापविण्याचा बंब, धुण्याचीं यंत्रें व इतर सटरफटर गोष्टी तळघरांत असतात. घर जरी शहरांत असलें तरी त्याच्या पुढेंमागें आंगणें, व बाजूंना मोकळी जागा बरीच आहे. त्या शहरांत प्रत्येक घराभोंवतीं अशीच मोकळी जागा सोडावी लागते. पुण्यामुंबईतल्या घरांप्रमाणें तिकडे घरें एकमेकांना चिकटून बांधूं देत नाहींत. विलीचे शहरांत बाजारपेठेचा भाग व वस्तीचा भाग वेगवेगळे आहेत. बाजारपेठेंतील भागांत सातसात, आठआठ मजली उंच इमारती असून राहण्याच्या भागांतील घरें साधारणतः विलीच्या

घराएवढींच २–३ मजली आहेत. डॉक्टर वकील वगैरे धंदेवाले लोक आपापलीं ऑफिसें वरीं न ठेवतां व्यापारी पेठेंतच ठेवतात. रस्ते कॉंक्रीटचे किंवा विटांचे असून, त्यांचे दोन्ही बाजूंना चांगले रुंद रुंद फूटपाथ आहेत; मुलांना खेळण्यासाठीं म्युनिसिपॅलिटीनें पुष्कळ ठिकाणीं बगीचे केले असून त्यांत पोहण्यासाठीं तळींहि बांधलेलीं आहेत. शिवाय घसरगुंडी, झोपाळे वगैरे खेळण्याच्या इतर सोयीहि केलेल्या आहेत.

विलीच्या गांवापासून बेंचसें दूर न्यूयॉर्क म्हणून एक शहर आहे, तेथें विलीचा आतेभाऊ राहतो. खुद्द युनायटेड स्टेटस्‌मध्यें तर याचेइतकें मोठें असें दुसरें शहर नाहींच; परंतु सबंध पृथ्वीवरही एक लंडन सोडल्यास, इतकें मोठें शहर सांपडणार नाहीं. तेथें मोटारी आगगाड्या, ट्रॅम्‌गाड्या यांची गर्दी व माणसांची रहदारी फार असते; तेथल्या इमारती इतक्या भयंकर उंच आहेत कीं, बोलायची सोय नाहीं ! या इमारतींचीं टोकें इतकीं उंच असतात कीं, त्याच इमारतीजवळ रस्त्यावर उभें राहून मान कितीही वर केली तरी तीं दिसत नाहींत ! वरच्या मजल्यावरून खालीं रस्त्यावर पाहिलें तर माणसेंच काय पण मोटारीसुद्धां इतक्या लहान दिसतात कीं, जणूं मुंग्या ! विलीला नेहमीं आपल्या आतेभावाकडे जावेंसें वाटतें, तें या उंच उंच इमारतींकरितां व मोठमोठ्या दुकानांकरितां !

विलीच्या देशांत मोटारींचा इतका सुकाळ आहे कीं, साधारण माणसाच्याही स्वतःच्या मोटारी असतात. विलीच्याही बापाची एक मोटार असून, ती विलीला फारच आवडते. विलीची स्वतःची एक बायसिकलही आहे. कधीं मोटार बिघडली तर ती विलीचा बाप स्वतःच सर्व खोलतो, व दुरुस्त करतो. त्यामुळें

विलीला सर्व भाग सुटे पाहावयास मिळून, ते कसे सांधावयाचे हेंहि आपोआप समजतें. सायकलची कांहीं मोडतोड झाल्यास—व ती नेहमींच होते— ती विली स्वतःच दुरुस्त करतो. घरांतील दिवे, घड्याळें, रेडिओ, फोनोग्राफ व इतर यंत्रेंहि तो नीट करून पाहतो. यामुळें त्याला साधारणतः कोणत्याच यंत्राची हल्लीं भीति वाटत नाहीं. उलट स्वतःचें डोकें चालवून तो पुष्कळ वेळां निरनिराळे प्रयोगही करून पाहतो. ' पुढें काय करणार ' असें विलीला कोणीं विचारल्यास ' मी एडिसन किंवा फोर्ड ह्यांच्याप्रमाणें निरनिराळीं यंत्रें शोधून काढणार ' असें तो मोठ्या डौलानें सांगतो. युनायटेड स्टेटस्‌मधल्या बहुतेक मुलांना आपण कांहींतरी यांत्रिक शोध लावावेत, व त्यांवर खूप गब्बर व्हावें असेंच वाटत असतें. विलीचा मामा शेतकरी असून तो शेतावरच आपल्या बंगल्यांत राहतो. विली मामाकडे गेला म्हणजे तेथलीं डुकरें, गाई, कोंबड्या वगैरेंशीं खेळतांना त्याला बरीच मजा वाटते. परंतु तेथें न्यूयॉर्कसारख्या उंच उंच इमारती, निरनिराळ्या प्रकारच्या गाड्या, मोठमोठीं दुकानें, कारखाने, खालींवर उतराचढायाला विजेचे पाळणे, वगैरे गोष्टी नसल्यामुळें त्याला आपल्या आतेभावाकडे राहावयाला जितकें आवडतें तितकें मामाकडे राहायाला आवडत नाहीं.

विली आईबापांचा मोठा लाडका असून, त्याची प्रत्येक हौस ते होतां होईल तों पुरवतात. घरात त्याची स्वतःची अशी एक खास खोली असून, तिच्यांतील एका कपाटांत लहान बोटी, विमानें, मोटारी, विजेची आगगाडी, मेकॅनो, क्रेन, सिग्नल, वगैरे कितीतरी खेळणीं नीट लावून ठेवलेलीं असतात. त्याचें स्वतःचें एक लहानसें टेबल व खुर्ची असून, पुस्तकांकरितां एक लहानसें कपाटही आहे. त्याचा एक छोटासा ग्रामाफोन असून,

गाण्याच्या नादांत तो कितीतरी वेळ एकटाच नाचतो, व हातवारे करतो. खोलींतही एका कोंपऱ्यांत पियानो असून, त्याची आई रोज अर्धा तास त्याला तो वाजविण्यास शिकविते. दुसऱ्या कोंपऱ्यांत फुटबॉल, चेंडूदांडू वगैरे सामान पडलेलें असतें. लहानपणीं त्याला नीट व्यवस्थित रीतीनें जेवतां येत नसल्यामुळें त्याची आई त्याला पाहुण्यांच्या पंक्तीला जेवावयास बसूं देत नसे.त्याला एकट्यालाच अगोदर जेवावें लागत असे. तसेंच त्याचे आईबाप त्याला आपलेबरोबर सिनेमालाही घेऊन जात नसत. परतु आतां तो मोठा झाला असून, त्याला बाहेरच्या माणसांत कसें वागावयचें हें समजूं लागलें असल्यामुळें त्याला याही गोष्टी आईबापांचे बरोबरीनें करतां येतात. आतां त्याला एकटें बाजारांत जाऊन स्वतः बाजारहाट करावासें फार वाटतें. तसेंच तो स्वतः कांहीं ना कांहीं तरी मिळवतो. कधीं सकाळ–संध्याकाळचीं वर्तमानपत्रें घरोघर पोंचवितो, तर कधीं इतर कामें करतो. त्याचे आईबाप गरीब आहेत, किंवा मुलानें कांहीं तरी पैसे मिळवून आपल्याला संसारांत मदत करावी अशी त्यांची अपेक्षा आहे, असें मुळींच नाहीं. परंतु आपल्या मुलाला लहानपणापासूनच स्वावलंबनाचें शिक्षण मिळावें, त्याला कसलेंहि काम करण्यांत हलकेपणा वाटूं नये, अशी त्यांची इच्छा असल्यामुळें त्यानें असल्या प्रकारचीं कामें करून थोडेसे पैसे मिळविले तर त्यांत त्यांना बिलकूल कमीपणा वाटत नाहीं. विली आपण मिळविलेले पैसे स्वतःचे नांवानें बँकेंत टाकतो व लागतील तसे काढून खर्च करतो. पहिल्यांदा तो या पैशांनीं कांहीं खेळाच्या वस्तु किंवा चित्रांचीं पुस्तकें वगैरे विकत घेई. परंतु हलीं तो मातृदिनाचे दिवशीं आईला कांहीं भेट द्यावी लागते त्यावेळीं, किंवा नाताळांत

मित्रांना कांहीं भेटी पाठवाव्या लागतात त्या प्रसंगीं, हे पैसे बँकेंतून काढतो, व खर्च करतो. मितव्यय, व्यवहारांत लागणारा शहाणपणा, शिलक टाकण्याची संवय वगैरे—सारख्या कितीतरी चांगल्या संवयी विलीला यामुळें लागल्या आहेत.त्याचे मित्रही त्याचेसारखेच आहेत. हल्लीं त्याचा बाप त्याला मोटार चालवायाला शिकवीत असून,त्याला ती चांगली चालवितां येऊं लागली म्हणजे तो त्याला एक लहानशी मोटार घेऊन देणार आहे.

विलीला त्याचे ५ वे वर्षी पहिल्यांदा शाळेंत घातलें. त्याचेहि पूर्वी वर्ष दोन वर्षे त्याला घरच्याघरींच अक्षर ओळख झालेली होती. चित्रांचे ठोकळे, खेळणीं, पेपरमिंट,चॉकोलेट् वगैरे खाऊच्या वड्या यांच्या योगानें त्याला कितीतरी शब्द वाचतां येऊं लागले होते. त्याच्या मास्तरीण बाईचें त्याच्यावर अतिशय प्रेम असे. तो सकाळीं ९ वाजतां शाळेंत जातो,व १२ला परत येतो. नंतर घरीं जेऊन शाळेंत जातो,व ४ वाजतां परत येतो.रविवारीं सुट्टी असते. पण तो त्या दिवशीं 'सन्डे स्कूल्' मध्यें जातो.ही शाळा सकाळीं ९ ते १० पर्यंत चर्च्-मध्यें भरते. तेथें गावांतील इतर लहान मुलेंही जमतात. मास्तर जीजस्च्या गोष्टी, व गरीब लोकांवर कोणी कसे उपकार केले वगैरेच्या गोष्टी सांगतात. सुरुवातीला सर्व मुलें ऑर्गन्च्या साथीवर प्रार्थनेचें गोड गाणें म्हणतात, तेव्हां चर्च्मधील एकंदर वातावरण किती सुंदर व गंभीर दिसतें! विलीला पुस्तकांतलें वाचायाला येऊं लागल्याबरोबर, तो रोजच्या वर्तमानपत्रांतील विनोदी चित्रें व ठळक ओळींतील मजकूरही मोठ्या आवडीनें वाचूं लागला; व हल्लीं हल्लीं तर तो 'पॉप्युलर मेकॅनिक्स्', 'सायंटिफिक् अमेरिकन्,' 'बॉईज् मॅगझीन्' वगैरे मासिकेंहि मोठ्या आस्थेनें वाचतो. रोजच्या वर्तमानपत्रांतील कांहीं भाग—विशेषतः रोजच्या खेळांच्या जाहिराती—वाचल्यावांचून तर

त्याला चैनच पडत नाहीं ! वास्तविक आतां कुठें विलीचें प्राथमिक शिक्षण संपून दुय्यम शिक्षण सुरू होणार आहे,तोंच त्याला वाचनाचा इतका नाद लागला आहे ! त्याचे जवळ एक वही असून,तींत त्यानें अनेक मोठ्या लोकांच्या सह्या मिळवून ठेविल्या आहेत.ही वही तो अतिशय जपून ठेवतो;व एकटा असला म्हणजे तिच्यांतील सह्यांकडे पहात असतो. 'आपणही असेच मोठे होऊं का' असा विचार त्याचे मनांत येत असावा. हिंवाळ्यांत बर्फावरून स्केटिंग व बर्फाचे लाडू करून ते एकमेकांना मारायाला विलीला फार आवडतें. कधीं कधीं तो समुद्रावर मासे धरायालाही जातो.

विलीचे आईबाप जेव्हां आप्तेष्टांना भेटावयास जातात, तेव्हां केव्हां केव्हां ते विलीला बरोबर घेऊन जातात. कधीं कधीं पाहुणे मंडळी घरीं आली म्हणजे आतां तो पूर्वीप्रमाणें दूर जात नाहीं, त्यांच्यांतच बसतो.आतां त्याला चांगलें समजूं लागलें असून, तो केव्हांही बसलेल्या माणसांचे मधून जात नाहीं, किंवा गलगा करीत नाहीं. त्याला कोणीं कांहीं दिलें किंवा कोणीं त्याची प्रशंसा केली, तर तो लगेच ' थँक् यू ' म्हणतो. जेवतांना फार मागत नाहीं, किंवा अधाशासारखें फार खातही नाहीं. आपल्या शिक्षणाचा परिणाम विलीवर चांगला होत आहे, हें पाहून त्याच्या आईबापांना मोठी धन्यता वाटते ! ते त्याला हल्लीं जास्तजास्तच मोकळीक देत असून, तोहि तिचा कधीं दुरुपयोग करीत नाहीं. ते त्याला कधींकधीं इस्पितळांत हिंडवून आणून निरनिराळे रोग प्रत्यक्ष दाखवितात; व ते वाईट रीतीनें वागल्यामुळें कसे उत्पन्न झाले हें त्याच्या मनावर अप्रत्यक्ष रीत्या बिंबवितात. सिनेमाचे योगानेंहि ते विलीच्या उच्छृंखल वृत्तींना योग्य रीतीचें वळण लावण्याचा प्रयत्न कारितात. कोणचें अन्न खावें, व तेंच कां खावें, या

संबंधींची बरीच माहिती त्याला घरच्याघरींच झालेली आहे. व तो आतांशा जेवणाचे पदार्थांकडे या दृष्टीनें पाहात असतो. मनुका, स्पिनेज. (माठ, पोकळा वगैरे), टोमॅटो, संत्रीं, केळीं,वगैरे पदार्थ तो फार खातो. कारण आई म्हणते त्यांत निरनिराळीं व्हिटॅमिन्स् असतात. तसेंच त्याला दूधदुभतें व चाकोलेट फार आवडतें.

पोषाखाचे बाबतींतही विलीची हीच दृष्टि आहे. गुडघ्यापर्यंतची एक विजार, मोजे, बूट, कोट, व कॅप् येवढाच काय तो त्याचा नेहमींचा पोषाख असतो. त्याच्या आईनें त्याला निरनिराळ्या देशांतील मुलांचे पोषाख करविले आहेत. परंतु त्याला त्यांची फारशी आवड नसून, तो ते फक्त फॅन्सी–ड्रेस्च्या दिवशींच घालतो. आपलेकडे शिमग्यांत सोंगें घेतात, तशीं वर्षांतून एक दिवस तिकडेहि घेतात. कोणीं वाघाचें, कोणीं रेड्इंडिअनाचें, कोणी डचूकूचें, कोणी राजाचें अशीं निरनिराळीं सोंगें विली व त्याची मित्रमंडळी घेतात. त्या दिवशीं तांबड्या भोंपळ्याचे काप माणसाच्या नाकाडोळ्यांच्या आकाराचे काढून, त्यांत मेणबत्त्या लावतात; व लहान मुलांना " बुवा " म्हणून भिववितात. फॅन्सि ड्रेस्, सोंगें घेणें, किंवा ' पम्किन्–डे 'चा भोपळ्याचा खेळ वगैरे गोष्टी विलीला आतां पोरकटपणाच्या वाटत असून, त्याचें सर्व लक्ष आतां निरनिराळीं यंत्रें पाहण्यांत, व तशीं करण्यांत, लागलेलें असतें. कारण त्याला दिवसेंदिवस ' आपण एडिसन् किंवा फोर्ड व्हावें ' असें फार फार वाटत आहे !


‘ ऑगथा ’

(ग्रीनलंड्)

बिलीचे देशापासून बराच दूर उत्तरेस ग्रीनलंड म्हणून एक देश आहे. तेथील लोकांना ‘ एस्किमो ’ म्हणतात. ऑगथा व त्याचा बाप हेहि एस्किमोच आहेत. ग्रीनलंडमध्यें अतिशय बर्फ पडत असल्यामुळें ऑगथाच्या बापाला बाराहि महिने एकाच प्रकारचे घरांत राहतां येत नाहीं. हवेप्रमाणें त्याचें घरही बदलतें. हल्लीं उन्हाळा असल्यामुळें सर्व बर्फ वितळूं लागलें आहे; आणि म्हणून ऑगथा व त्याचे आईबाप आतां एका कातड्याचे तंबूत राहात आहेत. एकदां समुद्राचे भरतीवर एक लांकूड वाहत आलें. तें ऑगथाच्या बापानें आणून या तंबूचा मधला खांब केला आहे. तंबूच्या भोंवतालचें कातडें वालरस व सील या प्राण्यांचें आहे. ऑगथाला हा तंबू फारच आवडतो.

इतके दिवस तो लहान असल्यामुळें त्याचा बाप त्याला घरांतले घरांतच माशाचें जाळें विणावयास शिकवीत असे. परंतु आतां ऑगथा बाहेर जाऊन स्वतः मासे पकडण्यासारखा मोठा झाला असल्यामुळें त्याचा बाप त्याला आपले बरोबर घेऊन जातो. त्यानें ऑगथाला मासे धरण्याची एक लहानशी होडी करून दिली असून, ती ऑगथाला फारच आवडते. ऑगथा या होडीला ‘ क्याक ’ म्हणतो. एकदां तो एकटाच या क्याकमध्यें बसून गेला, व त्यानें आपल्याहीपेक्षां मोठा मासा पकडून आणिला ! त्या दिवशीं त्याला स्वतःची किती धन्यता वाटली !

आतां ऑगथाला मासे पकडतां येऊं लागले असल्यामुळें, तो आपल्या बापाबरोबर वॉलरस प्राण्याच्या शिकारीला जातो. त्याचा



बर्फमय ग्रीनलंड व तेथील खुजे एस्किमो

बाप फार चांगला शिकारी आहे; पण वॉलरसची शिकार इतकी कठीण आहे कीं, ती करतांना तो एकटाच न जातां आपलेबरोबर शेजाऱ्यापाजाऱ्यांनाही घेऊन जातो. ते बरेचजण असल्यामुळें यावेळीं ' क्याक ' मध्यें न जातां ' उमिआक ' मध्यें जातात; ' उमिआक ' होडी ' क्याक ' पेक्षां बरीच मोठी असून, तींत सामान्यतः घरांतील सामानसुमान ठेवलेलें असतें. मंडळी शिकारीला निघाली, तेव्हां ऑगथाला ' आतां आपणाला केवढी मोठी शिकार पाहावयाला मिळणार ' म्हणून फार आनंद झाला ! ही शिकार खरोखरच फार भयंकर असून, पुष्कळ वेळां वालरस मारण्याऐवजीं स्वतः शिकारीच मरून जातो !

ऑगथा हा फारच ठेंगणा असून त्याचा चेहरा कसा घामट व मेंचट दिसतो. नेहमीं अतिशय थंडी असल्यामुळें, ग्रीनलंडमध्यें रोज स्नान करणें शक्यच नसतें. तेथें आई आपल्या तान्ह्या मुलाला नाहूं घालीत नाहीं, तर त्याचें आंग, गाईसारखें चाटून स्वच्छ करते ! आपल्या देशांतही थंडीनें सगळ्या पाण्याचें बर्फ झालें असतें, तर आपलेकडील स्त्रियांनींहि मुलांना अशाच रीतीनें स्वच्छ ठेवलें नसतें काय ? ऑगथाचा सर्व पोषाख कोल्ह्याच्या किंवा सील प्राण्याच्या कातड्याचा केलेला असतो. ग्रीनलंडमध्यें कापूस, रेशीम, ताग, लोंकर, यांपैकीं कांहींच मिळत नाहीं; आणि मिळत असतें तरी त्यानें अशा कडक थंडीचें निवारण कसें काय होणार ? ऑगथाचे पायांत खूप जाड बूट असून डोक्याला त्यानें एक केसाळ कातड्याचें टोपडें घातलेलें आहे. अतिशय थंड देशांतील माणसें थंडी वाजूं नये येवढ्याच हेतूनें कपडे घालीत असल्यामुळें तेथें बायकापुरुषांचे कपडे सारखेच असतात. ऑगथाच्या आईचाहि पोषाख त्याच्या बापाच्या पोषाखासारखाच असतो. नाहीं

म्हणावयास तिच्या डोक्यावर मागें मानेवर सोडलेली एक पिशवी असून तींतच ऑगथाच्या तान्ह्या भावाला ती ठेवीत असते. मूल ठेवण्याची काय ही चमत्कारिक जागा! आई ओणवी होऊन खालीं वाकल्याबरोबर एकादे वेळीं तें बर्फांत पडावयाचें देखील!

थंडीचे दिवस आले म्हणजे ऑगथाचे आईबाप आपला उन्हाळ्याचा तंबू मोडतात, व आपलें सर्व बिऱ्हाडबाजलें कुत्र्यांच्या गाडींत टाकून सील प्राण्याची शिकार करण्यास निघतात. गाडीला चांगले दहाबारा कुत्रे जुंपलेले असून, ते फार क्रूर दिसतात. त्यांना अतिशय भूक लागली म्हणजे ते आपापसांतच एकमेकांना चावूं का डसूं करतात. ऑगथा एक मोठा चाबूक घेऊन कुत्र्यांना लगावतो, तेव्हां ते अतिशय जोरानें धावूं लागतात. ते असे जोरानें धावूं लागले म्हणजे एकेका दिवसांत पन्नास साठ मैलहि जातात! मार्गांत एकादी आडोशाची जागा लागली म्हणजे ऑगथाची मंडळी तेथेंच मुक्काम करतात, व घर उभारण्याच्या उद्योगाला लागतात. दगड, माती, लांकूड, गवत वगैरेपैकीं कांहींच मिळणें शक्य नाहीं. जवळ एक तंबू आहे; पण बर्फांत त्याचा काय निभाव लागणार? अशा प्रसंगीं ऑगथाचा बाप एक बर्फाचें घर तयार करतो. हें घर अतिशय ठेंगणें असल्यामुळें ऑगथाला सुद्धां घरांतले सर्व व्यवहार बसून किंवा ओणव्यानेंच करावे लागतात. घरांतील जमीन, छप्पर, खिडक्या, दारें येवढेंच नव्हे तर खिडक्यांचीं तावदानेंहि बर्फाचींच केलेलीं असतात! घराचा एकंदर आकारही बर्फाच्या ढिगासारखाच वाटोळा असतो. ऑगथाची आई दगडाची एक पणती घरांत सारखी लावून ठेवते. ती पणतींत तेलाऐवजीं सीलची चरबी घालते, व सीलच्या आंतड्याची वात वळते. या पणतीनें घरांत उजेड पडून शिवाय ऊबही उत्पन्न

होते. ऑगथाला हें घर तर त्याच्या तंबूपेक्षांहि जास्त आवडतें; कारण तें अतिशय टुमदार असून त्यांत सगळ्या सोयी असतात.

ऑगथा व त्याचा बाप आतां कुत्रे घेऊन वालरसूच्या शिकारीला निघतात. ऑगथाच्या बहिणीला या वेळीं 'आपण मुलगा असतों तर काय बहार झाली असती! भावाबरोबर आपल्यालाही शिकारीला जातां आलें असतें' असें वाटून फार वाईट वाटतें. तिला घरांत स्वयंपाकाचें काम असून, शिवाय कपडेहि शिवावयाचे असतात. शिवण्याला सुईदोऱ्याचे ऐवजीं ती बारीक व टोकदार हाडूक व सांबराच्या स्नायूचा दोरा वापरते.

ऑगथा व त्याचा बाप शिकारीला निघाले म्हणजे, त्यांचे कुत्रे हुंगीत हुंगीत पुढें जातात, व सीलचा तलास लावतात. हिंवाळ्यांत सर्व पाणी गोठलें म्हणजे पाण्याखालील सीलला हवा मिळेनाशी होऊन, ते हवा घेण्याकारितां वर येतात; व बर्फांत लहान लहान बिळें पडतात.हीं बिळें ऑगथाच्या कुत्र्यांचे नजरेस आलीं, म्हणजे ते थांबतात,व सीलला आपली चाहूल लागूं नये म्हणून ते अतिशय स्तब्ध उभे राहतात. परंतु आपल्या मालकाला मात्र आपण तेथें असल्याचें समजावें म्हणून ते आपल्या शेपट्या उभारून एकसारख्या हलवीत असतात. जणू कांहीं ते त्यांना बोलावीतच असतात. ऑगथा व त्याचा बाप त्या बिळांशीं येऊन सीलची वाट पहात बसतात. थोड्याच वेळांत सीलची साउली दिसते; व त्याबरोबर ऑगथाचा बाप आपलें 'हारपून' पाण्यांत जोरानें फेंकतो.'हारपून' सीलच्या पोटांत शिरल्याबरोबर ऑगथाचा बाप हारपूनला लावलेली दोरी वर ओढतो; त्याबरोबर हारपून व सील हीं दोन्हीहि

वर येतात. अशा रीतीनें सील हातांत पडला म्हणजे त्यास मारून ऑगथा व त्याचा बाप मोठ्या आनंदानें घरीं जातात. ऑगथाची आई व बहीण स्वयंपाक करून त्यांची वाट पहात बसलेल्या असतात. ते दोघेही सुखरूप आलेले पाहून त्या दोघींना फारच आनंद होतो. जेवणखाण झाल्यावर ऑगथा बहिणीला शिकारीच्या गोष्टी सांगत सांगत झोपीं जातो.

‘ हसन ’

(साहरा वाळवंट; आफ्रिका)

हसन साहराचे वाळवंटांत राहतो. हें वाळवंट आफ्रिका खंडांत असून, हजारों मैल लांबरुंद आहे ! या वाळवंटांत बिडुइन जातीचे आरब लोक राहतात.हसनचा बापही त्याच जातीचा आहे. त्याचें राहण्याचें ठिकाण एक व कायमचें नसून तो या वाळवंटांत एकसारखा फिरत राहतो. अर्थात हसन, हसनची आई, नोकर व उंट, बकरीं, घोडा वगैरे पाळीव प्राणी हीं सर्व हसनच्या बापा-बरोबरच फिरत असतात !


हसन बापासारखाच उंच व देखणा आहे. त्याचे डोळे फारच पाणीदार असून, दृष्टि अगदीं भेदक आहे. प्रवासांत जेव्हां त्यांना मुक्काम करावासा वाटतो, तेव्हां हसनचा बाप थोडीशी आडोशाची जागा पाहून तंबू उभारतो. हा तंबू आपलेकडील सारखा काप-डाचा केलेला नसून, बकऱ्याच्या कांतड्याचा केलेला असतो. रेती-वर चटया पसरून,त्यांवर उशा ठेवल्या,व जीं कांहीं थोडीशीं भांडीं-कुंडीं बरोबर असतील तीं नीटनेटकीं लावलीं, म्हणजे तो लहानसाच तंबू मोठा सुंदर दिसतो. तंबू वगैरे सर्व सामान प्रत्येक ठिकाणीं बरोबरच असल्यामुळें व तंबू घालण्याची पद्धति अगदीं ठरून गेल्यामुळें हें घर थाटण्याचें काम किती झटकन् होतें ! तंबूंत दुसऱ्या कांहीं विशेष सोयी करावयाच्या नसल्या तरी हसनच्या आईकरितां म्हणून एक स्वतंत्र जागा करावी लागते. कारण ती कधींच बाहेर पुरुषांत वावरत नाहीं. ती उंटाच्या पाठीवर डोलींत बसून चालली असतांही त्या डोलीला सर्व बाजूंनीं पडदे लावलेले असतात. बायकांनीं पडद्यांत राहण्याची ही चाल सर्व आरब

लोकांत असून, तिला ते गोषा म्हणतात. हा लहानसासा तंबू व तें छोटेखानी सामान हसनच्या आईबापांच्या संसाराला अगदीं पुरेसें होतें. आणि पुरेसें झालें नाहीं, तरी यापेक्षां जास्त सामान नेहमीं बरोबर ठेवणें शक्यच नाहीं; कारण त्यांना सारखें हिंडावयाचें असतें.

वास्तविक वाळवंटांतून प्रवास करणें अतिशय कठीण असतें. खालीं खोल व भुसभुशीत वाळू, वर कडक ऊन किंवा थंडी, भोंवतालीं पाण्याचें किंवा झाडांझुडाचें दर्शन नाहीं, मुक्कामाचीं ठिकाणें एकमेकांपासून शेंकडों मैल दूर, मधून मधून होणारीं वाळूचीं वादळें इत्यादि कारणांनीं प्रवाश्याला प्रवास करतांना फार कष्ट होतात. असें असूनही हसनला व त्याच्या कुटुंबांतील मंडळीला आपल्या फिरत्या आयुष्याचा कंटाळा कधींच येत नाहीं. काय हा संवयीचा परिणाम !

शेंकडोंशें मैल चालून गेल्यावर या मंडळींना एकादा झरा व त्याचे भोंवतीं ताड, माड, खजुरी, शिंदी वगैरे झाडांची दाट सावली लागते. हें ठिकाण येवढ्या मोठ्या वाळूच्या समुद्रांत एका लहानशा बेटासारखें दिसतें.व म्हणून त्याला'ओॲसेस'म्हणतात.येथें ही मंडळी थोडासा मुक्काम करतात,व मागच्या प्रवासाचा शीण घालवून टाकून पुढच्या प्रवासाची तरतूद करतात. हसन व त्याचे आईबाप विश्रांति घेत असतां,नोकर अन्नाच्या पिशव्या व पाण्याच्या पखाली भरून ठेवतात. उंट, मेंढ्या, घोडे जवळच्या हिरवळींत चरत असतात, व शेजारच्या झऱ्यांत पुनः पुनः पाणी पीत असतात. न जाणों, पुढें कदाचित पाणी मिळणार नाहीं ! सर्व तयारी होऊन मंडळी हुशार झाली म्हणजे पुनः प्रवासाला सुरवात होते !

मुक्काम करावयाचीं हीं ठिकाणें फार दूर दूर असतात, त्यामुळें



वालुकामय सहारा व तेथील काटक प्रवासी

प्रवाशी पुष्कळ वेळां आपला रस्ता चुकतात, व इतके गोंधळून जातात कीं, सांगायाची सोय नाहीं ! बिचारे हिंडहिंड हिंडतात, पण वस्तीचें ठिकाण कांहीं सांपडत नाहीं ! बरोबरचें अन्नपाणी संपून जातें; मुलें–माणसें व गुरें–ढोरें भुकेनें, तान्हेनें, व उन्हानें व्याकुळ होतात;व शेवटीं बिचाऱ्यांची पृथ्वीवरील मार्ग सांपडण्याची आशा संपून ते परलोकचा मार्ग पत्करतात ! हसनच्या आईला ‘ आपलीहि वाट नाहींना अशीच चुकणार ’ अशी सारखी भीति वाटत असते. पण ‘ आपला बाप फार हुशार आहे, तो कधींच वाट चुकणार नाहीं ’ असा हसनचा विश्वास असल्यामुळें ता मात्र नेहमी बेफिकीर व आनंदी असतो.

ही मंडळी प्रवास करीत असतांना त्यांना मुख्यतः ताड, माड, खजुरी, शिंदी इत्यादि झाडांचे फळांवरच राहावें लागतें, व तीं त्यांना फार आवडतातही. वाळवंटांत यांशिवाय दुसरीं झाडें होतच नाहींत. हसन फळांबरोबर उंटाचें किंवा शेळीचें दूध पितो; इतर मंडळी चीज खातात. मुक्कामाच्या ठिकाणीं मात्र अंजीर, संत्रीं, वैगेरे फळें व केक, मिठाई वगैरे सारखे पदार्थहि त्यांना मिळतात. या मंडळींना सकाळच्या व संध्याकाळच्या थंड वेळांतच प्रवास करावा लागतो. एकदां का सूर्य वर येऊन उन्हाचा चटका बसूं लागला कीं, पुढें चालणें शक्यच नाहीं.जेथें जशी सावली सांपडेल, त्या ठिकाणीं उतरावेंच लागतें. ऊन संपलें कीं मंडळी मुक्कामही संपवतात, व सामान चढवून चालूं लागतात. अशा रीतीनें मुक्कामांची चढउतर करण्यांत त्यांना कांहींच वाटत नाहीं.तंबू मोडून व घडी घालून एका उंटावर घालावयाचा,भांडीं-कुंडीं व उश्या चटयांत बांधून तें बोचकें दुसऱ्या उंटावर लादावयाचें; हसन व त्याचे आईबाप तिसऱ्या एका उंटावर किंवा घोड्यावर बसावयाचे; नोकर-चाकर

मागेंपुढें चालावयाचें. सर्व कांहीं इतकें बसून गेलेलें असतें कीं, आपल्याला जशी प्रवासाची दगदग वाटते तशी हसनच्या बापाला व इतर मंडळींना वाटत नाहीं.

हसनचें आपल्या उंटावर अतिशय प्रेम आहे. सर्वच आरबांचें आपापल्या उंटांवर तसेंच प्रेम असतें. त्यांना त्या प्राण्याबद्दल मनांतून एक तऱ्हेचा अभिमान वाटत असतो. उंट नसता तर आरबांना वाळवंटांतून प्रवासच करतां आला नसता. उंटांचीं फताडीं व एकसंधी पाउलें, बारीक डोळे, लांब मान, पाठीवरील टेंगूळ, चरचरीत जीभ, वगैरे एकूणएक अवयव देवानें, जसा कांहीं वाळवंटांतील परिस्थितीला जुळेल असाच केला आहेत. शिवाय बिचाऱ्याला खायला प्यायला कांहींहि चालतें; किंबहुना पुष्कळ दिवस कांहीं मिळालें नाहीं तरीहि चालतें. त्याच्या पोटांत अन्नपाण्याची बेगमी करून ठेवण्याची अजब सोयही देवानें केली आहे.

हसनच्या घरांत उंटाचा उपयोग इतर तऱ्हेनेंहि पुष्कळ होतो. एकादा उंट मेला म्हणजे हसनचे नोकर तंबू किंवा पखाल करण्याकारितां त्याचें कातडें काढतात, मांस शिजवितात, व केंसांच्या दोऱ्या करतात. हसनला त्याची आई उंटाचें दूध काढून प्यावयास देते, व उरलेल्याचें लोणी व चीज करते; व एकदां प्रवासांत जवळचें पाणी संपून सर्वांची तहानेनें जीव जाण्याची पाळी आली, तेव्हां हसनचे बापानें एक उंट मारून त्याचे मदारींत असलेलें पाणी सगळ्यांना देऊन त्यांचा जीव वाचविला!

हसनचें आपल्या उंटावर बरेंचसें प्रेम असलें तरी त्याला त्याचा कधीं कधीं रागही येतो. तो हेकट, खट्याळ, व आपमतलबी आहे. पहिल्यापहिल्यांदा तो हसनला चावायाला पाही; हसन तसाच त्याच्यावर बसला, म्हणजे कितीतरी वेळ तो रागानें धुसफुसत

असे. त्यानें हसनाला कितीतरी वेळां पाठीवरून ढकलून खालीं पाडलें आहे. एकदां तो बसल्या जागेपासून हलेच ना! हसनच्या बापानें व नोकरांनीं जंग जंग पछाडलें, पण व्यर्थ! इतके दुर्गुण असले, तरी हसनचें उंटावांचून चालणें शक्य नसल्यामुळें तो त्याला वागवून घेतो हेंच चांगलें.

एकदां हसन व त्याची मंडळी तळ देऊन मुकाम करीत असतांना दुसरीहि कांहीं प्रवाशी मंडळी मुक्काम करण्या-करितां तेथेंच आली. हसननें त्यांचें फारच चांगलें स्वागत केलें. त्यानें त्यांना निजायाला जागा तर दिलीच, पण त्याशिवाय आपल्या जवळचे कांहीं खाण्यापिण्याचे पदार्थहि त्यानें त्यांना दिले. मुलानें आपण न सांगतां या सर्व गोष्टी केल्या याचें हसनच्या बापाला फारच कौतुक वाटलें; कारण आरबलोक सामान्यत: प्रेमळ व दिलदार असून ते आल्यागेल्याचें आदरातिथ्य फार चांगल्या तऱ्हेनें करतात. तसेंच त्यांच्यापैकीं बहुतेक लोक मोठे प्रामाणिक व सज्जन आहेत. अर्थात त्यांचेमध्येंहि कांहीं लुच्चे व पाहुण्यांशीं दगाबाजी करणारे असतातच; पण हसनला असल्या माणसांचा अतिशयच राग येतो.

ती सर्व मंडळी रात्रभर प्रवासासंबंधींच्या गप्पा मारीत होती. दुसऱ्या दिवशीं, पाहाटेस सर्वांनीं आपापलें सामानसुमान बांधून उंटांवर चढवलें, व एकमेकांचा निरोप मोठ्या प्रेमानें घेऊन ती मंडळी आपापल्या मार्गाला लागली.

‘ बँबी ’

(इटुरी–जंगल; आफ्रिका)

आफ्रिका खंडाचे उत्तर भागांत जसें मोठें वाळवंट आहे, तसें मध्यभागांत एक मोठें जंगल आहे. या जंगलांत पिग्मी जातीचे जंगली लोक राहात असून, ते ठेंगूपणाबद्दल जगांत प्रसिद्ध आहेत. यांनाच आपण जळमाणसें म्हणतों. बँबी हाहि पिग्मी जातीचाच एक लहान मुलगा आहे. बँबी वयानें तर लहान आहेच, परंतु उंचीनेंही तो लहानच आहे. त्याचा बाप आपलेकडील बारा वर्षांचे मुलाएवढा दिसतो; त्याची आई त्याहूनही लहान दिसते. अर्थात बँबी एखाद्या मोठ्या बाहुलीइतकाच उंच असल्यास आश्चर्य नाहीं. त्याचें शरीर पिंगट असून, त्यांतच तांबड्या रंगाची झाक आहे. त्याचें तोंड रुंद असून, डोळे त्या मानानें बारीक दिसतात.

बँबी व त्याचे आईबाप ज्या जंगलांत राहतात, तेथील झाडी इतकी घनदाट आहे कीं, तिच्यामधून सूर्याचे किरण खालीं जमिनी-पर्यंत पोंचणें शक्यच नसतें. यामुळें बँबी व सर्वच पिग्मी लोक यांना सूर्यदर्शन होत नाहीं. तसेंच त्यांना आपले सर्व व्यवहार झाडांच्या बुंध्यांबुंध्यांनींच सरपटून करावे लागतात. या दोन कारणांमुळें, त्यांची वाढ कायमची खुंटून ते खुजे बनले आहेत. याच जंगलाच्या सरहद्दीवर राहणारे नीग्रो लोक त्यांच्यापेक्षां बरेच उंच असल्यामुळें बँबीच्या लोकांना ते अगदीं राक्षसां-सारखे दिसतात. बँबीच्या जातभाईंना इतर लोकांत जाण्याची फार लाज वाटते; आणि म्हणून ते आपलें जंगल सोडून कधींच बाहेर पडत नाहींत. बँबीनेंही अद्याप मोकळी जागा व मोकळें ऊन कसें असतें हें पाहिलें नाहीं! तो नेहमीं जंगलांतल्या सर्द व

उष्ण हवेंत राहतो. त्याच्या घराभोंवतीं जिकडे तिकडे मोठमोठे वृक्ष, झाडें, झुडपें, लता, वेली, गवत, शेवाळें इत्यादि निरनिराळ्या आकाराच्या वनस्पतींचा गराडा पडलेला असतो.

बँबी लहान असल्यामुळें, त्याचा बाप त्याला अद्याप आपले-बरोबर शिकारीला घेऊन जात नाहीं; त्यामुळें त्याला आई व इतर भावंडें यांजबरोबर घरींच रहावें लागतें. कधीं कधीं तो झाडांवर चढतो. झाडें, फळें, फुलें, किडे वगैरेंना उन्हाची अति-शय जरूरी असल्यामुळें तीं सर्व ऊन मिळेपर्यंत वर वर जाऊं पाहतात. त्यामुळें अशा जंगलांत झाडांना खालच्याखालीं फळें लागणें शक्य नसतें. अर्थात बँबीलाही झाडावर बरेंच उंच चढतां आलें, तरच एकादुसरें फळ त्याच्या हातीं लागावयाचें ! इतक्या प्रयासानें मिळविलेलें फळ खालीं टाकून देणें त्याच्या जिवावर येत असल्यामुळें तो तें एका हातांत धरून एकाच हातानें खालीं येतो. अशा रीतीनें बँबी झाडावर चढण्याउतरण्यांत एव्हांपासूनच अगदीं पटाईत बनला आहे. पिग्मी लोकांचीं सर्वच मुलें लहान-पणापासून झाडांवर चढण्याउतरण्यांत कुशल असतात. कधीं कधीं बँबीला एकाद्या झाडाच्या ढोलींत मधाचें पोळें लागलेलें दिसतें. लगेच तो पोळ्याला हात घालून मध बाहेर काढतो. मधमाशा 'गुं गुं' करीत आपल्यावर हल्ला करतील, किंवा आपल्या हाताला डसतील अशी शंकाही त्याचे मनांत कधीं येत नाहीं. फळांप्रमा-णेंच जमिनींत पुरलेले गड्डे व कांदेही कसे उकरून काढावयाचे हें बँबीला चांगलें माहीत आहे. तो नेमका जातो, व बरेचसे कंद व गड्डे आईला शिजवायाला आणून देतो. तो मात्र ते शिजण्याची वाट न पाहतां कच्चेच खाऊन टाकतो ! झाडाच्या मुळांशीं हिर-

वळींत ' खुट् खुट् ' खणीत असतांना तो हुबेहुब एखाद्या माकडासारखा दिसतो !

बॅबीचें घर पानांचें केलेलें असतें. बुरूड लोक ज्याप्रमाणें एकादी टोपली करतात, किंवा आपण ज्याप्रमाणें एकादी धान्य ठेवण्याची कणगी बांधतों, तशाच पद्धतीनें हें घर बांधलेलें असतें. फांद्या वरतीं वळवून घेतल्यावर मधल्या भोंकांतून पावसाचें पाणी खालीं गळूं नये एवढ्याबद्दल विशेष खबरदारी घ्यावी लागते. या घराचा आकार एस्किमोच्या घरासारखा वाटोळा असतो, व याहि घरांत एस्किमोच्या घरांतल्याप्रमाणेंच ओणव्यानें शिरावें लागतें. इतका त्याचा दरवाजा लहान असतो ! तें चालचलाऊ व डाहळ्यांचें केलेलें असल्यामुळें जास्त काळ टिकणें शक्य नसतें;व बॅबीला फारसें टिकाऊ घर लागतही नाहीं; तें दहा पंधरा दिवस टिकलें म्हणजे त्याला बास होतें.

बॅबीचा बाप शिकारी आहे. त्याला व इतर पिग्मी लोकांनाहि माकडाचें मांस अतिशय आवडतें.रोज संध्याकाळचे जेवणाला तें मांस असलेंच पाहिजे.शिजवलेलें नसेल तर कच्चेंच ! ते लोक जमिनींत बरेचसे खड्डे खणून ते गवतपाल्यानें झांकून ठेवतात. रानांतले मोठमोठे पशू तें हिरवें शेत समजून त्यावरील गवत खावयास येतात.व ते तसे आले म्हणजे खालीं खड्ड्यांत पडून आयतेच पारध्याच्या हातीं सांपडतात ! अशाप्रकारें कितीतरी प्राणी बॅबीचा बाप पकडतो.तो बाणांनीं शिकार करतो; पण त्यांतही त्याची युक्ति असतेच. साधे बाण मारण्याऐवजीं तो प्रत्येक बाणाचे टोंकाला कमरेला लटकावलेल्या भांड्यांतील विष लावतो. म्हणजे बाण अंगांत घुसल्याबरोबर तें विष रक्तांत भिनून प्राणी तेव्हांच मरतो ! तो मनुष्याशीं लढतांना देखील असल्या विषारी बाणांचाच उपयोग करतो. बॅबीचा बाप

शिकारीचा माग काढण्यांतही पटाईत आहे. जमिनीवर उगवलेल्या गवतावरील किंवा पडलेल्या पानांवरील सर्व खाणाखुणा तो अगदीं स्पष्ट ओळखितो. जसा कांहीं पुस्तक वाचूनच सांगत आहे! शत्रूचा पाठलाग करतांना तो स्वतः मात्र इतका गुपचूप चालतो कीं, प्राणी कितीहि तिखट कानांचा असो, त्याला त्याची चाहूल मुळींसुद्धां लागावयाची नाहीं! मोठमोठ्या प्राण्यांच्या पावलांच्या खुणा ओळखण्यांतही तो अगदीं तरबेज आहे. कोणता प्राणी, कोठल्या दिशेनें, किती लांब गेला आहे वगैरे सर्व कांहीं त्याला त्या खुणांवरून समजतें. मोठमोठ्या हत्तींची शिकारही तो आपल्या विषारी बाणांनींच करतो. हतीच्या जाडजूड अंगांत त्या विषाचा संचार होईतों बरेच दिवस लागतात; पण बँबीचा बाप त्याला मारल्यावांचून सोडीत नाहीं. हत्ती मेल्यावर तो त्याचें मांस व दांत घेऊन येतो. बँबीची आई मांस शिजविते, व दांत मात्र जपून ठेवते.

या जंगलांत मीठ दिसणें शक्यच नसल्यामुळें तें अतिशय दुर्मिळ असतें. आणि म्हणूनच बँबी व इतर पिग्मी लोकांना तें फारच आवडतें. ते लोक तें आपल्या शेजारच्या नीग्रो लोकांपासून युक्तीनें मिळवितात. ते सरळपणें नीग्रो लोकांकडे जाऊन त्यांच्यापासून मागून आणीत नाहींत, तर नीग्रोंना आवडणारीं फळें किंवा हत्तीचे दांत ते झाडावर अशा उंच ठिकाणीं बांधतात कीं, ते नीग्रो लोकांना आपोआपच दिसावेत. एखाद्या नीग्रोला तीं फळें दिसलीं कीं, तो तिकडे जातो; व फळांची किंमत म्हणून थोडेसें मीठ झाडाच्या बुंध्याशीं ठेवून तीं फळें घेऊन परत जातो. झाडाखालीं ठेवलेलें मीठ अर्थातच पिग्मी लोक येऊन घेऊन जातात. अशाप्रकारें पिग्मीनें झाडावर फळें टांगून ठेविलीं कीं,

नीग्रोनें मीठ देऊन फळें न्यावयाचीं असा एक संकेतच ठरून गेला आहे. एकाद्या नीग्रोनें संकेताप्रमाणें मीठ न ठेवतां नुसतीं फळेंच नेलीं तर ?———मग त्याला जिवंत राहण्याची आशाच नको !

बॅबीचे आईबाप या घरांत राहावयाला लागून बारा दिवस झाले असल्यामुळें आतां यापुढें आसपास शिकार सांपडणें शक्य नाहीं. होते नव्हते तेवढे प्राणी संपून गेले आहेत. बापानें मुक्काम हालविण्याचें ठरविल्याबरोबर बॅबी व त्याची आई आपलें सर्व बिऱ्हाड घेऊन दुसऱ्या ठिकाणीं जातात; व पुनः नवीन घर बांधणें, नवीन प्राणी मारणें, असा त्यांचा क्रम चालू होतो.

मि॰ ना. म. पटवर्धन यांचीं

लहान मुलांकरितां इतर पुस्तकें.

(१) 'आमची दिवाळी':—
प्रस्तावना लेखक, प्रो. वा. म. जोशी. किंमत ६ आणे.

(२) 'जगांतील मौजा':—
प्रस्तावना लेखक, रा. प्र. के. अत्रे. किंमत ६ आणे.

सदरहू दोन्ही पुस्तकें मुंबई इलाखा, वऱ्हाड, मध्यप्रांत व बडोदें संस्थान यांतील सरकारी शिक्षण खात्यानें वाचनालयांकरितां व बक्षिसें म्हणून मंजूर केलीं असून तीं प्रो० म. रा. परांजपे, रा० प्र. के. अत्रे, रा० गो. मो. मालशे, मि० सी. रा. तावडे, इत्यादि शिक्षणज्ञांनीं आपापल्या शाळांत पुरवणी-वाचनाकरितां वेळोवेळीं लाविलीं आहेत. पुस्तकांच्या उत्तमपणाबद्दल ज्ञानप्रकाश, केसरी, ऐक्य, मराठी-शिक्षक, प्राथमिक शिक्षण शाळापत्रक वगैरे वर्तमानपत्रें व मासिकें यांचेहि अभिप्राय आहेत.

पुस्तकें ना. म. पटवर्धन, हिंगणें,
व
नवीन किताबखाना पुणें, यांजकडे, विकत मिळतील.